कथारूप

रामायण

Sanskruti Samvardhan Pratishthan

संस्कारेणैव हि संस्कृति

नैतिक शिक्षण योजना



ज्यांच्या अमोल सहकार्यामुळे नैतिक शिक्षण योजनेचा हा उपक्रम यशस्वी होत आहे आणि संस्कारक्षम वयात मुलांना रामायण, महाभारताची गोडी लागत आहे. अशा सर्व शिक्षक, मुख्याध्यापक आणि शाळासंचालकांना...
कृतज्ञतापूर्वक धन्यवाद!

लेखिका :
श्रीमती उज्ज्वला पवार

***

प्रकाशक :
श्री. मोहन सालेकर
संस्कृति संवर्धन प्रतिष्ठान
७२/२, खटाव टेरेस,
डॉ. एस्. एस्. राव मार्ग,
लालबाग,
मुंबई - ४०० ०१२.
दूरध्वनी - ०२२-२४७१७६८६

***

मुखपृष्ठ व सजावट :
श्री. चंद्रशेखर जोशी

संपादक मंडळ
डॉ. श्रीमती कीर्तिदा मेहता
डॉ. चारुशीला ओक
श्रीमती अलका गोडबोले

अकरावी आवृत्ती :
दि. १९ जुलै, २०१६
सहयोगी मूल्य : रु. १५०/-

मुद्रक :

सर्वाधिकार प्रकाशकाधीन

प्रस्तावना

'रामायण' आणि **'महाभारत'** हे केवळ भारताचेच नव्हेत तर संपूर्ण विश्वाचे आदर्श ग्रंथ मानले जातात. रामायण म्हणजे प्रभू रामचंद्रांचा जीवनपट. त्यांचे अधिराज्य ते रामराज्य. असे रामराज्य यावे ही प्रत्येकाची इच्छा असते. रामराज्य म्हणजे एक सुखी समाधानी राज्य, जिथे हेवेदावे नाहीत, खून-दरोडे नाहीत, 'एकमेका सहाय्य करू अवघे धरू सुपंथ' असेच सर्वजण वागतात. प्रत्येकाच्या अन्न, वस्त्र, निवारा या मुलभूत गरजा पुरवल्या जातात; त्याचबरोबर सर्व आनंदी असतात ते रामराज्य. मग हे प्रभू रामचंद्र होते तरी कसे? त्यांच्यावर कौसल्या मातेने कसे संस्कार केले? ज्यायोगाने त्यांनी सचोटी सहिष्णुता. सहनशीलता, सामंजस्य हे गुण संपादन केले.

आजच्या २१ व्या शतकात माहिती तंत्रज्ञानाच्या महाजालात गुंतलेले आपण ज्ञानाच्या मागे धावतो आहोत, हे ज्ञान युग आहे. शोध लागतात, मानवी जीवन सुखी करण्याची अविरत धडपड आपण करतो आहोत. पण सुख म्हणजे समाधान नव्हे. समाज सुखी झाला तरी समाधानी होतोच असे नाही. म्हणून राम राज्य हवे. त्यात प्रत्येक प्रजाजन सुखी समाधानी असेल. म्हणूनच प्रभू रामचंद्रांनी वडिलांना दिलेले वचन पाळून वनवासात प्रयाण केले. शाश्वत नीतीमूल्ये कशी जपायची त्याचा वस्तुपाठच दिला. ध्येयपूर्तीसाठी विचारपूर्वक सामर्थ्याची जमवाजमव कशी आवश्यकता आहे ते आपल्याला दाखवले. कठीण प्रसंगांना धीरोदत्तापणे कसे समोरे जायचे ते दर्शवले, 'प्रयत्नांती परमेश्वर' हे सत्य पुन्हा एकदा समजावले असे अनेक बोधप्रद संदेश आपल्याला रामायणातून मिळतात. अशा रामायणाचे नित्य पठण, चिंतन व मनन आजच्या ताणतणावावर निश्चित मार्गदर्शक ठरते. छोट्या गोष्टी, अनेक रम्य चित्रे, त्या चित्रातून संदेश हे या चरित्र रामायणाचे वैशिष्ट्य ठरते. मुलांनाच काय तरुणांना सुद्धा गोष्टी ऐकायला आवडतात आणि या गोष्टीतून साधलेला संवाद जास्त प्रभावी ठरतो. आजच्या संक्रमण काळात आदर्श ठरते, हनुमानाची श्रीरामावरची अगाध निष्ठा. आपल्याला संदेश देते भक्तीचा. शक्ती, युक्ती आणि भक्ती यांचा सुंदर मिलाफ रामायणात आहे. चरित्र रामायणातल्या सगळ्याच गोष्टी बालमनावर निश्चित योग्य परिणाम घडवून आणण्यात यशस्वी ठरतात. माझ्या स्वतःच्या नातवंडाना राम-भरत भेट, जटायू-रावण युद्ध, सेतू बांधा रे सागरी, कुंभकर्णाचा वध या गोष्टी फार भावल्या. मारुतीचे लंकेस उड्डाण ही कथा निष्ठेचा महिमा सांगते व मुलांना फार आवडते. खारीचा वाटा उचलायला मुलांना फार आनंद झाला आणि त्यांच्याकडून निष्ठेने अभ्यास झाला हे पाहून मला खात्री पटली की या कथारूप रामायणाचा निश्चितच योग्य परिणाम साधत येईल. फक्त आपली या मुलांपर्यंत पोचवायची तयारी हवी. वाचनसंस्कृती वर्धिष्णू होण्यासाठी, सद्विचारांची पेरणी करण्यासाठी रामायण हे प्रभावी माध्यम आहे.

संस्कार होतात ते मात्यापित्यांकडून, आजी आजोबांकडून आणि शिक्षकांकडून. या सगळ्यांनी रामायणाचे वाचन, मनन, चिंतन करायला हवे, तर खरे रामराज्य अस्तित्वात येईल. वाचनसंस्कृती समृद्ध करायची जबाबदारी शिक्षक व पालकांचीच नाही तर शिक्षणाशी संलग्न असलेले अधिकारी व राज्यकर्ते यांचीही आहे. शाळाशाळांतून, घराघरांतून हा रामायणाचा संदेश पोचवायला आपण कटिबद्ध होऊ; मग भारत महासत्ता होण्याचे स्वप्न पुरे व्हायला वेळ नाही लागणार.

मोहन सालेकर
विश्वस्त सचिव,
संस्कृति संवर्धन प्रतिष्ठान

अनुक्रमणिका

१.	वाल्या कोळी	१
२.	नारदांचा हितोपदेश	४
३.	वाल्याचा वाल्मीकी झाला	६
४.	शापित दशरथ	९
५.	राजा दशरथाला पुत्रप्राप्ती	१२
६.	विश्वामित्र ऋषींची भेट	१५
७.	विश्वामित्रांचा यज्ञ	१७
८.	सीता स्वयंवर	२०
९.	परशुरामाचे गर्वहरण	२३
१०.	मंथरेचा कुटिल डाव	२५
११.	कैकेयीचा हट्ट	२९
१२.	राम वनवास	३१
१३.	चित्रकूट पर्वतावर	३४
१४.	राम भरत भेट	३८
१५.	जटायू भेट	४१
१६.	शूर्पणखेला अद्दल घडविली	४४
१७.	सीताहरण	४७
१८.	सीता शोधार्थ	५२
१९.	सुग्रीव भेट व वालीचा वध	५७
२०.	सीतेच्या शोधार्थ सुग्रीव सेना	६१
२१.	मारुतीचे लंकेस उड्डाण	६४
२२.	लंकादहन	६९
२३.	रामाचे भेटीस हनुमंत	७३
२४.	रावणवध	७७
२५.	सीतेचे अग्नीदिव्य	८१
२६.	अयोध्येस प्रयाण	८४
२७.	सीतात्याग	८८
२८.	रामावताराची अखेर	९१

१. वाल्या कोळी

तमसा नदीच्या काठावर एक घनदाट अरण्य होतं. जाण्या-येण्यासाठी फक्त छोटीशी पाऊलवाट होती. गर्द उंच झाडांमुळे तेथे सूर्यप्रकाशही अंधूक असायचा. त्यातच दाट झाडीमधून हिंस्त्र श्वापदांच्या डरकाळ्या कानावर पडायच्या! त्यामुळे जाणारा येणारा वाटसरू जीव मुठीत घेऊनच जायचा!

वाल्या याच ठिकाणी वाटमारी करायचा म्हणून लोक त्याला 'वाल्या कोळी' म्हणू लागले.

पुढे वाल्याचे लग्न झाले. मुलंबाळं झाली आणि संसाराचा मेळ बसविता बसविता त्याच्या नाकीनऊ आले. मग काय, वाल्याने या अरण्यातून येणाऱ्या-जाणाऱ्या वाटसरूंना तलवारीचा, कुऱ्हाडीचा धाक दाखवून लुटायला सुरूवात केली. जे प्रतिकार करीत त्यांना तो ठार मारी. लोकांना मारून त्यांच्याकडील मौल्यवान वस्तू, पैसे काढून घेई व त्यातून आपल्या मुलांबाळांच्या आणि पत्नीच्या पोटापाण्याचा प्रश्न सोडवी. एका माणसाला ठार मारलं की घरच्या रांजणात तो एक खडा टाकी. असं करता करता संपूर्ण रांजण खड्यांनी भरला. म्हणजे वाल्याने खूपच लोकांना ठार मारले.

निरपराध लोकांना मारण्यात आपण फार मोठे शौर्य करतो आहोत असं त्याला वाटे. शिक्षण नाही, त्यामुळे चांगले संस्कार नाहीत आणि चांगले संस्कार नाहीत, मग चांगले विचार तरी कसे डोक्यात येणार? पण वाल्याच्या जीवनात लवकरच खूप मोठी क्रांती व्हायची होती. कुकर्माचे दुष्ट चक्र संपायचे होते.

एक दिवस नेहमीप्रमाणे वाल्या जंगलात येणाऱ्या वाटसरूंची वाट पहात बसला होता. अन् अचानक वीणेचे सुरेल स्वर त्याच्या कानावर पडले. हळूहळू आवाज मोठा होत होता. वीणेच्या स्वराबरोबर 'नारायण, नारायण' असे मधुर शब्दही आता कानावर पडू लागले. तो प्रथमच असे गोड शब्द नि स्वर ऐकत होता. क्षणभर तो सुखावला. पण लगेच त्याने मनाला आवरले. त्याने विचार केला, ''नक्कीच कोणीतरी गायक असावा. पण आपल्याला या गाण्याशी काही कर्तव्य नाही. आपण या गायकाला मारूया आणि त्याच्या मौल्यवान वस्तू लुटूया. बस्स!'' एवढ्यात 'नारायण, नारायण' म्हणत नि एका हातात वीणा व दुसऱ्या हाताने चिपळ्या वाजवीत साक्षात् नारदमुनीच तेथे आले.

'ए नारायणाऽ, पुढे कोठे चाललास? इथून कोणीही पुढे जाऊ शकत नाही, समजलास? मी तुला ठार मारणार आहे.'

'अरे, पण का?' नारदांचा प्रश्न.

'माणसे मारूनच मी माझा व माझ्या मुलाबाळांच्या पोटापाण्याचा प्रश्न सोडवितो. माझ्या घरातील रांजण खड्यांनी भरला आहे. त्यात जितके खडे आहेत तेवढी माणसे मी मारली आहेत.'

'अरेरे, फार वाईट. मुलाबाळांचे पोट भरण्यासाठी असंख्य निरपराध लोकांची हत्या करून तू फार मोठ्ठं पाप केलं आहेस.' - नारद.

'पाप? अहो, मी तर माझी मुलबाळं मोठी करण्यासाठी, त्यांच्या सुखासाठीच तर हे सारं करतोय ना?' - वाल्याचा प्रश्न.

'असं म्हणतोस? मग जरा त्यांना जाऊन विचार, म्हणावं माझ्या या मनुष्यहत्येच्या पापात तुम्ही वाटेकरी होणार ना?'

‘ते विचारायला कशाला हवय? मला खात्री आहे ते हो म्हणणारच.’

‘भ्रम आहे तुझा. विचारून तर ये.’

‘म्हणजे इथून पळून जाण्याचा विचार दिसतोय तुझा?’

‘मुळीच नाही. ज्या नारायणाचे मी नाव घेतोय ना, त्याची शपथ घेऊन सांगतो, तू परत येईपर्यंत मी इथेच ‘नारायण,’ ‘नारायण’ जप करत उभा राहतो.’

नारदमुनींच्या बोलण्यावर वाल्याचा विश्वास बसला. तो धावतच घरी गेला.

‘बाबा बाबा, काय आणलत आमच्यासाठी?’ पोरांनी नि बायकोने उत्सुकतेने विचारले.

‘थांबा, मला आधी एका प्रश्नाचे उत्तर द्या. आजपर्यंत तुमच्या पोटापाण्यासाठी, सुखासाठीच मी अनेक माणसांना जीवे मारले. केवळ तुमच्यासाठीच मी हे पाप करत आलो. तेव्हा, या पापात तुम्हीही माझ्याबरोबर वाटेकरी होणार ना?’

‘भलतंच कहीतरी काय विचारताय? आम्ही काही तुम्हाला हे पाप करायला सांगितले नाही. आमचं पालनपोषण करणे हे तर तुमचे कर्तव्यच आहे. मग ते कसं करायचं हे तुम्ही ठरविले. तुम्ही माणसे मारलीत ती काही आम्ही सांगितलं म्हणून नाही. तुमचे कर्म तुमच्यापाशी. तेव्हा तुमच्या पापात वाटेकरी होण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.’

तात्पर्यः

‘सर्व सुखाचे सोबती. दुःखात मात्र कोणी आपले नाही’ हे या घटनेने वाल्या कोळ्यास समजले.

२. नारदांचा हितोपदेश

आपल्या पापात सहभागी होण्यास कोणीही तयार नाही हे पाहून वाल्याला खूप वाईट वाटले. तो हताश होऊन नारदांकडे आला व अगदी काकुळतीने म्हणू लागला.

'मुनिवर्य, तुम्ही माझे डोळे उघडलेत. सगळे सुखाचे सोबती. माझ्या पापाच्या वाट्यात कोणीही भागीदार व्हायला तयार नाहीत. आजवर मी बायकोसाठी, मुलाबाळांसाठी अनेकांचे नाहक बळी घेतले. आता मला पश्चाताप होतोय. मुनिश्रेष्ठ, या पापातून मुक्त होण्यासाठी मला आता मार्ग दाखवा. तुमच्या रूपाने जणू काही देवच मला भेटला आहे.'

तेव्हा नारदमुनी अतिशय प्रेमाने व आश्वासक स्वरात म्हणाले, 'वाल्या, हताश होऊ नकोस. केलेल्या वाईट कर्माचा ज्याला पश्चाताप होतो, तो मनुष्य नक्कीच सुधारतो. आता तू एकच काम कर. एकवचनी, सत्यप्रिय, जनाहित दक्ष अशा श्रीरामाचे अखंड नामःस्मरण कर. योग्य वेळ येताच तुझे कल्याण होईल.'

वाल्याने लगेचच प्रतिज्ञा केली. 'मुनिवर्य, आपल्या आज्ञेचे मी नक्कीच पालन करेन. आजपासून वाटमारीचा धंदा बंद! आता एकच काम अखंड श्रीरामाचे नाव! हे मुनिवर्य मी आपला खूप आभारी आहे.'

'तथास्तु' असे म्हणून 'नारायण, नारायण' म्हणत, वीणेची त्याला साथ देत नारदमुनी पुढील प्रवासास निघून गेले.

तात्पर्यः

थोरामोठ्यांचा हितोपदेश नेहमीच कल्याणकारी असतो.

३. वाल्याचा वाल्मीकि झाला

वाल्याच्या मनाचे परिवर्तन झाले. जंगलात एका झाडाखाली त्याने रामनाम जपण्यास सुरूवात केली. नंतर त्याची एकाग्रता इतकी वाढली की, पुढे त्याची समाधी लागली. तो बाहेरचे जग पार विसरून गेला. मुखातून फक्त रामनामच चालू होते.

बघता बघता अनेक वर्षे उलटून गेली. मुंग्यांनी त्याच्या स्थिर शरीरावर जणू काही हा निश्चल खडकच आहे असे समजून चक्क वारूळच उभारले. त्यात वाल्या कोळी पार बुडून गेला. बाहेरून कोणाला कल्पनाही येणार नाही की या वारुळात एक तपस्वी आहे.

काही वर्षानंतर नारदमुनी त्याच ठिकाणाहून जात असता त्यांच्या कानावर 'राम, राम' अशी नामवाणी ऐकू आली. त्यांनी इकडे-तिकडे पाहिले. हा आवाज वारुळातून येतोय हे त्यांनी ओळखले. वारुळाची माती त्यांनी हलक्या हाताने बाजूला केली. पाहतात तो आत वाल्या कोळी! नारदांनी त्याला समाधीतून अलगद जागे केले आणि म्हणाले,

'वाल्या, ऊठ. तू धन्य झालास. तुझे पाप लयाला गेले. तू पवित्र झालास. यापुढे लोक तुला वाल्मीकि ऋषी म्हणून ओळखतील. तुझी कीर्ती अमर राहील.'

खरोखर वाल्याच्या शरीरावर तपश्चर्येचे तेज झळाळत होते. ज्ञानाची लालसा निर्माण झालेले वाल्मीकि व नारदमुनी यांचे संभाषण सुरू झाले. बोलता-बोलता वाल्मीकिंनी थोर व बुद्धिमान अशा नारदमुनींना विचारले, ''हे श्रेष्ठ मुनि, आता या जगामध्ये अत्यंत गुणी, पराक्रमी, सामर्थ्यशाली, तीक्ष्ण बुद्धिमत्ता असलेला, कृतज्ञ, दृढप्रतिज्ञा, सत्यवचनी, तेजस्वी, सर्व प्राणिमात्रांचे हित जपणारा इतक्या गुणांचे भांडार असणारा असा कोण आहे? महर्षी, मला जाणून घेण्याची खूप इच्छा आहे.''

तिन्ही लोकीचे ज्ञान असलेल्या नारदांनी अत्यंत प्रसन्नतेने सांगितले, 'तू ज्या दुर्मिळ गुणांचे वर्णन केलेस ते सर्व गुण इक्ष्वाकू वंशामध्ये जन्मलेल्या आणि लोकांमध्ये 'राम' या नावाने प्रसिद्ध असणाऱ्या राजामध्ये आहेत.' मग वाल्मीकिंच्या विनंतीला मान देऊन नारदांनी संपूर्ण रामचरित्र त्यांना सांगितले व तेथून त्रिखंडाच्या यात्रेसाठी निघून गेले.

वाल्मीकि ऋषिंनी गंगानदीपासून जवळ असलेल्या तमसा नदीच्या काठावर एक सुंदर झोपडी बांधली. अनेक शिष्य त्यांच्याकडे ज्ञानप्राप्तीसाठी येऊ लागले. एक दिवस स्नानासाठी वाल्मीकि ऋषी बाहेर पडले. क्रौंच पक्ष्यांचे गोड बोलणे ऐकत झाडांच्या छायेतून जात असतानाच अचानक एक क्रौंचपक्षी विव्हळत झाडावरून त्यांच्या पुढ्यात खाली कोसळला. पाठोपाठ त्या पक्षाची सहचारिणी त्याच्याजवळ येऊन अत्यंत व्याकुळतेने त्याच्याभोवती फेऱ्या मारू लागली, व दुःखाने आक्रोश करू लागली. त्या क्रौंचपक्षाला कोणी निषादाने बाण मारला होता. त्याच्या अंगातून रक्त भळाभळा वाहत होते. क्षणातच तो गतप्राण झाला. वाल्मीकिंचे हृदय कळवळले, ते अत्यंत दुःखी झाले व त्या दुःखातिरेकाने ते निषादाला म्हणाले, ''हे निषादा, तुला कधीही शांती मिळणार नाही. कारण क्रौंचपक्षाचा काहीही अपराध नसताना तू त्याची हत्या केलीस.''

हा शाप उत्स्फूर्तपणे त्यांच्या मुखातून बाहेर पडला, तोही संस्कृत भाषेत आणि छंदोबद्ध

रचनेत! पण लगेचच त्यांच्या मनात विचार आला, ''अरेरे, मी या पक्ष्यांच्या दुःखाने पीडित होऊन हे काय बोललो?''

इतक्यात साक्षात् ब्रह्मदेवच त्यांच्यापुढे प्रकट झाले. वाल्मीकि ऋषींनी ब्रह्मदेवाला साष्टांग नमस्कार घातला व घडलेला प्रसंग सांगितला व पुन्हा ते अतिशय चिंतामग्न झाले.

तेव्हा ब्रह्मदेव त्यांना म्हणाले, 'महर्षी, तुम्ही वाईट वाटून घेऊ नका. तुमच्या तोंडून बाहेर पडलेले हे छंदबद्ध संस्कृत वाक्य श्लोकरूप होईल. सरस्वती देवी तुमच्यावर प्रसन्न झाली आहे. आता याच अनुष्टुभ छंदात नारदांकडून ऐकलेले श्रीरामाचे समग्र चरित्र लिहा. त्यामुळे आपली कीर्ती त्रिखंडात पसरेल व तुमचे हे प्रभू रामरायाचे चरित्र सतत सर्व जगाला प्रेरणा देत राहील.'

ब्रह्मदेवांच्या या बोलण्याने वाल्मीकिंचे मन शांत झाले व ब्रह्मदेवाची आज्ञा शिरसावंद्य मानून ध्यानमग्न झाले. त्यांनी खूप चिंतन केले व मग त्यांनी रामायण लेखनास सुरूवात केली व अत्यंत रसाळ-मधुर भाषेत २४,००० श्लोक असलेले संपूर्ण रामायण लिहिले.

तात्पर्यः

राग जिंकायचा असतो. जिंकावा लागतो.

तपश्चर्येने कार्यात यश मिळतेच.

४. शापित दशरथ

हिमालयाच्या दक्षिण बाजूला कोसल नावाचे धनधान्याने संपन्न असे राज्य होते. महाराज मनूने वसविलेली अयोध्या नगरी या समृद्धशाली राज्याची राजधानी होती. या नगरीची रचनाच अशी होती की आत पोहोचून कोणाही शत्रूला युद्ध करणे अशक्य होते. म्हणूनच ती नगरी 'अ-योध्या' या नावाप्रमाणे सार्थ होती.

या सुंदर अयोध्या नगरीत प्रजेचे पालन करण्यात तत्पर असा इक्ष्वाकू कुळातील दशरथ राजा राज्य करीत होता. तो अतिशय शूर होता. अनेक शस्त्र-अस्त्र चालविण्यात तरबेज होता. तो ''शब्धवेधी'' म्हणून प्रसिद्ध होता. प्रजेच्या सर्व सुखसोई पाहण्यात तो कधीही कसूर करत नसे. म्हणून सर्व प्रजा आनंदात होती.

कधीकधी दशरथ राजा अरण्यात शिकारीसाठी जात असे. असाच एक दिवस राजा शिकारीसाठी अरण्यात गेला. पण त्यादिवशी राजाला एकही शिकार मिळाली नाही. राजा उदास झाला. पण 'शिकार मिळाल्याशिवाय राजधानीत परतायचं नाही' असा त्याने निश्चय केला. हळूहळू दिवस मावळला. सर्वत्र अंधार पडू लागला. राजाला एक तळे दिसले. राजाने विचार केला 'या तळ्यात पाणी पिण्यासाठी रात्री नक्कीच एखादे श्वापद येईल. त्याचा पाणी पिण्याचा आवाज आला की आवाजाच्या दिशेने बाण सोडून आपण त्या श्वापदाची सहज शिकार करू शकू' आणि म्हणून तो तळ्याजवळील एका झाडावर चढून स्वस्थ बसून राहिला.

राजाने असे ठरविले तर खरे, परंतु पुष्कळ वेळा आपण ठरवितो एक आणि होतं भलतंच!

त्याचं असं झालं की, त्याच अरण्यात श्रावण नावाचा एक तरुण मुलगा आपल्या आंधळ्या आई-वडिलांना घेऊन आला होता. श्रावण अतिशय मातृ-पितृभक्त होता. त्याच्या आई-वडिलांना काशीला जाण्याची इच्छा होती. ही त्यांची इच्छा पूर्ण करण्यासाठीच श्रावण त्यांना घेऊन निघाला होता.

आईवडिलांची सेवा करण्यासारखे मोठे पुण्यकर्म नाही असे तो मानीत असे. म्हणून श्रावण त्यांना आपल्या खांद्यावर कावडीत घेऊन पायीच तीर्थयात्रेला निघाला होता. यात्रा पूर्ण करून परतत असताना विश्रांतीसाठी तो या अरण्यात एका झाडाखाली थांबला. थोड्यावेळाने त्याचे आईवडील श्रावणास म्हणाले, ''बाळा, फार तहान लागलीय रे, कुठं पाणी मिळतं का बघ बरं.''

तशा अंधारात श्रावण पाण्याच्या शोधार्थ निघाला. सुदैवाने जवळच तळे दिसल्याने तो आनंदला. पाणी भरून घेण्यासाठी त्याने त्याचा तांब्या तळ्यात बुडविला. तांब्या बुडविताना बुडबुड असा आवाज झाला. तो आवाज झाडावर बसलेल्या राजा दशरथाने ऐकला. नक्कीच श्वापद आलं असं समजून दशरथाने आवाजाच्या दिशेने बाण सोडला.

बाण सुटतो न सुटतो तोच, ''आई ऽऽ गं, मेलो मेलो' असे एका माणसाचे आर्त बोल त्याच्या कानी पडले. 'अरे रे, श्वापदाऐवजी आपण कुणातरी निष्पाप माणसाची शिकार केली' हे राजाच्या चटकन ध्यानी आले. तो धावतच तिकडे गेला. पाहतो तो एक तरुण छातीत बाण घुसल्यामुळे विव्हळत काठावर पडलेला होता.

''अरेरे, किती पापी मी! बाळ तू कोण? कुठला? एवढ्या रात्री अरण्यात कशाला आला होतास?'' राजाने त्या तरुणाला भराभर प्रश्न विचारले.

''मी श्रावण. माझ्या आईवडिलांना तीर्थयात्रा करवून आम्ही घराकडे परत निघालो होतो. आईवडील वृद्ध व आंधळे असल्याने मी त्यांना कावडीत बसवून प्रवास करीत होतो. त्यांना तहान लागल्याने मी पाणी आणण्यास आलो होतो. आता मी वाचणे शक्य नाही. पण माझे आईबाबा तहानलेले आहेत. कृपा करून त्यांच्यासाठी आपणच पाणी घेऊन जा.'' एवढे बोलून श्रावणबाळाने आपले प्राण सोडले.

दशरथ अत्यंत दुःखी मनाने श्रावणाच्या आई-वडिलांजवळ जाऊन उभा राहिला. ''बाळ, तू आल्याचे आम्हास कळले. मिळाले का पाणी? आण ते इकडे. खूप तहान लागलीय. अरे, तू असा गप्प का? आमच्या हातून काही अप्रिय घडले असले तरी मनाला लावून घेऊ नकोस. आम्ही अंध असून तूच आमचे नेत्र आहेस. आमचे प्राण तूच आहेस. तू बोलत का नाहीस?

दशरथ राजाला हुंदका आवरेना. त्याच्या डोळ्यातून घळाघळा अश्रू वाहू लागले. ''मी... मी श्रावण नाही. मी राजा दशरथ. मी तुमचा घोर अपराधी आहे. तळ्यावर कोणी श्वापद आलंय अस' समजून शिकारीच्या आशेने मी बाण सोडला व अजणातेपणे माझ्या हातून आपल्या सुपुत्राचा वध झाला. मला क्षमा करा.''

''हे राजा, तुझ्या हातून असे अघोरी कृत्य व्हावे? अरे, तू तर आमचीच शिकार केलीस. या दुष्कृत्याचा भोग तुला भोगावा लागेल. तूही असाच पुत्रशोकाने आपल्या मुलाचा धावा करीत करीत मरशील. दशरथा, आता या जगात जगण्यासारखे आमच्यासाठी उरलंय तरी काय? श्रावणबाळा, या आंधळ्या आईबापांना अर्ध्या वाटेवर सोडून तूच आमच्या आधी निघून गेलास.''

श्रावणाच्या मृत्यूने दुःखित झालेल्या त्या दोघांचेही लवकरच प्राणोत्क्रमण झाले.

आपल्या हातून फार मोठं पाप घडलं या अपराधी भावनेने व्यथित झालेला राजा दशरथ अयोध्या नगरीत परत आला.

तात्पर्यः

सर्व काही अनुकूल असूनही एखादे तरी दुःख प्रत्येकाच्या वाट्याला येतच असते.

काही काही गोष्टी कल्पना नसताना अचानकपणे हातून घडून जातात त्यालाच नियती म्हणतात. दशरथाच्या हातून श्रावण बाळाला मृत्यू यावा ही घटना म्हणजे नियतीचा खेळ असंच म्हणायला हवं.

मातृपितृ प्रेमाचे आदर्श उदाहरण म्हणजे श्रावण बाळ!

५. राजा दशरथाला पुत्रप्राप्ती

वेदवेत्ता, पापभीरू, अतिरथी असा दशरथ राजा न्यायाने राज्य करून सर्व प्रजेला सुखी ठेवत असे. सर्वांची दशरथावर अपार भक्ती होती. राजा दशरथाला कौसल्या, सुमित्रा व कैकेयी अशा, तीन सुंदर व सद्‌गुणी राण्या होत्या. या राण्यांचेही दशरथावर खूप प्रेम होते. एवढे ऐश्वर्य वगैरे असूनही एक शल्य दशरथाच्या मनात सतत खुपत होते. संतान नसल्याची उणीव दशरथाला सतत अस्वस्थ करीत असे.

शेवटी एके दिवशी दशरथाने सर्व श्रेष्ठ ऋषींना-मुनींना बोलाविले व अत्यंत नम्रतेने सांगितले, ''गुरुजनहो, मला संतान नसल्यामुळे माझ्या मनाला असह्य वेदना होत आहेत. पुत्रप्राप्तीसाठी मी काय करू ते आपण सांगावे.'' तेव्हा मुनिवर्य वसिष्ठ म्हणाले, ''हे राजा, तू पुत्रकामेष्टी यज्ञ कर. यज्ञनारायण प्रसन्न होऊन तुझे मनोरथ पूर्ण करेल.''

वसिष्ठांची आज्ञा शिरसावंद्य मानून लगेच राजाने यज्ञाची तयारी सुरू केली. त्यासाठी शरयू नदीच्या तीरावरील भूमी नक्की केली. सर्व राजे, महाराजे, ऋषितुल्य मुनीजन इत्यादी सर्वांना आमंत्रणे केली. जेवणाची, निवासाची उत्तम सोय केली. दानधर्म सढळ हाताने केला. त्या यज्ञभूमीचे रात्रंदिवस रक्षण करण्यासाठी शूर, सशस्त्र सैनिक ठेवले.

शुभमुहूर्त पाहून अत्यंत शास्त्रोक्त पद्धतीने यज्ञास सुरुवात झाली. राजा आपल्या तीनही राण्यांसह यज्ञास बसला. मंत्रोच्चारांनी वातावरण भारावून गेले. यज्ञकुंडात हवनावर हवने देण्यात येऊ लागली. यज्ञकुंडातील पवित्र केशरी ज्वाळांच्या तेजाने आसमंत उजळून निघाला. सर्व वातावरणात मंगलमयता निर्माण झाली. यज्ञ यथासांग पूर्ण होत आल्यावर पुत्रकामेष्टीचे मंत्र म्हणण्यास सुरूवात झाली. यज्ञात आहुती पडू लागल्या आणि थोड्याच अवधीत यज्ञकुंडातून तेजोनारायण भासावा असा एक दिव्य पुरुष प्रकट झाला. त्याच्या हातात सुवर्णपात्र होते. ते पात्र पायसाने परिपूर्ण भरले होते.

त्या तेजोनारायणाने ते पात्र दशरथाच्या हाती देत म्हटले, ''राजा मी प्रसन्न आहे, संतुष्ट आहे. या सुवर्णपात्रातील देवांनी बनविलेले हे पायस तू तुझ्या राण्यांना प्रसाद म्हणून प्यायला दे. त्यामुळे तुला चार सुलक्षणी पुत्र होतील.'' असे म्हणून व सुवर्णपात्र राजाच्या हाती देऊन तेजोनारायण अदृश्य झाला.



राजाने प्रसन्न मनाने त्या सूवर्णपात्रातील पायस आपल्या तीनही राण्यांना वाटून दिले. राण्या सुखावल्या. तीनही राण्यांना दिवस राहिले. चैत्र शुद्ध नवमीस प्रथम कौसल्या राणी प्रसूत होऊन मुलगा झाला. त्याचे नाव 'राम' असे ठेवण्यात आले. (राम म्हणजे संतुष्ट करणारा, आनंद देणारा) पाठोपाठ सुमित्रेस 'लक्ष्मण' आणि 'शत्रुघ्न' व कैकेयीस 'भरत' असे मुलगे झाले. सर्व अयोध्यानगरीत आनंदी आनंद झाला. मंजुळ वाद्यांचा व जयजयकारचा उद्‌घोष झाला. अयोध्यानगरी दिव्यांच्या झगमटाने लखलखली. गोरगरिबांना अन्नदान केले गेले.

पुत्रप्राप्तीमुळे राजा स्वतः तर खूप आनंदित झालाच, पण मातृत्वाचे परमसुख लाभल्यामुळे सर्व राण्यांच्या चेहऱ्यावरही प्रसन्नता दिसू लागली. रघुकुलाची प्रतिष्ठा वाढली.

राजपुत्रांना सर्व तऱ्हेचे शिक्षण देऊन तयार करणे हे प्रत्येक राजाचे कामच असे. दशरथ राजानेही थोर गुरुंच्या मार्गदर्शनाखाली राम, लक्ष्मण, भरत व शत्रुघ्न यांना सर्व विद्यांत पारंगत केले. विशेषतः श्रीरामांची बुद्धी अतिशय तीव्र होती. शस्त्रविद्या, राजविद्या, धनुर्विद्या,

शिकार करणे, घोड्यावर बसणे, रथयुद्ध, गजारोहण, वेद, शास्त्रे व त्याकाळी आवश्यक असणाऱ्या अन्य सर्व कलांतही प्रवीण केले.

या चारही भावाभावांचे संबंध अतिशय प्रेमाचे होते. त्यातही लक्ष्मणाचे रामावर खूप प्रेम होते. रामाशिवाय त्याला चैन पडत नसे.

कौसल्या, सुमित्रा, कैकेयी या तीन राण्यांनाही एकमेकींबद्दल खूप जिव्हाळा होता. सर्वजणी स्वतःच्या मुलाप्रमाणे दुसरीच्या मुलांवरही खूप प्रेम करायच्या. राम सर्वात वडील भाऊ म्हणून सारे बंधू त्याला मोठा मान देतच, पण कौसल्येप्रमाणे सुमित्रा व कैकेयी याही रामावर स्वतःच्या मुलाप्रमाणेच खूप प्रेम करीत होत्या.

मुलं मोठी झाली. सुदृढ बांधा, सुंदर रूप आणि उत्तम गुण यामुळे ती सर्वांची आवडती झाली. राम सर्वात मोठा. प्रजाजनांशी तो फारच प्रेमाने वागे. त्यांच्या सुखदुःखाची विचारपूस करी. 'मी राजपुत्र' अशा खोट्या अहंकाराचे यत्किंचितही दर्शन त्याच्या वागण्यातून दिसत नसे. तो नम्रतेने सर्वांची मनं जिंकून घेई. काही वर्षांनी राम आपलं राज्य सुरळीत चालवील असा विश्वास दशरथ राजालाही वाटू लागला.

तात्पर्य:

सावत्र मुलांवरील पोटच्या मुलाप्रमाणे प्रेम करण्याचा मोठेपणा दशरथाच्या सर्व राण्यांमध्ये प्रामुख्याने वसत होता.

बंधुप्रेमाचे आदर्श उदाहरण म्हणजेच राम-लक्ष्मण-भरत-शत्रुघ्न यांचे परस्परांवरील प्रेम.

६. विश्वामित्र ऋषींची भेट

एकूण सगळं काही मनासारखं घडत असताना एक दिवस कठोर व्रताचे पालन करणारे, तेजाने तळपणारे तपस्वी विश्वामित्र दशरथ राजाकडे आले. राम पराक्रमी, प्रेमळ, विनयशील आहे अशी रामाची कीर्ती विश्वामित्र ऋषींच्या कानावर गेलीच होती. विश्वामित्र ऋषींना पाहून दशरथ राजा आनंदित झाला.

'महर्षींचा विजय असो. मुनिवर्य, आपल्या येण्याने मी खूप आनंदित झालो आहे. आपल्या आगमनाचे कारण कळेल काय? मी आपल्या इच्छेची पूर्तता करण्यात स्वतःला धन्यच मानेन. सांगावे महर्षी, आपल्या येण्याचे प्रयोजन.'

'दशरथा, या पृथ्वीतलावर सुख, शांती नांदावी या स्तुत्य हेतूने मी एक यज्ञ आरंभिला होता. पण विध्वंसक राक्षसांनी त्या यज्ञात विघ्ने आणून माझ्या यज्ञाचा बेत तडीस नेऊ दिला नाही.'

‘ठीक आहे महर्षी, त्या राक्षसांचा निःपात करण्यासाठी मी माझ्या सैन्यासह आपणाबरोबर येतो.’

‘नाही दशरथा, तू तुझे सैन्य घेऊन येण्यापेक्षा तुझा पुत्र राम याला माझ्याबरोबर पाठव. त्याच्या येण्याने माझा यज्ञ सुरळीत पार पडेल याची मला खात्री आहे.’

‘महर्षी, राम अजून सोळा वर्षांचाही झाला नाही. तो लहान आहे. बलाढ्य-मायावी राक्षसांबरोबर लढाई करणे सोपे नाही. जिथे माझ्यासारख्या युद्धनिपुण माणसालाही या बलाढ्य राक्षसांशी लढत देणे अवघड जाते, तिथे राम त्यांना कसे तोंड देऊ शकतील? महर्षी, मला भीती वाटते. या माझ्या कोवळ्या मुलाला नेण्याचा आग्रह आपण सोडावा. मी स्वतः विपुल सैन्यानिशी आपणाबरोबर यायला तयार आहे.’

‘राजा, दिलेला शब्द पाळणे ही रघुवंशाची रीत मोडून तू अनिष्ट प्रथा पाडीत आहेस. लक्षात ठेव, ही गोष्ट तुला लांछनास्पद ठरेल. माझे स्वागत करताना तू काय शब्द उच्चारलेस त्याची तरी आठवण ठेव. ‘आपल्या इच्छेची पूर्तता करण्यात मी स्वतःला धन्य मानेन.’ या उद्गाराची एवढ्यातच तुला विस्मृती झाली? राजा दशरथा, माझे म्हणणे तुला मान्य करायचे नसेल तर मी असाच निघून जातो. मात्र एक ध्यानात ठेव...’

‘महर्षी, असे रागावू नका. केवळ पुत्रप्रेमापोटी नि त्याच्या वयाची व अनुभवाची गोष्ट लक्षात घेऊनच मी आपणास ही सूचना केली.

शब्द मोडण्याचा यत्किंचितही विचार माझ्या मनात नाही.’

तेवढ्यात राजगुरु वसिष्ठ दशरथाला कळकळीने म्हणाले, ‘पुत्रप्रेमामुळे रघुकुलाच्या कीर्तीचा क्षय होऊ देऊ नकोस. श्रीरामासारखे शस्त्रास्त्र कौशल्य आज त्रिभुवनात कोणाजवळही नाही. शिवाय स्वतः विश्वामित्र पाठीशी असताना रामाला कोणापासूनही भय नाही.’

हे ऐकून दशरथाला धीर आला व त्याने राम व लक्ष्मण दोघांनाही अगदी प्रसन्नचित्ताने कुशिकनंदन विश्वामित्रांकडे सोपविले.

तात्पर्यः

चांगल्या कामातही विघ्न निर्माण करणारी माणसे सर्वत्र असतातच.

‘शब्दाला जागणे’ ही रघुकुलाची रीतच होती.

७. विश्वामित्रांचा यज्ञ

मातापित्यांना वंदन करून राम-लक्ष्मण विश्वामित्र ऋषींबरोबर निघाले. शरयू नदीच्या तीराने ते जात होते.

राम-लक्ष्मणांना निसर्गाच्या सान्निध्यात हा प्रवास, हे अनोखे जग पाहून आनंद वाटत होता. थोडं दूर गेल्यावर विश्वामित्र रामाला म्हणाले, 'वत्स रामा, आता शरयूच्या पाण्याने आचमन कर. बला आणि अतिबला या दोन महाविद्यांचा तू स्वीकार कर. संपूर्ण जगाचं रक्षण करण्यासाठी या दोन विद्या शिकून घे. तू निद्रिस्त किंवा बेसावध असतानाही राक्षस तुझ्यावर हल्ला करू शकणार नाहीत. या विद्या शिकल्यावर तुझी कोणी बरोबरी करू शकणार नाहीत. तुझ्यात या दोन्ही विद्या प्राप्त करण्यासाठी सर्व उत्तम गुण आहेत. म्हणून मी तुला या विद्या शिकवीत आहे.'

तेव्हा श्रीरामाने आचमन करून प्रसन्न मनाने विश्वामित्रांकडून दोन्ही विद्यांचे ग्रहण केले. काही काळ चालल्यावर त्यांना एक भयंकर जंगल दिसले.

विश्वामित्र म्हणाले. 'पूर्वी येथे संपन्न असे देश होते. परंतु भयानक चेहऱ्याच्या अवाढव्य शरीर असलेल्या, हजार हत्तींचे बळ असलेल्या क्रूर त्राटिका राक्षसिणीने व तिच्या अतिक्रूर मारीच मुलाने हा संपूर्ण प्रदेश उजाड केला आहे. हे दोघेही माणसांना मारून खातात व त्यामुळे या अरण्यात वस्ती करण्याचे कोणाचेही धाडस होत नाही. तेव्हा हे रामा, तू आपल्या बाहुसामर्थ्याने त्या दुराचारिणीला मारून टाक व हा संपूर्ण प्रदेश निष्कंटक व पुन्हा रमणीय कर.'

हे ऐकून रामाने विचारले, 'महर्षी, मी तिला मारू शकेन अशी मला खात्री आहे. पण एक शंका आहे, स्त्रीहत्या हे पाप तर ठरणार नाही ना?'

'जी असंख्य निरपराध माणसांना ठार मारून खाते अशा दुष्ट स्त्रीचा-राक्षसीचा वध करणे पाप नसून पुण्यकर्मच आहे.'

हे विश्वामित्रांचे बोल ऐकल्यावर शत्रूदमन रामाने धनुष्याच्या प्रत्यंचेवर तीव्र टणत्कार केला. त्या आवाजाने सर्व दिशा निनादल्या. त्या आवाजाने त्राटिकाही अत्यंत क्रोधित झाली आणि आवाजाच्या दिशेने पळत निघाली. तिचे या तिघांकडे लक्ष गेले आणि त्यांना ठार करून फाडून खाण्याच्या निश्चयाने ती चवताळून त्यांच्या अंगावर धावली. राम सावध होताच. रामाने

चपळाईने धनुष्यास बाण लावून तिच्या अंगावर सोडला आणि क्षणात त्याने तिचे हात छाटून टाकले. तशी ती अधिकच चवताळली. लक्ष्मणाने रागाने तिचे नाक व कान कापून टाकले व श्रीरामांनी दुसऱ्या बाणाने तिची छाती चिरून टाकली आणि क्षणातच त्राटिका गतप्राण झाली.

सर्व अरण्यवासियांनी सुटकेचा श्वास सोडला. रामाला असंख्य धन्यवाद दिले. विश्वामित्रांनी आनंदित होऊन श्रीरामाला अनेक दिव्यास्त्रे दिली. त्राटिकेचे मोठेच संकट संपले होते. आता यज्ञ तेवढा निर्विघ्नपणे पार पडायला हवा होता. थोड्याच दिवसांत ते तिघेही यज्ञाच्या ठिकाणी येऊन पोहचले. प्रज्ञावंत ऋषिमुनी देशोदेशीहून तिथे जमा झाले होते.

सुमुहूर्त पाहून विश्वामित्रांनी नव्याने यज्ञास सुरूवात केली. यज्ञात विघ्न येऊ नये म्हणून राम लक्ष्मणास रक्षक म्हणून यज्ञद्वारावर नेमले.

मंत्रघोषाच्या गंभीर व मंगलमय उच्चाराने वातावरण पवित्र झाले. यज्ञाचे पाच दिवस पूजा-अर्चा, होम-हवन इत्यादी विधींनी यथोचित पार पडले. सहावा दिवस यज्ञ समाप्तीचा होता.

राम व लक्ष्मण सावध होतेच. एवढ्यात त्राटिकेचा मुलगा मारीच व त्याचा मित्र सुबाहू यांनी असंख्य राक्षसांसहित यज्ञभूमीवर हल्ला करण्यास सुरूवात केली. परंतु रामाने बाणांच्या वर्षावाने राक्षसांना यम लोकाची वाट दाखविली. तुफान रणकंदन सुरू होते. सर्व परिसर राक्षसांच्या प्रेतांनी भरून गेला होता.

इकडे विप्र मंडळी यज्ञ समाप्तीचा सोहळा शास्त्रशुद्ध पद्धतीने पार पाडीत होती. यामुळे चिडून जाऊन मारीच व सुबाहू रामावर चालून आले. त्यांना आपल्या सामर्थ्याचा गर्व होता. या छोट्या युवकांना आपण सहज ठार करू असा त्यांना विश्वास होता. पण रामाच्या बाणांचा, अस्त्रांचा वर्षाव एवढा प्रखर होता की एका बाणाने सुबाहूचा कंठच फाडला व तो तत्क्षणी गतप्राण झाला, तर मारीच मात्र शीतेषू नावाच्या मानवास्त्राने एवढा लांब उडाला की तो पार समुद्रात जाऊन पडला.

यज्ञसोहळा अत्यंत शांतपणे व सर्वांना अतीव आनंद देत पार पडला. रामाच्या उपस्थितीमुळे, वीरतेमुळे आपला यज्ञ निर्विघ्नपणे समापति झाला, याची जाणीव सर्वांना होती आणि त्यामुळेच सर्वांनी राम लक्ष्मणाचे प्रचंड कौतुक केले. त्यांना मनापासून धन्यवाद दिले, आशीर्वाद दिले. विश्वामित्र ऋषींनाही परम आनंद झाला. समाधान वाटले. कारण राम-लक्ष्मणाना बरोबर आणण्याचे सार्थक झाले.

तात्पर्यः

निष्पाप लोकांचे बळी घेणारी व्यक्ती स्त्री असो की पुरुष असो तिला ठार मारणे पाप ठरत नाही.

तरुणपणातच रामाच्या कर्तृत्वाची योग्यता ऋषीमुनींच्याही लक्षात आली होती.

८. सीता स्वयंवर

राम-लक्ष्मणांच्या उपस्थितीत विश्वामित्र ऋषींचा यज्ञ तर सुरळीत पार पडलाच, पण राक्षसांचा निःपात केल्यामुळे असंख्य जनांच्या मनातील भीतीही नाहिशी झाली.

दुसऱ्या दिवशी प्रातःकाळी राम-लक्ष्मण विश्वामित्रांना म्हणाले, 'आम्ही आपली काय सेवा करू? आपण आज्ञा करावी.'

विश्वामित्र म्हणाले, 'आता मिथिला नगरीचा राजा जनक एक मोठा यज्ञ करणार आहे. तर आपण तिथे जाऊ या. जनकाच्या कोणत्या तरी पूर्वजाला देवांनी अतिशय सुंदर, अद्‌भुत असे महाधनुष्य दिले. ते राजर्षी जनकाने मोठ्या श्रद्धेने जतन करून ठेवले आहे. तू एकदा त्या धनुष्याचे दर्शन घ्यावेस असे मला वाटते.'

विश्वामित्रांची इच्छा शिरसावंद्य मानून रामलक्ष्मण त्यांच्याबरोबर जनकाच्या यज्ञ-भूमीकडे निघाले. मार्गक्रमण करत असताना विश्वामित्रांनी श्रीराम लक्ष्मणांना अनेक राजकुळांची माहिती सांगत होते. अनेक स्थळांचे भौगोलिक-ऐतिहासिक महत्त्व सांगत होते. त्यामुळे ते कधी मिथिलेला पोहचले हेच कळले नाही.

विश्वामित्र ऋषिंना बघून जनकराजाने अतिशय आनंदाने व आदरपूर्वक त्यांचे स्वागत केले व 'आपल्याबरोबर आलेले हे दोन तेजस्वी युवक कोण' अशी त्यांनी विचारणा केली. तेव्हा विश्वामित्रांनी इक्ष्वाकूवंशीय रामलक्ष्मणाची माहिती सांगून त्यांचा पराक्रमही वर्णिला.

हे ऐकून जनकाने अत्यंत नम्रपणे विचारले, 'भगवान्, मी आपल्याला आनंद होईल असे काय करू ते सांगावे.'

विश्वामित्र म्हणाले, 'हे राजा, तुझ्याजवळील अद्वितीय, देवदुर्लभ शिवधनुष्य पाहण्याची या राजकुमारांची इच्छा आहे.'

क्षणभर विचार करून जनक म्हणाले, 'माझ्या पूर्वजांना भगवान् शंकरांकडून हे धनुष्यरत्न मिळाले. मी ते जतन करून ठेवले आहे. एक दिवस मी यज्ञासाठी भूमिशोधन करताना शेतात नांगर चालला होता. त्यावेळेस नांगराच्या उकरल्या गेलेल्या जमिनीतून एक कन्या प्रकट झाली. सीतेतून (नांगरण्यामुळे खेचलेल्या रेषेतून) निर्माण झाल्यामुळे तिचे नाव सीता ठेवले. ती मला खूप प्रिय असून आता ती विवाहयोग्य झाल्यामुळे मी असा निश्चय

केला की जो आपल्या पराक्रमाने हे धनुष्य उचलेल त्याच्याबरोबर मी सीतेचा विवाह करून देईन. सीतेची मागणी करणाऱ्या सर्व राजांना मी हेच सांगितले. तेव्हा अनेक राजे मिळून मिथिलेत आले. पण त्यातील कोणीही धनुष्य हलवूही शकले नाहीत. तेव्हा त्यांची चांगलीच फजिती झाली. पण त्यामुळे चिडून त्या सर्व राजांनी माझ्या नगरीवर सैन्यासहित आक्रमण केले. शंकराच्या कृपेमुळे मी त्या सर्वांचा पराभव करू शकलो. श्रीरामाला हे परमप्रकाशमान शिवधनुष्य दाखविण्यास मला अत्यंत आनंद वाटत आहे. श्रीरामांनी जर या धनुष्याची प्रत्यंचा चढविली तर माझी कन्या सीता या दशरथकुमारास देईन.' एवढे बोलून राजा जनकाने असंख्य दूतांकरवी आठ चाकाच्या गाडीवर एका भल्या मोठ्या पेटीत ठेवलेले धनुष्य खेचून आणवले.



विश्वामित्रांनी श्रीरामास ते धनुष्य बघण्यास सांगितले. तेव्हा श्रीरामांनी 'ठीक आहे, मी या दिव्य धनुष्याला प्रत्यंचा लावायचा प्रयत्न करतो.' असे म्हटल्यावर 'हो, असेच कर' असा मुनींचा आदेश मिळाल्यावर श्रीरामांनी ते अलगद उचलून त्याला प्रत्यंचा लावली व

महाभयंकर ध्वनी होऊन ते तुटले. तेथे उपस्थित असलेल्या असंख्य लोकांना सुखद आश्चर्याचा धक्का बसला.

तेव्हा अत्यानंदित झालेले जनक हात जोडून विश्वामित्रांना म्हणाले की, ‘भगवान, मी दशरथनंदन श्रीरामाचा पराक्रम आज मी प्रत्यक्ष पाहिला. माझी मुलगी सीता जनकवंशाच्या कीर्तीचा विस्तार करेल. मला प्राणापेक्षाही प्रिय असलेली सीता मी श्रीरामांना अर्पण करीत आहे. याकरिता आपली अनुमती असेल तर महाराज दशरथांची या विवाहासाठी आज्ञा घेण्यासाठी मी माझ्या सचिवांना अयोध्येत पाठवू इच्छितो व दशरथांना शीघ्रात शीघ्र येथे येण्याची विनंती करतो.’

विश्वामित्रांची संमती घेऊन जनकाचे सचिव दशरथराजाकडे पोहोचले. मिथिलेचे वृत्त ऐकताच दशरथाला खूप आनंद झाला. गुरु वसिष्ठांनांही मोठी धन्यता वाटली. दुसऱ्याच दिवशी प्रातःकाळी शुभमुहूर्तावर चतुरंग सेनेसह दशरथ आणि त्याचा परिवार निघाला. महाराज दशरथाने निरनिराळी बहुमोल रत्ने, मौक्तिके, सुवर्णमुद्रा इत्यादी विपुल खजिनाही आपल्याबरोबर घेतला.

मिथिला नगरीत त्यांचे राजा जनकाने अभूतपूर्व असे स्वागत केले. नंतर मोठ्या थाटामाटात राम व सीता यांचा विवाहसोहळा संपन्न झाला. यांच्या विवाहाबरोबरच लक्ष्मण, भरत व शत्रुघ्न यांचीही लग्ने झाली. दशरथ राजालाही खूप आनंद झाला. जनक राजाला दशरथाच्या घराण्याशी संबंध जोडण्यात परम समाधान वाटले. त्याने आपली दुसरी कन्या उर्मिला ही लक्ष्मणास दिली. तसेच स्वतःच्या भावाच्या दोन मुली मांडवी व श्रुतकीर्ति यांची लग्ने भरत व शत्रुघ्न यांच्याशी लावून दिली. तेव्हा मंजुळ वाद्यघोष करण्यात आला. गायक-गायिकांनी सुस्वर गीते गायली. नर्तक-नटांनी स्वतःच्या कलागुणांनी सर्वांची मने जिंकली. विपुल दानधर्म करण्यात आला.

विवाह समारंभानंतर दुसऱ्या दिवशी राजा दशरथाने जनकाचा निरोप घेतला व अत्यंत संतुष्ट मनाने सर्व मुलासुनांसह अयोध्येस परत जायला निघाला.

तात्पर्यः

रामाचे यश म्हणजे चारित्र्यसंपन्न, शक्तिगर्वरहित पराक्रमाचे यश.

९. परशुरामांचे गर्वहरण

राजा दशरथ आपले चारही पुत्र, सुना, बंधूबांधव, ऋषिगण, सैन्यासह अत्यंत समाधानात व आनंदात मिथिलेहून अयोध्येला जाण्यास निघाला. काही अंतर गेल्यावर अचानक धुळीची वावटळ उठली. राजाचे सैन्य धुळीने आच्छादले गेले. तेव्हा राजाने बघितले की जमदग्निपुत्र परशुराम समोरून येत आहेत. त्यांच्या मस्तकावर मोठमोठ्या जटा होत्या. खांद्यावर परशू व हातात विद्युत्कणांप्रमाणे प्रकाशमान धनुष्य व बाण घेऊन ते येत होते. प्रज्वलित अग्नीप्रमाणे ते भयानक दिसत होते.

उग्रप्रकृती परशुराम श्रीरामाकडे निरखून पाहत अत्यंत कठोर स्वरांत बोलू लागले. 'तू दाशरथि राम काय? शिवधनुष्याचा भंग तूच केलास ना? ते धनुष्य तोडणं अद्‌भुत व अचिन्त्य आहे. परंतु ते धनुष्य शिथिल होते. आता तू मी आणलेले हे भयंकर आणि विशाल धनुष्य खेचून बाण चढवून दाखव. जर तू यशस्वी झालास तर मी तुझ्याशी द्वंद्वयुद्ध करेन.'

हे सर्व ऐकत असताना दशरथराजा तर अतिशय घाबरला. अगदी दीनवाण्या स्वरात म्हणाला, 'महर्षी, तुम्ही एवढे प्रतापी! तुम्ही पृथ्वी निःक्षत्रिय केलीत तुमच्यासमोर राम केवढासा लहान! तुमचा राग रामावर आहे. पण जर रामाला तुम्ही मारलेत तर आम्ही सर्वजण जीवनाचा त्याग करू.'

राजा दशरथाच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करीत परशुराम कठोर शब्दात बोलू लागते. श्रीरामाने लीलया शिवधनुष्य मोडले हे वृत्त त्यांना अशक्य वाटत होते. ते भयंकर संतापले होते. आपल्यापेक्षा कोणी पराक्रमी असूच शकत नाही असा अहंकार त्यांच्या मनात ठासून भरला होता.

तेव्हा राम नम्र परंतु दृढ स्वरात म्हणाला, 'मी क्षत्रियधर्माचे पालन करतो. वडील, इतर ऋषी व आपण यांच्यासमोर मी नम्रतेनेच बोलतो. परंतु आपण मला पराक्रमहीन आणि असमर्थ मानून माझा तिरस्कार करीत आहात. ठीक आहे तर माझं तेज आणि पराक्रम पहाच.' असे म्हणून प्रभावशाली श्रीरामाने ते वैष्णव धनुष्य हातात घेऊन लीलया बाण लावला. तेव्हा हे पाहताच परशुराम एकदम निस्तेज झाले. त्यांच्या शरीरातले सर्व सामर्थ्य नष्ट झाले.

परशुरामांचा अहंकार गळून गेला. त्यांनी रामाचे श्रेष्ठत्व मोठ्या मनाने मान्य केले. श्रीरामानेही परशुरामांचे पूजन केले व परशुराम लगेच तपश्चर्या करण्यासाठी निघून गेले.

नंतर श्रीरामांनी वसिष्ठादी ऋषिंना वंदन केले व पिता दशरथाकडे गेले. महाराज दशरथ आधी खूप घाबरले होते. परंतु आता पुत्राच्या पराक्रमाने ते दिपून गेले होते व रामाचा जणूकाही पुनर्जन्मच झाला आहे असे मानून ते अत्यानंदित झाले व आता लगबगीने अयोध्येकडे जायला निघाले.

तात्पर्यः

खरं शौर्य लपून राहात नाही. त्याचा प्रत्यय केव्हाही अनुभवास येतोच. शौर्य असेल तरी त्याचा उपयोग दुष्टांच्या संहारासाठीच करावा.

अंगी शौर्य असले तरी अहंकार नसावा.

१०. मंथरेचा कुटिल डाव

असेच आनंदात दिवस जात होते. परंतु आता दशरथाला वृद्धत्वामुळे राज्याची चिंता वाटायला लागली. त्याचे चारही पुत्र कर्तृत्ववान होते. परंतु राम सर्व मुलांत जेष्ठ व गुणांनीही श्रेष्ठ होता. श्रीराम पराक्रमात यम व इंद्राप्रमाणे, बुद्धीत बृहस्पतीप्रमाणे आणि धैर्यात पर्वताप्रमाणे होता. श्रीराम सर्व लोकांच्या सुखाची इच्छा करायचा व सर्वांशी प्रेमाने व आदराने वागायचा, म्हणून तो प्रजेचा अत्यंत आवडता होता. तेव्हा श्रीरामालाच राज्याभिषेक करावा असा विचार दशरथराजाच्या मनात प्रबळ झाला.

दशरथ राजाने वसिष्ठ ऋषी, मंत्रिमंडळ, सेनापती, नगरातील जेष्ठ-श्रेष्ठ व्यक्तिंना राजसभेत बोलाविले. सर्वजण राजसभेत उपस्थित झाल्यावर राजाने आपले मनोगत सांगण्याला सुरवात केली. ''गुरुजन व सभ्य जनहो, आपल्याला माहितच आहे की, या राज्याच्या संरक्षणाची धुरा मी फार काळापासून वाहतो आहे. आता हा भार सहन करून मी थकलो आहे. प्रजेचे हित साधण्यात मी हे शरीर वृद्ध केले आहे. आता प्रजाजनांच्या हितासाठी बलपराक्रम संपन्न, सर्व कार्यामध्ये कुशल, धर्मात्म्यांमध्ये श्रेष्ठ अशा, पुरुषशिरोमणी अशा माझ्या जेष्ठ पुत्राला, श्रीरामचंद्राला मी या पवित्र चैत्र महिन्यातील उद्याच्या पुष्यनक्षत्राच्या शुभमुहुर्तावर प्रातःकाली युवराज पदावर नियुक्त करू इच्छितो. तरी आपल्या सर्वांची अनुज्ञा आहे का, हे सांगावे.''

उपस्थित असलेल्या सर्वांनी प्रचंड उत्साहाने व आनंदाने दशरथाच्या या प्रस्तावाचे स्वागत केले. दशरथ महाराजांचे अभिनंदन केले. वसिष्ठ ऋषी व मंत्र्यांनी लगेच संबंधित सर्व लोकांना व सेवकांना निरनिराळी कामे सांगितली. राज्याभिषेकाच्या स्थानाचे सुशोभीकरण, देवपूजेची सामग्री, नगरातील लोकांना पुरोहितांना-ब्राह्मणांना निमंत्रणे, भोजनाची व्यवस्था, अयोध्यानगरीचे सुशोभीकरण, सर्वत्र दीपस्तंभ उभारण्याचे, गायक नर्तक-नर्तकी यांनी पाचारण करणे इ. अनेक कामे योग्यरितीने व वेळेवर करण्यासाठी तपशिलवार सूचना दिल्या. सर्वजण लगेचच आनंदाने व तत्परतेने कामाला लागले.

दशरथाने सुमंताच्यातर्फे श्रीरामाला दरबारात बोलावून घेतले. श्रीराम दरबारात आल्यावर त्यांनी आपल्या पित्याला नम्रपणे प्रणाम केला तेव्हा दशरथ राजाचे मन आनंदाने भरून

आले व त्यांनी लगेच रामाला छातीशी धरले व आपल्या जवळच्या आसनावर अत्यंत प्रेमाने बसविले. दशरथराजाने अत्यंत वात्सल्यपूर्ण शब्दात सांगितले की, ''तू माझा परमप्रिय पुत्र आहेस. तू आपल्या गुणांनी या सर्व प्रजेस प्रसन्न केले आहेस तेव्हा उद्या तू पुष्यनक्षत्राच्या मुहुर्तावर युवराजपद ग्रहण कर.'' वडिलांची आज्ञा शिरसावंद्य मानून श्रीराम आपल्या मातेकडे-कौसल्याराणीकडे गेले. तेथेच सुमित्रा, लक्ष्मण व सीताही होते. श्रीरामाच्या राज्याभिषेकाच्या वृत्ताने सर्वजण अत्यंत आनंदित झाले. पण... कैकेयीराणीच्या माहेराहून मंथरा नावाची दासी आली होती. ती नेहमी कैकेयीबरोबरच राहायची. कौसल्याराणीच्या महालात लोकांची वाढलेली येजा, स्त्रीपुरुषांचे हसणे, लोकांची महाल सजवण्याची लगबग पाहून मंथरेला आश्चर्य वाटले. तिने कौसल्येच्या दासीला जरा कुत्सितपणेच विचारले, ''काय ग, एवढा आनंदोत्सव कशासाठी?'' तेव्हा ती दासी म्हणाली, ''अग कुब्जे, उद्या श्रीरामचंद्रांचा राज्याभिषेक होणार आहे.'' ते ऐकल्यावर मंथरेला अतिशय हेवा वाटला. ती रागाने दग्ध झाली व लगेच झोपलेल्या कैकेयीला उठवत म्हणाली, ''अग उठ, मूर्खे झोपलीस काय? तुझ्यावर मोठं संकट येत आहे. तुझी खूप दुरवस्था होणार आहे.''



कुब्जेचे ते कठोर बोलणे, रागीट चेहरा बघून कैकेयीला दुःख झाले व तिने तिला समजावत विचारले, ''अग, असं झालं तरी काय?'' तेव्हा मत्सराने बेभान झालेली मंथरा म्हणाली, ''महाराज दशरथ रामाला उद्या युवाराज्याभिषेक करणार आहेत.''

''मंथरे, किती चांगली आनंदाची बातमी सांगितलीस! मी सुद्धा राम व भरतामध्ये भेद करत नाही. जर श्रीरामांना राज्य मिळत असेल तर ते भरतालाच मिळालं असं समज, कारण श्रीराम आपल्या भावांना आपल्या प्रमाणेच समजतात.''

कैकेयीचे हे बोलणे ऐकून मंथरेला खूपच दुःख झाले व लांब सुस्कारा सोडून म्हणाली, ''राणी, तू दुःख सागरात डुबत आहेस. जर राम राजा झाला तर भरताला त्याची गुलामी करावी लागेल. तुला सुद्धा कौसल्याराणीची दासी बनून जगावे लागेल. रामानंतर त्याचा मुलगाच पुन्हा गादीवर बसेल. भरत तर राजपरंपरेपासून दूर राहील. तुम्ही दोघेही हीनदीन व्हाल. तुला महाराज दशरथांनीही फसविले आहे. असा काही तरी उपाय शोध की ज्यामुळे भरतास राज्य आणि रामाला वनवास प्राप्त होईल.''

मंथरा अगदी कळकळीने, प्रेमाने, दूरदर्शीपणे आपल्या हिताचे बोलत आहे असे कैकेयीला वाटले. तिचाही चेहरा रागाने लाल झाला व ती म्हणाली, ''मी लवकरच रामाला वनवासात पाठवीन व लगेचच भरताला युवराज्याभिषेक करवून घेईन. पण मी हे कसे करू?'' तेव्हा पापमार्ग दाखविणारी मंथरा म्हणाली, ''हे प्रिय कैकेयराजकुमारी, तूच मला कित्येकदा ही गोष्ट सांगितली आहेस. दक्षिण दिशेला दंडकारण्यात वैजयंता नावाच्या विख्यात नगरात शंबर नावाचा एक महाबलवान राक्षस राहात होता. तो खूप मायावी होता. त्याने एकदा इंद्राबरोबर युद्ध पुकारले. तेव्हा महाराज दशरथ देवांच्या सहाय्याला गेले व त्यांनी असुरांशी युद्ध केले. युद्धात असुरांनी आपल्या नानाविध शस्त्रांनी त्यांना जखमी केले. त्यामुळे राजाची शुद्ध हरपली. त्यावेळेस त्याच्या सारथ्याचं काम करणारी तू आपल्या पतीला रणभूमीपासून दूर नेऊन त्यांचे प्राण वाचविलेस. नंतर शुद्धीवर आल्यावर महाराजांनी प्रसन्न होऊन दोन वर मागायला सांगितले. तेव्हा तू म्हणालीस, ''आता मला काही नको. जेव्हा माझी इच्छा होईल तेव्हा मागून घेईन.'' तर आता हे दोन वर मागण्याची वेळ आली आहे. तू एका वराने रामाला चौदा वर्षे वनवासात पाठव व दुसऱ्या वराने भरताला राज्याभिषेक करवून घे. म्हणजे या चौदा वर्षाच्या काळात भरत सर्व जनतेची मने जिंकेल. राज्यावर स्थिर होईल. तरी तू आता लगेच सर्व दागिने काढून ठेव, मळलेली वस्त्रे नेस व कोपऱ्यात जाऊन जमिनीवर पडून रहा.''

हे ऐकून कैकेयी म्हणाली, ‘‘मी असेच करेन. मंथरे, तूच माझी खरी हितचिंतक आहेस. तुझ्यामुळे मला महाराजांचे माझ्या भरताविरुद्धचे षड्यंत्र कळले.’’

तात्पर्यः

मनुष्य योजतो एक आणि होतं भलतंच.

चांगल्या कामात व्यत्यय निर्माण करणारी दुष्ट प्रवृत्तीची माणसे सर्वत्र असतात.

११. कैकेयीचा हट्ट

महाराज दशरथ तिकडे सर्व मंत्री, पुरोहित, नगर रक्षकांना राज्याभिषेकासंबंधी अनेक सूचना, आज्ञा इत्यादी देऊन राजसभेतून निघून आपल्या प्रिय राणी कैकेयीला ही आनंददायी बातमी स्वतः सांगण्यासाठी कैकयीच्या महालात आले. त्यांनी ''कैकेयी, कैकेयी'' हाका मारल्या. पण उत्तर मिळाले नाही. दासीजवळ विचारपूस केल्यावर कळले की, कैकेयी कोपभवनात आहे. महाराज उदास होऊन तिथे गेले. कोपभवनात कैकेयीला मलीन कपड्यात जमिनीवर पडलेली पाहताच दशरथ अत्यंत दुःखी झाले. त्यांचे मन शुद्ध होते. परंतु कैकेयीच्या मनात मात्र पापसंकल्प होता. महाराजांनी प्रेमाने तिला विचारले, ''देवी तू अशी का रागावली आहेस? तुझा कोणी अपमान केला का? तुझ्या मनाविरूद्ध काही घडलं का? मी तुझ्यासाठी करू शकणार नाही असे काहीच नाही.''

तोपर्यंत कैकेयी राजाकडे पाठ करूनच बसली होती. हे ऐकल्यावर नागिणीने फणा काढावा त्याप्रमाणे कैकेयी म्हणाली, ''माझे मनोरथ तुम्ही पूर्ण करावे. पूर्वी देवदानवांच्या युद्धात मी शंबरासुराच्या तावडीतून तुमचे प्राण वाचविले होते. त्यावेळी तुम्ही मला दोन वर देऊ केले होतेत. ते दोन वर आज तुम्ही मला द्यावेत.''

''कैकेयी आपल्या सत्कर्माची शपथ घेऊन सांगतो की, मी तुझं आवडतं कार्य नक्कीच पूर्ण करेन.''

''तर मग माझा पहिला वर ऐका! ज्या सामुग्रीने तुम्ही रामाला यौवराज्याभिषेक करू इच्छिता, तिनेच माझ्या भरताला राज्याभिषेक करा व दुसऱ्या वराने रामाने आजच चौदा वर्षांसाठी वल्कले व मृगचर्म धारण करून अरण्यवास स्वीकारावा. भरतास निष्कंटक राज्य प्राप्त व्हावे.''

हे भयंकर शब्द ऐकल्यावर एखादा जीर्ण वटवृक्ष कोसळून पडावा तसे महाराज दशरथ आत्यंतिक दुःखाने जमिनीवर कोसळले व अत्यंत व्याकुळतेने बोलू लागले. ''श्रीरामाने किंवा मी तुझं काय वाईट केले आहे? श्रीरामावर तुझे भरतापेक्षा अधिक प्रेम आहे असे तू नेहमी म्हणायचीस, श्रीराम तर तुझ्याशी सख्ख्या मातेप्रमाणे वागत आलेला आहे. मी हवे तर भरताला राज्य देतो. पण श्रीरामाला तू वनवासात पाठवू नकोस. मी रामाशिवाय एक क्षणभरही जगू शकणार नाही. मला तू मृत्यूच्या दाढेत ढकलते आहेस. हे कैकेयी, मी हात जोडतो. पण

तू श्रीरामाला अभय दे. इक्ष्वाकूंशात हा प्रथमच अन्याय होत आहे. तो थांबव. मला हे पाप लागू देऊ नकोस.''



हे सर्व बोलत असतानासुद्धा मध्ये मध्ये दशरथ राजाची आत्यंतिक दुःखाने शुद्ध हरपत होती, ते जमिनीवर पडत होते. परंतु असुयेने बेभान झालेली कैकेयी म्हणाली, ''तुम्ही जर आपली प्रतिज्ञा पूर्ण केली नाही तर मी विष पिऊन मरून जाईन.''

कैकेयीच्या या दुराग्रही निश्चयाने दशरथाच्या शरीरातले चैतन्यच लोप पाऊ लागले. अखेर रघुकुलाला शोभणारी, शब्दाला जागणारी कृती करणे दशरथ राजाला भागच पडले. अखेर आत्यंतिक दुःखाने त्यांचे स्वास्थ्यच हरपले.

तात्पर्यः

कपटी माणसाने गोडीगुलाबीने कान फुंकले की संकट येणार हे ठरलेलंच.

१२. राम वनवास

दशरथ राजाला अतीव दुःख झाले. परंतु रामाने पित्याची समजूत घातली. तो म्हणाला, महाराज, शब्दाला जागणे ही आपल्या घराण्याची परंपरा आहे. तिचे पालन व्हायलाच पाहिजे. माझ्या ऐवजी भरताला राज्यावर बसवा. तोही तेवढाच कर्तृत्ववान आहे. मी अगदी आनंदाने चौदा वर्षे वनवासाला जायला तयार आहे. तेव्हा तातांनी मुळीच वाईट वाटून घेऊ नये. माता कैकेयीबद्दल तर माझ्या मनात यत्किंचितही तिरस्कार नाही. तिचे राहिलेले वर तिने मागितले. यात तिनं काहीच गैर केलेलं नाही.'

रामाने कौसल्यामातेचीही समजूत काढली. 'तातांनी दिलेल्या वचनाची पूर्तता करणे पुत्राचे कर्तव्यच आहे' हे त्याने तिला पटवून दिले.

रामाने राजभूषणे उतरवून चक्क वल्कले परिधान केली. रानावनात हाच वेष योग्य होता. राम जाणार हे नक्की झाल्यावर सीतामाई पण रामाबरोबर वनात जाण्यास तयार झाली. 'जेथे राघव तेथे सीता' हे तिच्या जीवनाचे सूत्र होते. राम नसेल तर जीवनी कुठला राम, अशी तिची पक्की धारणा होती. त्यामुळे राजवैभवापेक्षा रामाबरोबर काट्याकुट्यातील कष्टमय जीवन स्वीकारावयाचे तिने ठरविले.

रामाने आपल्यापरीने तिची समजूत काढण्याचा खूप प्रयत्न केला. अरण्यातील काट्याकुट्यांची भीती, श्वापदांचे वास्तव्य, खाण्यापिण्याची आबाळ, अतिशय खडतर जीवन, अशा गोष्टींची भयानकता तिला पटवून देण्याचा रामाने खूप प्रयत्न केला. पण तुमच्याशिवाय मी जगूच शकत नाही. वाटेल तो त्रास पडो, हाल होवोत, मी वनवासात तुमच्याबरोबर येणार, असे सांगून निश्चयाचा महामेरू म्हणावा त्याप्रमाणे सीता आपल्या निश्चयाला चिकटून होती. अखेर रामाने तिला आपल्याबरोबर नेण्याचे मान्य केले.

बंधू लक्ष्मणाची अवस्थाही जवळजवळ सीतेसारखीच होती. बंधू रामावर त्याची प्रगाढ निष्ठा. बंधुप्रेमाचा खराखुरा आदर्श. त्यालाही रामाला सोडून एकटे राहण्याची कल्पना अजिबात आवडली नाही. रामाविना आपले जीवन व्यर्थ होय अशी त्याची पक्की भावना होती. त्यामुळे त्यानेही रामाबरोबर वनवासाला जाण्याचे जाहीर केले.

रामाने लक्ष्मणाला व सीतेलाही गरजवंतांना, ब्राह्मणांना दान द्यायला सांगितले. त्या तिघांनी खूप दानधर्म केला. मग रामाने सांगितल्याप्रमाणे लक्ष्मणाने जनक राजाने विवाहात

दिलेली दोन तेजस्वी धनुष्ये, अक्षय्य भाते आणि दोन खड्गे घेतली. नंतर माता-पित्यांना वंदन करून, अमात्य, ऋषीमुनी, विद्वत्जन अशा आदर्श व्यक्तींचा आशीर्वाद घेऊन राम, सीता व लक्ष्मण वनवासास निघाले. सुमंत्राने त्यांना रथातून गंगा तीरावर सोडले.

हजारो लोक रथामागे धावत गंगातीरी गेले. अखेर रामाने अत्यंत कळकळीने सर्वांना उपदेश केला. 'सुजनहो, आपण सर्वांनी आता परतावे हे बरे. बंधू भरताला उत्तम सहकार्य द्या.

अयोध्येची थोर परंपरा, आदर्श ढळू देऊ नका. माझी वनवासाची चौदा वर्षे बघता बघता संपून जातील. तुमचा राम तुमच्यात परत येईल याची खात्री बाळगा. तुमच्या सर्वांच्या सदिच्छा नि शुभाशीर्वाद आमचे वनवासी जीवनही कल्याणमय करतील असा मला विश्वास वाटतो. येथूनच आपण परतावे अशी माझी आपणांस प्रेमळ विनंती आहे.'

सर्व प्रजाजन दुःखित अंतःकरणाने अयोध्येस परतले. राम, लक्ष्मण, सीतामाईंनी ती रात्र गंगाकिनारी राहून काढली.

तात्पर्यः

दिलेला शब्द पाळणे हा रघुकुलाचा मोठा आदर्श होता. सुख असो वा दुःख असो ते कर्तव्यभावनेने व आनंदाने स्वीकारणे हा रामाचा श्रेष्ठ गुण होता.

पती प्रेम व बंधु प्रेम याची दोन उत्तम उदाहरणे म्हणजे सीता व लक्ष्मण होत.

१३. चित्रकूट पर्वतावर

निषादांचा राजा गुह याला राम वनवासास निघाल्याची वार्ता कळली. तो लगबगीने श्रीरामाच्या भेटीस आला. वडिलांची आज्ञा पालन म्हणून राम वनवासास निघालेत हे ऐकून रामाच्या विशाल मनाचे दर्शन त्याला घडले. त्याने त्या तिघांचे मनःपूर्वक स्वागत केले. कंदमुळे, फलाहार देऊन त्यांना तृप्त केले. रामाच्या प्रिय मित्राने निषादराज गुहाने तर स्वतः चे संपूर्ण राज्यच श्रीरामचंद्रांना देऊ केले. परंतु श्रीरामाने आपल्या प्रियतम मित्राला वडिलांच्या दशरथ महाराजांच्या आज्ञापालनाविषयी सांगून प्रेमळपणे नकार दिला. रात्रभर त्यांनी गुहासह तेथेच मुक्काम केला. दुसरे दिवशी सकाळी वडाचा चीक केसांना लावून राम-लक्ष्मणांनी केसांच्या जटा बांधल्या. गुहाच्या नावाड्यांनी त्यांना आपल्या नावेतून पैलतीराला पोहोचविले.

पैलतीराला गेल्यावर प्रथम ते पुष्करणीस गेले. तेथून प्रयागास. प्रयाग येथे त्रिवेणी संगमात त्यांनी स्नान करून पूजाविधी वगैरे आटोपला. चालता चालता त्यांना भारद्वाज ऋषींचा आश्रम लागला. भारद्वाज ऋषींनी त्यांचे स्वागत करून त्यांना शुभाशीर्वाद दिले. एक रात्र तिघेजण आश्रमातच राहिले.

दुसरे दिवशी सर्वजण पुढील प्रवासास निघाले. भारद्वाज ऋषिंच्या सूचनेप्रमाणे अखेर ते चित्रकूट पर्वतावर पोहोचले. मंदाकिनी नदी, अनेक जलस्त्रोत, पर्वत, शिखरे, गुंफा, झरे, हत्तींचे-हरणाचे कळप, टिटवी-कोकीळ पक्षांचे कलरव हिरवेगार वृक्ष, विविधरंगी-सुगंधी फुलांच्या वेली इत्यादींमुळे तो परिसर त्यांना अतिशय रमणीय वाटला. इथेच वाल्मीकी ऋषींची व त्यांची भेट झाली. त्यांनी रामाला चित्रकूट पर्वतावरच काही दिवस मुक्काम करण्यास सांगितले. लक्ष्मणाने सुंदरशी कुटी बांधली. राम, लक्ष्मण, सीता तिथे आनंदाने राहू लागले. निसर्गाचे दर्शन घ्यावे. कंदमुळे आणून खावीत अशा पद्धतीने राम, लक्ष्मण व सीता तिघेही तिथे कालक्रमण करू लागले.

इकडे सुमंत्राने अयोध्येत प्रवेश केल्याबरोबर त्याला पाहताच हजारो अयोध्यावासी धावत आले व 'श्रीराम कोठे आहेत?' असे विचारत सुमंत्राच्या रथामागून धावू लागले. सुमंत्राने त्याना सत्य परिस्थिती सांगताच सर्वजण खूप दुःखाने आक्रोश करू लागले. नंतर सुमंत्र महाराज दशरथांच्या महालात आले. सुमंत्राने दशरथराजाला 'राम, लक्ष्मण व सीता चित्रकूट पर्वतावर झोपडी बांधून रहात आहेत' असे सांगितले. ते ऐकून दशरथ राजास परम दुःख

झाले. परिणामी, ‘राम, माझा लाडका राम, अयोध्या वासियांचा आवडता राम’ असा विलाप करीतच राजा दशरथाने देहत्याग केला. त्याची प्राणज्योत अनंतात विलीन झाली. श्रावणाच्या मात्यापित्याने दिलेला शाप अशा रीतीने खरा ठरला. मृत्यूसमयी चार पुत्रांपेकी एकही पुत्र त्यांच्याजवळ नव्हता. ही केवढी शोकांतिका!

शास्त्राप्रमाणे सिंहासनावर दुसरा राजा बसविल्याशिवाय मृत राजाचा अंत्यविधी करता येत नसे. त्यामुळे वसिष्ठ ऋषींनी सुमंत्रास भरताला आजोळहून त्वरित घेऊन येण्यास सांगितले. सुमंत्राने भरधाव रथ सोडला. अतिशय जलद गतीने सुमंत्र, भरत, शत्रुघ्नांचे आजोळी गेला. ‘वसिष्ठ मुनींनी तुम्हा दोघांना तातडीने अयोध्येस बोलावले आहे’ असा निरोप देऊन सुमंत्र अयोध्येस परत आला.

पाठोपाठच भरतही अयोध्येस आला. परंतु त्याला अयोध्यानगरी रुक्ष व श्रीहीन दिसत होती. सर्व घरे उदास दिसत होती. देवमंदिरे फुलांनी सजविलेली नव्हती. यज्ञशाळात यज्ञ होताना दिसत नव्हते. सर्व स्त्रीपुरुष, दीन, दुर्बल चिंतित व उत्कंठित दिसत होते. त्यांच्या डोळ्यांमध्ये अश्रू तरळताना दिसत होते. हे सर्व पाहून भरताचे मन अशुभ विचारांनी भरून गेले.

भरत प्रथम वडिलांच्या महालात गेला. परंतु तेथे वडील दिसले नाहीत. म्हणून तो माता कैकेयीच्या महालात आला. कैकेयीने खूप आनंदाने भरताचे स्वागत केले. त्याचे कुशल विचारले. परंतु भरताने लगेच ‘‘तात कुठे आहेत? अशी अधीरतेने चौकशीही केली. तेव्हा कैकेयीने महाराज दशरथ इहलोक सोडून गेल्याची हकीकत सांगितली. ते ऐकून भरत अतिशय दुःखी होऊन विलाप करू लागला. काही काळाने तो म्हणाला, ‘‘आता श्रीरामच माझे पिता आणि मी त्यांचा परमप्रिय दास आहे. तरी कृपया श्रीरामाला बोलवा.’’

हे ऐकल्यावर कैकेयीने भरताला सांगितले की अयोध्येत श्रीरामास राज्याभिषेक होणार हे ऐकल्यावर मी तुझ्या पित्याकडे तुझ्यासाठी राज्य व श्रीरामाला चौदा वर्षे वनवास असे दोन वर मागितले. त्याप्रमाणे राम वनवासाला गेला असून त्याच्याबरोबर सीता व लक्ष्मणही गेले आहेत.

हे कैकेयीचे शब्द त्याला सापाने डसल्याप्रमाणे वाटले. तो अति दुःखाने संतप्त झाला व म्हणाला, ‘छे, छे, माझ्या हातून हे कधीही घडणार नाही. राम वनात असताना आणि त्यांचाच या सिंहासनावर बसण्याचा हक्क असताना मी ते सिंहासन बळाकावून पापाचा धनी होऊ शकत नाही. हे घडणार नाही. कदापिही घडणार नाही. मी हे सिंहासन स्वीकारणार नाही.’’

यावर कैकेयी भरताला उद्देशून म्हणाली, ‘भरता, असा अविचार करू नकोस, मोठ्या प्रयत्नाने आणि तुझे कायमचे हित लक्षात घेऊनच मी हा शुभयोग जुळवून आणला आहे. चालून आलेली राज्यसंपदा आणि सत्ता लाथाडू नकोस.’



‘या संपत्तीचा नि सत्तेचा मला काडीचाही मोह नाही. उलट तुला ‘आई’ म्हणून हाक मारण्याचीही मला लाज वाटते. एखाद्या दुष्ट चांडाळणीला शोभावे असे दुष्कृत्य तू केलेस. पवित्र रामाला त्याचा काही गुन्हा नसताना वनवासाला पाठविलेस आणि साक्षात पतीला यमसदनाची वाट दाखविलीस. या अधम कृत्याने तुझा मुलगा म्हणवून घेण्याची मला लाज वाटते. मला तुझी घृणा वाटते. तू माझी आई नसून साता जन्माची वैरीण आहेस. तुझा एकही शब्द ऐकण्याची आता मला इच्छा नाही. मी रामाकडे जाणार. त्याला परत बोलाविणार आणि त्यालाच सन्मानाने सिंहासनावर बसविणार.’

महर्षी वसिष्ठांच्या सल्ल्यानुसार भरताने पिता दशरथाचे अंत्यविधी पार पाडले. नंतर सर्व मंत्रिमंडळ, ब्राह्मण, ऋषी यांना सांगून श्रीरामाला अयोध्येत परत आणण्यासाठी भरत आपले सैन्य घेऊन, राम ज्या चित्रकूट पर्वतावर वास्तव्य करीत होता तिकडे निघाला.

तात्पर्यः

आईच्या दुष्ट वर्तनालाही क्षमा न करणारा व सिंहासनावरचा मोह झुगारणारा भरत असा एक आदर्श पुत्र होता.

१४. राम-भरत भेट

इकडे राम लक्ष्मण व सीता चित्रकूट पर्वतावर एका खडकावर बसून सृष्टिसौंदर्याचा मनसोक्त आस्वाद घेत होते. काही वेळाने लक्ष्मणाला दुरवरून हवेमध्ये रस्त्यावरील धुळीचे लोटच्या लोट उडताना दिसू लागले. थोडेसे निरखून पाहताच भरधाव वेगाने बरेचसे घोडेस्वार चित्रकूट पर्वताच्या रोखानेच येत असल्याचे त्याच्या लक्षात आले. नक्कीच काहीतरी संकट आहे असे त्याने हेरले.

हळूहळू अयोध्या नगरीत फडकणारे ध्वजही घोडेस्वारांचे हातात असल्याचे त्याच्या ध्यानात आले. तेव्हा तर त्याची खात्रीच झाली. भरत सिंहासनावर बसून आता रामाचा निःपात करण्यासाठी इतके मोठे सैन्य घेऊन आपणावर चालून येत आहे. त्याने लगेच रामाला हाक मारली.

'दादा, इकडे ये. तो बघ भरत आपल्याशी युद्ध करण्यासाठी असंख्य घोडेस्वार बरोबर घेऊन इकडेच येत आहे. मी माझे धनुष्य तयार ठेवतो आणि बाणांचा वर्षाव असा करतो की, या चित्रकूट पर्वतावर येण्याची कुणाचीही हिंमत होणार नाही.'

लक्ष्मण भरतावर अतिशय रागावल्यामुळे आपला विवेक सोडून बोलत होता. तेव्हा श्रीराम त्याला शांत करीत म्हणाले, ''तू म्हणतोस त्याप्रमाणे नक्कीच भरतच इकडे येत आहे, त्याबद्दल शंका नाही. भरत मोठा भ्रातृभक्त आहे. तो मला प्राणापेक्षाही प्रिय आहे. तुझ्यासहित आणि सीतेसहित मी वल्कले धारण करून वनवास पत्करला आहे हे समजल्यावर तो व्याकूळ होऊन प्रेमाने आपल्याला भेटायला आला असेल.''

तेवढ्यात भरताने श्रीरामाला पाहिले व तो वेगाने धावत त्यांच्याकडे गेला व त्यांच्या चरणावर पडून गदगद् वाणीने म्हणाला, ''आपण माझ्यामुळेच दुःखात सापडले आहात. माझ्या जीवनाचा धिक्कार असो.'' श्रीरामाने पटकन त्याला उठविले व आपल्या हृदयाशी धरले. श्रीरामाने भरताला आपल्या राज्याचे व वडिलांचे कुशल विचारले तेव्हा भरत अधिक शोकाकुल होऊन कसाबसा म्हणाला, ''तुमच्या विरहाने तात आपणांस सोडून स्वर्गलोकास गेले.''

''काय, तात गेले? अरेरे... फार वाईट घडले.'' ती दुःखद वार्ता समजताच राम, लक्ष्मण, सीता या साऱ्यांच्याच डोळ्यातून घळाघळा अश्रू वाहू लागले. सर्वांचे कंठ भरून आले. काय बोलावे हेच कोणाला कळेनासे झाले. राम तर अवाक्‌च झाला.

नंतर काही वेळानंतर भरताने रामाला विनंती केली की, ''सर्व सचिव व अयोध्यावासी यांच्यासह आपल्या चरणांवर मस्तक ठेवून मी अशी प्रार्थना करतो की आपणच हे राज्य स्वीकारावे. मी आपला बंधू, शिष्य व दास आहे. आपण माझी प्रार्थना नाकारू नये.'' तेव्हा श्रीरामाने भरताला प्रेमपूर्वक समजावले की, ''राज्यासाठी वडिलांच्या आज्ञेचा भंग करण्याचे पाप मी करू शकत नाही. मला चौदा वर्षे वनात राहिलेच पाहिजे.''

''मी अयोध्या नगरीत राज्य करीत असताना माझ्या देवतुल्य बंधू वनात कष्टात रहात आहे हा विचारच मला वेदनादायक आहे.'' भरत अगतिक होऊन म्हणाला.

वसिष्ठ ऋषीही श्रीरामाला समजावत म्हणाले, ''इक्ष्वाकू कुळात ज्येष्ठ पुत्रच राजा होतो. ज्येष्ठ पुत्र असताना कनिष्ठ पुत्र राजा होऊच शकत नाही. रघुवंशाच्या कुळधर्माप्रमाणे तुम्ही वागावे.''

त्यांना आदरपूर्वक परंतु ठामपणे नकार देत श्रीराम म्हणाले, ''माता व पित्यांचे पुत्रावर खूप उपकार असतात. ते सहजरित्या फिटू शकत नाहीत. माझ्या जन्मदात्या पित्याने मला जी आज्ञा दिली आहे तिचे उल्लंघन मी कदापि करणार नाही.''

''आपण राज्यभार स्वीकारल्याने लक्षावधी लोकांची काळवंडलेली मने पुन्हा प्रफुल्लित होतील. त्या दुष्ट मातेमुळे, माता कसली, वैरीणच ती! तिच्यामुळे या साऱ्या अघटित आणि मनस्ताप देणाऱ्या घटना घडत आहेत. तेव्हा तुम्ही अनमान करू नका. माझे ऐका...'' भरताचे हे काकुळतीचे शब्द ऐकून त्याचे सांत्वन करीत श्रीराम म्हणाले, ''मी चौदा वर्षांचा अवधी पूर्ण करून जेव्हा वनातून परत येईन तेव्हा राज्यपद स्वीकारेन. तोपर्यंत मी माझे कर्तव्य करतो. तू तुझे कर्तव्य पार पाड. भरता, भावनेपेक्षा कर्तव्य श्रेष्ठ असते.''

''देवा, मी हे एका अटीवर करेन.''

''कोणती अट?''

''मला आपण आपल्या पादुका द्याव्यात. त्यांची सिंहासनावर स्थापना करून मी हे राज्य आपल्या नावाने चालवेन. मी सुद्धा चौदा वर्षे वल्कले धारण करून फक्त फळे, कंदमुळे खाऊन आपल्या येण्याची वाट बघत नगराच्या बाहेरच राहीन.''

रामाने 'तथास्तु' म्हणत आपल्या पादुका दिल्या आणि भरताला, शत्रुघ्नाला हृदयाशी कवटाळले व व्यथित अंतःकरणाने सर्वांना निरोप दिला. भरताने अंतःकरणपूर्वक पादुकांना वंदन केले आणि श्रीरामाचा जयजयकार करीत तो अयोध्येस परतला.

तात्पर्यः

आयुष्यात कर्तव्य सोडून मोहामागे न लागणे हेच महत्त्वाचे.

अन्यायाने सत्तेवरसुद्धा बसण्याचा मोह नसावा.

१५. जटायू भेट

काही दिवस चित्रकूट पर्वतावर वास्तव्य करून राम-लक्ष्मण व सीतामाई यांनी आपल्या पुढील प्रवासास सुरूवात केली. घनदाट अरण्य, गर्द झाडी, श्वापदांचे अधूनमधून होणारे आवाज, सरपटणारे प्राणी, वाटेवर काट्यांची रेलचेल अशा सर्व हालअपेष्टा झेलीत आणि मन प्रसन्न ठेवीत त्यांचा प्रवास चालू होता. कुठे दोन-चार दिवस, कुठे एखाद-दुसरा महिना असा मुक्काम करीत दक्षिण दिशेच्या रोखाने ते निघाले.

प्रथम त्यांना अत्रि ऋषिंचा आश्रम लागला. मनोभावे अत्रि ऋषींचे व महापतिव्रता अनसूया यांचे त्यांनी दर्शन घेतले. ऋषींना परम आनंद झाला. सती अनसूयेने आपल्या कपाळीचे कुंकू सीतेला लावले व कधीही न मळणारे वस्त्र तिला दिले. त्याचबरोबर कधीही न सुकणारी फुलांची माळ दिली. त्या माळेमुळे सीतेला वनातले क्लेश जाणवणार नव्हते.

त्यानंतर ते हिंस्त्र पशूंनी व्यापलेल्या त्या अरण्यातून मार्गक्रमण करीतच असता त्या तिघांनीही महाप्रचंड, बलशाली नरभक्षक राक्षसाला बघितले. तो महाभयंकर आवाज करीत धावत आला व सीतेला उचलून दूर धावत गेला. सीता भीतीने थरथर कापू लागली. राम व लक्ष्मणाला राक्षस म्हणाला, ‘‘मी स्वतः विराध नावाचा राक्षस आहे. ही स्त्री आता माझी भार्या होईल व तुम्हा दोघांचे रक्त मी प्राशन करीन. ब्रह्मदेवाकडून मी वर प्राप्त करून घेतला आहे. कोणत्याही शस्त्राने माझा वध होणार नाही.’’ हे ऐकताच श्रीराम-लक्ष्मणांनी संतापून विराध राक्षसाच्या अंगावर बाणांचा वर्षाव केला. त्याला खूप जखमी केले व तलवारींनी त्याचे दोन्ही हातच छाटून टाकले. तेव्हा विराध विव्हळत भूमीवर कोसळला. तेव्हा श्रीराम एका पायाने त्याचा गळा दाबून उभे राहिले व त्यांनी लक्ष्मणाला मोठा खड्डा खणायला सांगितले. लक्ष्मणाने खड्डा खणताच दोघांनी मिळून विराधास त्या खड्ड्यात पुरले. अशा रीतीने विराध राक्षसाचा अंत झाला. या वधामुळे तेथील वनवासी सुखावले.

अशातऱ्हेने मार्गक्रमण करीत, पीडितांचे दुःख हरण करीत राम, लक्ष्मण आणि सीता पुढे पुढे जात होते. लोकांचे धन्यवाद घेत होते. श्रीराम अरण्यात चालता चालता, लक्ष्मण व सीतेला अनेक ऋषिमुनींच्या आयुष्याविषयी, तेथील निसर्गाविषयी खूप महत्त्वाच्या गोष्टी सांगत असत. त्यामुळे त्यांना वनातील श्रम जाणवत नसत.

अनेक राक्षसांचा नाश करणाऱ्या, समुद्रशोषण करणाऱ्या, सदैव सज्जनांच्या हितकार्यात

व्यग्र असलेल्या अगस्ती ऋणींना भेटण्याची श्रीरामाला खूप उत्कंठा होती. सुतीक्ष्ण मुनींनी सांगितलेल्या दिशेने चालत चालत ते तेजस्वी अशा अगस्ती ऋषींच्या आश्रमात आले.

आश्रमात वेदाध्ययन चालले होते. वातावरण प्रसन्न होते. वेली, झाडे, फळाफुलांनी बहरलेली होती. सर्वत्र सुगंध दरवळला होता. अगस्ती ऋषींच्या शिष्यांनी आश्रमाबाहेर राम आल्याची वर्दी ऋषींना दिली. 'राम आले आहेत' हे शब्द ऐकताच अतिशय तत्परतेने अगस्ती ऋषींनी त्यांना आश्रमात बोलावले.

अगस्ती ऋषींच्या चरणांना स्पर्श करून राम-लक्ष्मण-सीतेने त्यांना वंदन केले. अगस्ती ऋषीनींही अगत्यपूर्वक त्या तिघांचा आदरसत्कार केला, कुशल विचारले आणि श्रीरामाला आपल्या शेजारी बसविले. ''आपण सर्व लोकीचे राजे, महारथी व धर्माचरण करणारे आहात. म्हणून आमच्यासाठी माननीय व पूजनीय आहात'' असे म्हणून त्यांनी श्रीरामाला अत्यंत प्रेमाने विष्णूंनी ज्या धनुष्याने असंख्य राक्षसांचा संहार केला ते हिरेजडित, विश्वकर्म्याने तयार केलेले स्वतःजवळील धनुष्य, ब्रह्मदेवाने दिलेला दैदिप्यमान बाण, इंद्राने दिलेले दोन अक्षय्य भाते इत्यादी दिले.

ही दिव्य आयुधे आणि महर्षी अगस्तींचे आशीर्वाद घेऊन, त्यांनीच सुचविलेल्या 'पंचवटी' स्थानाकडे राम-लक्ष्मण-सीता जाण्यास निघाले.

गोदावरीकाठच्या पंचवटीच्या वाटेवर श्रीरामचंद्रांना एक विशालकाय आणि महापराक्रमी गृध्र (गिधाड) दिसला. प्रथम दर्शनी तो कोणीतरी राक्षस असावा अशी श्रीराम-लक्ष्मणांना शंका आली. म्हणून त्यांनी 'तू कोण आहेस' असे विचारल्यावर अत्यंत मधुर वाणीत, त्यांना प्रसन्न करण्यासाठी तो गृध्र म्हणाला,''बाळांनो, मी तुमच्या वडिलांचा मित्र आहे, असे समजा.'' हे ऐकताच श्रीरामानेही आदरपूर्वक त्यांचे नाव व कुल विचारले तेव्हा 'विनतेचा मुलगा अरूण हे माझे पिता व श्येनी माझी माता आहे. माझा वडिलभाऊ 'संपाति' असून माझे नाव 'जटायू' आहे. तुझे पिताश्री, राजे दशरथ यांना शुक्राचार्यांच्या बरोबर झालेल्या युद्धात मी खूप सहाय्य केले आहे. तेव्हापासून राजे दशरथ मला आपल्या बंधूप्रमाणे मानू लागले. हे श्रीरामा, आपली इच्छा असेल तर या घनदाट जंगलात मी आपली सहायता करेन. येथे राक्षसांचा खूप उपद्रव होतो. आपणांस जर कधी लक्ष्मणासोबत पर्णशाळेच्या बाहेर जावे लागले तर मी सीतामाईचे रक्षण करेन.''

हे ऐकल्यावर श्रीरामचंद्रांनी त्याला दृढ आलिंगन दिले व ते त्याच्यासमोर नतमस्तक झाले.

श्रीरामाच्या इच्छेप्रमाणे लक्ष्मणाने पंचवटीतच सुंदर पर्णशाळा बांधली आणि ते तिघेही तिथेच राहू लागले.

तात्पर्यः

संकटांना धैर्याने तोंड देणे व दुष्टांपासून सज्जनांचे रक्षण करणे हा रामाचा गुणविशेष.

१६. शूर्पणखेला अद्दल घडविली

दण्डकारण्य म्हणजे अतिशय घनदाट आणि भयाण अरण्याने व्यापलेला प्रदेश. सर्वत्र घनदाट झाडे, झुडपे, वेली माजलेल्या, इतके दाट की ऐन मध्यान्हीलासुद्धा सूर्याचा प्रकाश जमिनीवर पडत नसे. भयंकर साप, अजगर आणि हिंस्त्र श्वापदांनी सारे अरण्य भरलेले होते. तसेच हा सारा प्रदेश अतिक्रूर व अक्राळविक्राळ राक्षसांनी भरलेला होता. ह्या भागावर लंकेचा राजा रावण राज्य करीत होता. त्याच्या वतीने कारभार त्याची बहीण शूर्पणखा करीत असे. खर, दूषण इत्यादी तिच्या सेनापतीनी हजारो राक्षस सैन्यासह संपूर्ण दंडकारण्यात उच्छाद मांडला होता. गरीब वनवासी जनता आणि आश्रम बांधून राहिलेल्या ऋषिमुनींना छळत असत. त्यांचा कायमचा बंदोबस्त करण्याची विनंती अगस्ती मुनींनी श्रीरामाला केली होती.

दण्डकारण्याचा हा प्रदेश जसा भयंकर होता तसाच रमणीय पण होता. विशेषतः गोदावरीच्या काठचा जनस्थानाचा प्रदेश फारच सुंदर होता. त्याच प्रदेशात, पंचवटीत, श्रीराम आश्रम बांधून राहू लागले.

सकाळच्या कोवळ्या उन्हात श्रीराम एका शिळेवर बसले होते. सीता बागेतील फुलझाडांना पाणी घालत होती. दूर लक्ष्मण पहारा देत उभा होता. तेवढ्यात अचानक दशमुखी रावणाची राक्षसी बहीण शूर्पणखा पर्णशाळेजवळ येऊन पोहोचली. श्रीरामांची तेजःपुंज मूर्ती आणि अनुपम सौंदर्य पाहून शूर्पणखा त्यांच्यावर मोहित झाली. त्यांच्याशी लग्न करून त्यांची बायको होऊन रहावे असे तिच्या मनात आले. लगेच तिने सुंदर तरुणीचे रूप घेतले आणि लचकत मुरडत ती श्रीरामांसमोर येऊन उभी राहिली आणि म्हणाली,''वनवासी तापसाचा वेष करून तू ह्या वनात रहात असलास तरी तुझ्या तेजस्वी चर्येवरून आणि पीळदार शरीरावरून तसेच तुझ्या जवळच्या शस्त्रांवरून तू कोणीतरी राजकुमार असावास हे सहज ओळखता येते. मी लंकाधिपती रावणाची बहीण शूर्पणखा आहे. या साऱ्या प्रदेशाची स्वामिनी मी तुझ्यावर मोहित झाले आहे. तू माझ्याशी लग्न कर. आपण सुखाने संसार करू.''

शूर्पणखेचे ते लोचट वागणे आणि बोलणे पाहून श्रीरामांना गम्मत वाटली. त्यांना तिची थट्टा करण्याची लहर आली ते म्हणाले- ''बाई गं, मी अयोध्येचे सम्राट महाराज दशरथांचा मुलगा श्रीराम आहे. वडिलांच्या इच्छेप्रमाणे राज्य सोडून वनवासात रहात आहे. ती बघ माझी बायकोसुद्धा माझ्या सोबतच आहे. त्यामुळे मला काही तुझ्या बरोबर लग्न करणे शक्य नाही. तो बघ, तिकडे पलिकडे माझा धाकटा भाऊ उभा आहे. वाटल्यास तू त्याच्याशी लग्न कर.''

लक्ष्मण श्रीरामांसारखाच सुंदर आणि सक्षम होता. त्याकडे पाहताच तो सुद्धा तिला आवडला. श्रीरामांनी नकार देताच मूर्ख शूर्पणखा लक्ष्मणाकडे गेली आणि त्याला स्वतःशी लग्न करण्याची गळ घालू लागली. श्रीरामानेच तशी परवानगी दिल्याचे ती सांगू लागली. ते ऐकून अेकंदर प्रकार लक्ष्मणाच्या लक्षात आला. तो म्हणाला- ''बाई, मी माझ्या इच्छेने मोठ्या भावाचे दास्य पत्करले आहे. माझ्याशी लग्न केलेस तर तुला सुद्धा दासी होऊन रहावे लागेल. तू आपली माझ्या भावाशीच लग्न करून रहा.''

मूर्ख शूर्पणखा पुन्हा श्रीरामांकडे आली आणि त्यांना लग्न करण्याचा आग्रह करू लागली. रामांनी वारंवार अेकपत्नी व्रताचा उल्लेख करताच ती भडकली आणि म्हणाली- 'थांब, मी ह्या हडकुळीला आताच्या आता खाऊन टाकते. मग ती शिल्लकच उरणार नाही.

त्यानंतर तू माझ्या बरोबर लग्न कर.' असे म्हणत तिने आपले मूळ राक्षसीरूप घेतले आणि ती सीतेच्या अंगावर धाऊन गेली. लक्ष्मण सावध होताच. तो तिला अडवायला पुढे झाला. तेवढ्यात श्रीराम मोठ्याने म्हणाले,

''लक्ष्मणा, ती स्त्री आहे, त्यामुळे तिला ठार मारु नकोस. फक्त विद्रूप करून टाक.''

ते ऐकून लक्ष्मणाने आपल्या तलवारीने तिचे नाक आणि कान कापून टाकले. विरूप झालेली शूर्पणखा मोठमोठ्याने किंकाळ्या फोडीत दाट अरण्यात पळून गेली. तिच्या ह्या अपमानाचा सूड घेण्यासाठी तिचे बंधूद्वय सेनापती खर आणि दूषण आणि तीन शिरे असलेला त्रिशिरा हजारो राक्षसांची सेना घेऊन राम लक्ष्मणांवर चालून गेले. लक्ष्मणाला सीतेच्या रक्षणासाठी ठेवून एकटे श्रीराम, राक्षस सेनेला सामोरे गेले. त्यांनी केवळ सव्वा घटकेत खर आणि दूषण, त्रिशिर यांच्यासह हजारो राक्षसांचा संहार केला. त्या अचाट पराक्रमाने धास्तावलेली शूर्पणखा रावणाकडे लंकेत पळून गेली.

रावणासमोर तिने संतापाने थयथयाट केला. रावणाची खूप निर्भत्सना केली. ''रामाचा सूड घे'' असे ती वारंवार ओरडून सांगू लागली. श्रीरामांनी आतापर्यंत केलेला राक्षस संहार रावणापासून लपून राहिला नव्हतां. आता त्यांनी प्रत्यक्ष त्याच्या बहिणीलाच विद्रूप करून टाकले होते. त्यामुळे आता स्वस्थ राहणे शक्य नव्हते. पण रावणाच्या अकंपन नावाच्या धास्तावलेल्या मंत्र्याने, त्याला श्रीरामांबरोबर समोरासमोर युद्ध न करता काहीतरी कपट करण्याचा सल्ला दिला. तो म्हणाला- ''महाराज त्या रामाची बायको अत्यंत सुंदर आहे. तिला पळवून लंकेस आणावे म्हणजे तिच्या दुःखाने राम आपोआपच मरून जाईल.''

शेवटी कपट करून सीतेला पळवून आणण्याचा बेत रावणाने आखला.

तात्पर्यः

कपटी माणसाला अद्दल घडविणे हा धर्मच आहे. श्रीरामाने योग्य केले.

१७. सीताहरण

शूर्पणखेच्या कठोर बोलण्याने रावण खूप चिंतातुर झाला आणि रामाला कशी अद्दल घडवावी आणि सीतेला कसे पळवून आणावे याविषयी विचार करीत असताना त्याला ताटकापुत्र मारीच राक्षसाची आठवण झाली. लगेच तो मारीच राक्षसाच्या आश्रमात गेला.

रावणाला पाहताच मारीचाने त्याचे कुशल व येण्याचे प्रयोजन विचारले. तेव्हा रामाने शूर्पणखेला कसे विद्रूप केले, खर - दूषण - त्रिशिरा यांच्यासह चौदा हजार राक्षसांचा संहार कसा केला ते सविस्तर सांगून रावण चतुरपणे पुढे म्हणाला, ''हे पराक्रमी मारीचा, मला मदत करण्यासाठी तू जे काम करायचे आहेस ते ऐक. अरे, तू प्रत्यक्ष लढायचे नाहीस तू कांचनमृगाचं मायावी रुप धारण कर. सीतेच्या पर्णकुटीसमोरुन फेऱ्या मार. तुला पाहून सीतेला मोह होईल. तुला धरुन आणण्यासाठी ती रामाला सांगेल. राम तुझ्या पाठी लागेल. तू भरधाव जाऊन रामाला तुझा पाठलाग करायला लाव.''

''तेवढ्या वेळात मी सीतेच्या पर्णकुटीपाशी अतिथीचे रुप घेऊन जातो. दूर जाताच तो खोटा आक्रोश कर. ''लक्ष्मणा, धाव धाव, मी तुझा बंधू राम संकटात सापडलो आहे. धाव रे धाव, हे तुझे बोल ऐकून सीता फसेल व तिच्या संरक्षणार्थ ठेवलेल्या लक्ष्मणालाही ती रामाच्या मदतीसाठी पाठवील. मग माझे काम फारच सोपे. एवढ्या वेळात मी सीतेला पळविलेच म्हणून समज.''

हे ऐकताच मारीच अत्यंत भयभीत झाला, दुःखी झाला. त्याचे ओठ सुकले. तो हात जोडून रावणाची विनंती करु लागला, ''तुला ज्याने ही कल्पना सुचविली तो नक्कीच तुझा व संपूर्ण राक्षसकुलाचा शत्रू असणार. ज्या दिवशी युध्दात तुम्ही श्रीरामसमोर याल. तो तुमच्या आयुष्यातील शेवटचा दिवस असेल. श्रीरामाचा पराक्रम त्याच्या बालवयातच मी पाहिला आहे. तेव्हापासून मला इतकी धास्ती बसली आहे की रत्न, रथ इ.जी सर्व 'र'कारापासून सुरु होणारी नामे आहेत, ती देखील कानावर पडताच माझ्या मनाचा भीतीने थरकाप होतो. मला जीवदान मिळाल्यामुळेच मी संन्यास स्वीकारला.'

हे मारीचाचे बोलणे ऐकून रावण संतापून म्हणाला,'' माझा विचार पक्का आहे. मी सीतेला पळवून लंकेत नेणारच. जर तू विरोध केलास तर मी आताच तुला मारुन टाकेन. माझं हे काम तू केलचं पाहिजेस.''

तेव्हा नाईलाजाने मारीचाने कांचन मृगाचे रुप धारण केले. त्याने मनात विचार केला, 'या साहसात मरण आलेच तर ते पवित्र रामाच्या हातूनच येईल. तेवढे तरी भाग्य मरताना आपल्याला लाभेल.' ठरल्याप्रमाणे मारीच व रावण गुप्तरीतीने पंचवटीत आले.

ठरल्याप्रमाणे झाले.कांचन मृगाचे मायावी रुप घेऊन मारीच हिंडू लागला. असा मोहक, अंगावर ठिपके असलेला सोनेरी हरिण यापूर्वी, सीतेने कधीच पाहिला नव्हता. ती अतिशय आनंदाने राम व लक्ष्मणाना हाका मारु लागली. राम व लक्ष्मण तेथे येताच तिने रामाजवळ हट्ट धरला की' 'तुम्ही हा मृग जिवंत पकडून आणलात तर मी याचा संभाळ करेन व आपण वनवास संपवून अयोध्येत परत जाऊ तेव्हा या दिव्य हरणाला पण घेऊन जाऊ - भरताला व माझ्या सासवांना खूप आनंद होईल व यदाकदाचित मेला तर या मृगाचं चामडं अंथरुन त्यावर आपण बसू शकतो. तुम्ही माझ्यासाठी एवढं करावं!''

परंतु मृगाला बघताच लक्ष्मणाला शंका आली. तो लगेच म्हणाला, ''हा नक्कीच मायावी राक्षस असेल.'' तेव्हा ''लक्ष्मणा, तू काळजी करु नकोस. तू सीतेचे रक्षण कर, मी हरणाच्या मागे जातो. जर तो मायावी राक्षस असेल, तर तिथेच बाणाने मारुन टाकेन,'' असे म्हणून श्रीरामांनी तलवार कमरेला बांधली व धनुष्यबाण घेऊन ते हरणामागे धावले. रामाला पहाताच

मृगाने जोरात धावायला सुरुवात केली. श्रीरामही त्याच्या मागे धावू लागले. धावता धावता तो मृग श्रीरामांना आश्रमापासून खूप दूर घेऊन गेला. काही अंतरावर गेल्यावर मारीचाने रावणाने सांगितल्याप्रमाणे 'लक्ष्मणा, धाव रे धाव. तुझा राम संकटात आहे,'' अशी आर्त आरोळी ठोकली. सीतेने ते ऐकले. ती लक्ष्मणास लगेच म्हणाली, 'भावजी, आपले बंधू संकटात आहेत. आपण त्यांच्या रक्षणार्थ त्वरित इथून जावे हे बरे.''

त्यावर लक्ष्मण सीतामाईस म्हणाला, ''राम संकटात सापडणे अशक्य आहे. हा राक्षसांचा मायावी डावा असावा.'

या उत्तराने सीता संतापली. 'हेच का तुमचे बंधु प्रेम? बरोबर! भाऊ झालात तरी सावत्रच ना? रामाच्या मृत्यूचे तुम्हाला काय सोयरसुतक? तुमच्या मनात नक्कीच काहीतरी कपट आहे.''

'वहिनी, असं म्हणू नकोस. पण ध्यानात ठेव, अजूनही हा सारा फसवा डाव आहे असे माझी मनोदेवता मला सांगते आहे. तू विनाशाला आमंत्रण देत आहेस. नाईलाजाने, तुझ्या आज्ञेनुसार मी हा चाललो श्रीरामाकडे.'

लक्ष्मण निघून गेला आहे हे पाहताच रावण सन्यासी वेष धारण करुन लगेच सीतेकडे गेला. त्यावेळी वैदेही शोकमग्न होऊन पतीच्या चिंतेत बुडून गेली होती. रामाचा बदला घेण्याची हीच नामी संधी आहे असे ओळखून रावण वेद मंत्रांचे उच्चारण करु लागला. जेव्हा सीतेने त्याच्याकडे पाहिले तेव्हा अगदी नम्र आवाजात त्याने प्रथम सीतेची स्तुती केली व विचारले,'' हे देवी, तू कोण आहेस?

तेव्हा त्या साधूला बघून, सीतेने त्याचा अतिथी सत्कार केला. बसण्यास आसन दिले आणि खाण्यासाठी उत्तम फळे दिली आणि त्याने विचारल्याप्रमाणे स्वतःविषयी, श्रीराम-लक्ष्मणाविषयी, अयोध्येविषयी सर्व माहिती त्या भगव्या वेषधारी रावणाला सांगितली. नंतर मैथिलीनेही विचारले, ''हे ब्राह्मण, आता आपणही आपल्या नावाची, गोत्राची व कुळाची साद्यंत माहिती सांगावी.''

तेव्हा रावण दर्पोक्तीने म्हणाला, ''मी राक्षसांचा राजा लंकाधिपती रावण आहे! तुला पत्नी बनविण्याची इच्छा बाळगून मी आलो आहे. मी तुला पट्टराणी बनवितो. त्रैलोक्याची सुखे तुला उपभोगता येतील. तरी तू या जटाधारी, राज्य नसलेल्या रामाला सोडून माझ्याबरोबर ये.''

हे रावणाचे उद्‌गार ऐकताच सीता भयंकर संतापली, त्याची खूप निर्भत्सना करुन तिने त्याची विनवणी धुडकावत ठाम नकार दिला.

वारंवार सांगूनही सीता आपल्याला वश होत नाहीसे पाहून रावणाने स्वतःचे खरे रुप प्रकट केले. त्याने सीतेला उचलून आपल्या रथात ठेवले व शीघ्रगतीने तो आकाशमार्गे निघाला. ह्या वर्णनाला 'वाल्मिकी रामायणाचा' आधार आहे. लोकवाङमयात मात्र 'लक्ष्मण रेषा' प्रसिद्ध आहे.

''सीते, आता मी तुझे हरण केले आहे. या रावणाच्या तडाख्यातून आता तुला रामही वाचवू शकणार नाही.''

रावणाचे हे उद्‌गार ऐकताच सीता ''लोकांनो, वृक्षलतांनो, पशुपक्ष्यांनो, हे वृत्त त्वरित माझ्या रामाला कळवा, रावण मला पळवून नेत आहे,'' असा टाहो फोडू लागली.

सीतेचा हा आक्रोश, हा टाहो, जटायू पक्षाच्या कानावर गेला. त्याने रावणाशी प्रचंड झुंज दिली. जटायू अगदी रक्तबंबाळ झाला. शेवटच्या क्षणापर्यंत जटायू पराक्रमाची शर्थ करीत होता. पण बलाढ्य रावणाने त्याचे दोन्ही पंख छाटून टाकले. रक्तबंबाळ अवस्थेत रामाचे स्मरण करीत जटायू जमिनीवर पडला.



सीतेला घेऊन रावण झपाट्याने आकाश मार्गाने लंकेच्या दिशेने निघाला. ते असेच ऋष्यमूक पर्वतावरुन उडत जात असताना सीतेला एका शिखरावर काही बलाढ्य वानर बसलेले दिसले. श्रीराम आपला शोध करीत या मार्गाने निश्चित येणार असे वाटून तिने आपले काही अलंकार (दागिने) काढून, आपला पदर फाडून त्याची छोटी गाठोडी त्या वानरांच्या मध्ये पडेल अशा बेताने खाली फेकली. सीतेच्या आक्रोशाने वानरांचे लक्ष तिकडे गेलेच होते. रावण कोणा देवीला पळवून नेत असल्याचे त्यांच्या लक्षात आले. सीतेने फेकलेले दागिने वानरांनी आपल्याजवळ जपून ठेवले. ह्या देवीचा शोध घेत कुणीतरी नक्की येईल असे त्यांना वाटले.

रावणाने लंकेस पोहोचल्यावर सीतेला आपले वैभव दाखवून वश करण्याचा प्रयत्न केला. पण त्याला वश न होता, सीतेने रावणाची निर्भत्सना केली. तेव्हा काही दिवस जाऊ द्यावेत, तिचे मन शांत होऊ द्यावे, असा विचार करून रावणाने तिला राक्षसींच्या पहाऱ्यात अशोक वनात ठेवून दिले.

तात्पर्यः

शत्रूला जेव्हा शक्तीने एखादी गोष्ट साध्य होत नाही तेव्हा फसव्या युक्तीचा अवलंब करून करून शत्रू ती गोष्ट साध्य करून घेतो.

१८. सीता शोधार्थ

सीतेचा शोध करून राम थकला. एखाद्या भ्रमिष्टासारखा सीतेच्या विरहाने तो येणाऱ्या जाणाऱ्याला एवढेच नव्हे तर झाडांना, वृक्षांना, फुलवेलींना गोदावरी नदीला, हरणाला इत्यादी प्रत्येकाला 'सीता कोठे पाहिलीत का हो?' असा प्रश्न विचारत होता. परंतु कोणीही उत्तर दिले नाही. त्यामुळे तो अधिकाधिक व्याकूळ होत होता. सीता विरहाच्या या दुःखाच्या आघाताने हळव्या झालेल्या रामाला कित्येक दिवस काहीही सुचत नव्हते. दिवसरात्र जंगलात भटकत सीतेचा शोध सुरू होता.

सीता रक्षणार्थ लक्ष्मणाला ठेवूनही दैव आपला खेळ कसा खेळते याची रामाला जाणीव झाली. कोणताही मोह संकटाला कारणीभूत होतो हे ही त्याला उमगले. सीतेला कांचनमृगाचा मोह पडला नसता तर... पण या जर-तर ला आता काहीच अर्थ उरला नव्हता.

शोकाधीन झालेल्या आपल्या जेष्ठ बंधू श्रीरामाला प्रेमाने समजावत लक्ष्मण म्हणाला, 'आर्य, आपण दुःख सोडून धीर धरावा. सीतेच्या शोधासाठी मनावर संयम ठेवून विचार करावा. दुःखाने सारासार विचार करण्याची बुद्धी कुंठित होते. काम यशस्वी होण्यास विलंब लागतो. तरी आपण आपला शोक आवरावा.'

प्रिय बंधू लक्ष्मणाच्या सल्ल्यानुसार रामाने आपल्या विरही व दुःखी मनाला सावरण्याचा प्रयत्न केला व मैथिलीचा शोध सुरूच ठेवला.

असाच अखंडपणे सीतेचा शोध चालू असताना वाटेत रक्तबंबाळ अवस्थेत पडलेला जटायू त्यांना दिसला. त्याला पाहताच रामाला खूप वाईट वाटले. त्याने पित्यासमान जटायूच्या घायाळ शरीरावरून मायेने हात फिरवला व त्याची चौकशी केली.

'जटायू, तुझी ही भयानक अवस्था कोणी बरं केली?' या रामाच्या प्रश्नाला उत्तर देताना जटायू म्हणाला, 'रामा, तो दृष्ट रावण सीतेला घेऊन अवकाशातून पळून जात असताना मी त्याचा मार्ग अडवला. त्याच्या हातून सीतेला सोडविण्यासाठी त्याच्याशी तुंबळ लढाई केली. पण अखेर त्या दुष्टाने माझे दोन्ही पंख छाटून माझी ही भयानक अवस्था केली. इतकी कडवी झुंज देऊनही अखेर मी अयशस्वी ठरलो व रावण सीतेला पळवून नेण्यात यशस्वी झाला.

मी तुझीच वाट पहात होतो. तो रावण, विश्रवाचा मुलगा आणि कुबेराचा सख्खा भाऊ आहे. तो मैथिलीला घेऊन दक्षिण दिशेकडे गेला...' असे बोलत असतानाच जटायूचा आवाज

क्षीण होत गेला आणि त्याने प्राण सोडला. ते बघताच श्रीराम अत्यंत शोकाकुल झाले व म्हणाले, 'हे लक्ष्मणा, हा जटायू माझा उपकारकर्ता आहे. माझ्यासाठी त्याने स्वतःच्या प्राणांची आहुती दिली. त्यामुळे मला अत्यंत दुःख होत आहे.' नंतर दोन्ही भावांनी अगदी जड अंतःकरणाने त्याला अग्नी दिला.

एकूण रावणाने सीताहरण केल्याचे वृत्त रामाला जटायूकडून कळले. तेव्हा आता रावणाच्या तावडीतून सीतेला सोडवून आणणे महत्वाचे होते. पण काम काही सोपे नव्हते, हे ही राम ओळखून होता.

नंतर दक्षिणेकडे चालता चालता महाबली श्रीराम व लक्ष्मण निबिड अरण्यात येऊन पोहोचला. त्या घटनदाट जंगलातून जात असतानाच त्यांना प्रचंड विशालकाय 'कबंध' नावाचा राक्षस दिसला. त्याला ना डोके होते ना मान होती, केवळ धड एवढेच त्याचे शरीर होते आणि

त्याच्या पोटातच त्याचे तोंड तयार झाले होते. त्याच्या छातीतच त्याचे कपाळ होते व त्यावर एक भला मोठा डोळा होता. त्याचे हात खूप म्हणजे खूप लांब होते. त्याने खाण्यासाठी रामलक्ष्मणांना जेव्हा हातात पकडले तेव्हा प्रथम दोघेही मनातून घाबरले. परंतु लगेच भानावर येत दोघांनी तलवारीने क्षणात त्याचे दोन्ही हात कापले. हात कापले गेल्यावर तो महाभयंकर गर्जना करीत धरणीवर कोसळला. पण लगेच आनंदाने तो राम व लक्ष्मणाला म्हणाला, मी पूर्वी पराक्रमी प्रसिद्ध पुरुष होतो! परंतु मी खूप दुरभिमानी झाल्यामुळे ऋषिमुनींना घाबरवत असे, त्रास देत असे. त्यामुळे 'स्थूलशिरा' नावाच्या महर्षींनी कोपविष्ट होऊन मला शाप दिला व मी असा भयंकर राक्षस बनलो. नंतर इंद्राने मला उःशाप दिला की तुझे हात कापले गेल्यावर तुझा दाह संस्कार झाल्यावर तू पुन्हा पूर्ववत रूपवान, बलवान होशील. आता तुम्ही मला अग्नी द्या. मग मी तुमच्या कार्यात मदत करेन.' त्याप्रमाणे श्रीराम व लक्ष्मणांनी त्याला अग्नी देताच तो पूर्ववत झाला आणि श्रीरामाने त्यास सीताहरणाची हकिकत सांगून रावणाचा ठावठिकाणा विचारला. तेव्हा 'महापराक्रमी सुग्रीव हा वानरांचा राजा असून तो सीतेच्या शोधासाठी आपला मित्र बनून सहायता करेल. तो पंपा सरोवराच्या काठी एका गुहेत रहातो. तरी आता आपण शोक कमी करावा व सुग्रीवाला भेटावे.' एवढे बोलून त्या दिव्य पुरुषाने राम लक्ष्मणाचा निरोप घेतला.

पंपा सरोवराकडे रामलक्ष्मण निघाले तेव्हा रमणीय अशा मतंगवनात त्यांना मतंगऋषींचा आश्रम दिसला. मतंगऋषी स्वर्गलोकी गेल्यावर शबरी तिथेच रहात होती. त्या सुंदर आश्रमात श्रीराम-लक्ष्मण गेले. त्यांना बघताच भिल्लीण तपस्विनी शबरीला अत्यानंद झाला व तिने त्यांना प्रणाम केला. अत्यंत आदरपूर्वक त्यांची पूजा केली. तिने नाना प्रकारची फळे गोळा करून ठेवली होती, ती दिली. त्याचा श्रीरामांनी प्रेमाने स्वीकार केला. शबरीने गुरु मतंगऋषींची खूप सेवा केली होती. दिव्यलोकी जाताना मतंगऋषींनी शबरीला सांगितले होते की, श्रीरामलक्ष्मण आश्रमात येतील. त्यांच्या सत्काराने व दर्शनाने तू श्रेष्ठ व अक्षय लोकात जाशील. शबरीकडून हे ऐकल्यावर श्रीराम प्रसन्नपणे 'तथास्तु' म्हणाले व शबरी आनंदाने स्वर्गलोकी निघून गेली.

अशा रीतीने शबरीला मानसिक आनंद देऊन राम-लक्ष्मण सुग्रीवाच्या शोधार्थ ऋष्यमूक पर्वताकडे निघाले. सुग्रीवाने हे ठिकाण वास्तव्यासाठी नक्की केले होते. सुग्रीवाच्या मनात त्याचा बंधू वाली याची फार भीती होती. कारण वाली सुग्रीवाला ठार मारण्याची वाट पाहत होता. त्याने सुग्रीवाची भार्या रुमा हिला आपल्याजवळ जबरीने डांबून ठेवले होते. पण केवळ

मतंगऋषींनी पूर्वी वालीला शाप दिलेला होता की, जर वाली या ऋष्यमूक पर्वताला स्पर्श करील तर त्याच क्षणी त्याला मृत्यू येईल. त्या शापामुळेच वाली येथे येऊ शकत नव्हता. त्यामुळेच जिवाला सुरक्षितता म्हणूनच सुग्रीवाने हे ठिकाण वास्तव्यासाठी नक्की केले होते.

राम-लक्ष्मण ऋष्यमूक पर्वताची चढण चढू लागले. सुग्रीवाला ही कुणी शत्रूकडील माणसे मायावी रूप घेऊन तर येत नाहीत ना अशी शंका आली. त्याने या माणसांचे पर्वतावर येण्याचे कारण समजून घेण्यासाठी हनुमंताला तापसाचा वेष घेऊन तिकडे पाठविले.

राम-लक्ष्मण जवळ येताच तापसरूपी हनुमंताने त्यांना विनयाने नमस्कार केला व अत्यंत नम्रपणे विचारले, 'महाराज आपण कोण, कोठून आलात? कोठे जाणार?'

त्यावर लक्ष्मण म्हणाला, 'आम्ही दशरथ राजाचे पुत्र. हा माझा मोठा भाऊ राम. आमच्या सावत्र मातेच्या हट्टामुळे हा चौदा वर्षाचा वनवास आम्ही भोगीत आहोत. या वनवास काळातील वास्तव्यात दुष्ट रावणाने मायावी रूप धारण करून माझी सर्वगुणसंपन्न व शालीन अशी सीतावहिनी, तिला लंकेत पळवून नेलेय. तिला रावणाच्या दुष्ट तडाख्यातून सोडवून आणण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. याबाबतीत सुग्रीवाची आम्हाला मदत होईल असं वाटल्यावरून आम्ही त्याच्याच भेटीसाठी निघालो आहोत.'

हे ऐकताच तापसरूपी हनुमंताला परम आनंद झाला. आपले खरे रूप प्रगट करीत हनुमंत म्हणाला, 'मी हनुमंत. सुग्रीवाचा सेवक. आपण कोणी शत्रूपक्षाकडील मंडळी आहात की काय हे जाणून घेण्यासाठीच मी हा तापसाचा वेश घेतला होता. आपण माझ्याबरोबर चलावे. मी आपली सुग्रीव राजाशी भेट घडवून देतो.'

तात्पर्यः

सज्जनांना मदत करण्यात प्रसंगी प्राणार्पणही करावे हे जटायूवरून कळते. निष्पाप वृत्तीने केलेल्या प्रेमाचा नेहमीच आदर करावा.

१९. सुग्रीव भेट व वालीचा वध

ऋष्यमूक पर्वतावर श्रीराम-लक्ष्मण-सुग्रीव यांची भेट झाली. दोघेही आनंदले. सुग्रीव म्हणाला, ''भगवान, आपण श्रेष्ठ मानव आहात. तर मी वानर आहे. आपण माझ्याशी मैत्री करू इच्छिता यातच माझा सत्कार आहे. आजपासून आपल्या दोघांचे सुखदुःख एक झालं आहे.'' रामाने सुग्रीवाला विनंती केली, 'सुग्रीवा, रावणाच्या तावडीतून सीतेला सोडविण्यासाठी तू व तुझ्या वानरसेनेचे सहाय्य मला हवे आहे.'

'रामा, मी तुला सर्व तऱ्हेची मदत करण्यास तयार आहे. पण माझा बंधू वाली याची मला भीती वाटते. त्याच्या त्रासातून तुम्ही मला मुक्त करा. मग मी स्वस्थचित्ताने आपली मदत करू शकेन. त्याने माझी भार्या रुमा हिला पण बंदिस्त करून ठेवली आहे.'

''तुम्हा दोघा भावांत शत्रुत्व कशामुळे निर्माण झालं हे मी जाणून घेऊ इच्छितो'' असे श्रीरामांनी सुग्रीवाला म्हटल्यावर सुग्रीव सांगू लागला.

''माझे वडील ऋक्षराजा यांच्या मृत्युनंतर माझा मोठा भाऊ वाली किष्किंधा नगरीचा राजा झाला. मला त्याच्याविषयी खूप प्रेम व आदर होता. मय राक्षसाचा मुलगा आणि दुंदुभीचा मोठा भाऊ मायावी एकदा रात्री येऊन वालीला युद्धासाठी हाका मारू लागला. तेव्हा वाली त्याच्याशी युद्ध करण्यासाठी बाहेर पडला. तेव्हा वालीवरील प्रेमामुळे मीही त्याच्याबरोबर बाहेर आलो. आम्हाला दोघांना एकत्र बघताच तो मायावी घाबरून पळू लागला. मी आणि वालीनेही त्याचा जोरात पाठलाग केला. पण तो एका गुहेत शिरला.'' तेव्हा वाली मला म्हणाला. ''मी मायावीला ठार मारून परत येतो. तोपर्यंत तू येथे गुहेच्या दरवाजापाशी सजगतेने पहारा देत थांब.''

'पण एक वर्षापेक्षा अधिक काळ लोटला. पण वाली परत आला नाही. मग एकदा गुहेतून रक्ताचा पाट वहात आला व राक्षसांचा आवाजही मी ऐकला. त्यावेळेस माझा भाऊ वाली मारला गेला असे मला वाटले आणि मग मी किष्किंधा नगरीला परत आलो आणि सिंहासनावर बसून राज्य करू लागलो.'

काही दिवसांनी मायावी राक्षसाचा वध करून प्रत्यक्ष वालीच माझ्यासमोर आला. मला सिंहासनावर बसलेला पाहून तो भयंकर संतापला आणि त्याने मला राज्यातून बाहेर हाकलले. त्यावेळी नल, नील, जांबुवंत व हनुमान यांच्या सहाय्याने मी तेथून पळ काढला.

हे पाहून वालीने माझ्या पत्नीचे अपहरण केले. ती अजून त्याच्याच बंदिवासात आहे. मीही वालीइतकाच शूर आहे पण वालीला इंद्राकडून मिळालेल्या विजयमालेमुळे विजयाचे पारडे नेहमी त्याच्या बाजूने झुकते.'

'ठीक आहे, सुग्रीवा, घाबरू नकोस. तू कोणत्या पेचात सापडला आहेस ते मला कळले. प्रथम वालीचा वध करून तुझ्या बायकोला सोडवून आणू आणि मगच आपण सीतेचा शोध घेण्याच्या कामास लागू या, तू आताच वालीला युद्धाचे आव्हान दे.'

पण रामा, वालीशी युद्ध करणे इतके सोपे नाही. तुमचा अपमान करण्याचा किंवा तुमच्या पराक्रमाला कमी लेखण्याचा माझा हेतू नसून वालीचा पराक्रम मी डोळ्याने पाहिला असल्याने माझे मन भयभीत झाले आहे म्हणून तुम्हाला विनंती करतो की येथे दुंदुभीच्या हाडांचा प्रचंड असा डोंगराएवढा ढीग पडला आहे. तो जर तुम्ही नुसत्या पायाच्या अंगठ्याने पर्वताखाली ढकलू शकलात अथवा एका बाणाने या प्रचंड ताडवृक्षांपैकी एकतरी पाडू शकलात तरी मला तुमच्या सामर्थ्याची कल्पना येईल व माझा आत्मविश्वास वाढेल.

'एवढंच ना!' असे म्हणून रामाने दुंदुभीचे प्रेत नुसत्या पायाच्या अंगठ्याने उडविल्याबरोबर ते पार पर्वताच्या पायथ्याशी जाऊन कोसळले. त्यानंतर सोडलेल्या एकाच बाणात, एक नव्हे तर सात ताडवृक्ष धडाधड कोसळून पडले.

सुग्रीवाला खूप आनंद झाला. त्याने रावण सीतेला पळवून नेत असताना सीतेने वाटेत टाकलेले तिचे दागिने रामापुढे ठेवले. ते दागिने सीतेचेच आहेत हे रामाने ओळखले.

बाजूबंद, कर्णकुंडले आणि पैंजण बघून लक्ष्मण म्हणाला, 'रोज वहिनींच्या चरणांना स्पर्श करून प्रणाम करताना दिसतात त्यामुळे मी दोन पैंजण मात्र नक्की ओळखतो.' यावरून लक्ष्मणाचे चारित्र्य किती उज्ज्वल होते, आदर्श होते हे सर्वांना समजले, कारण लक्ष्मण सीतावहिनीच्या मुखाकडे न पहाता, त्याची नजर सदैव तिच्या पायाकडेच असे. सर्वांच्या मनात लक्ष्मणाविषयीचा आदर वाढला. या दागिन्यांमुळे सीता रावणाकडेच आहे हे नक्की झाले.

'सुग्रीवा, आता प्रथम तू वालीला युद्धाचे आव्हान दे.' रामाने सुग्रीवाला सुचवले. ताबडतोब सुग्रीवाने वालीस युद्धाचे आव्हान दिले.

दोघांचे युद्ध सुरू झाले. वालीच्या आक्रमक पवित्र्यापुढे सुग्रीवाचे काही चालेना. तो रामाकडून होणाऱ्या बाणांच्या वर्षावाची वाट पहात होता. पण रामाकडून बाण सुटलाच नाही. तेव्हा मात्र सुग्रीवाने युद्धातून पळ काढला.

तो रामावर अतिशय चिडला. रामाने आपला विश्वासघात केला असे त्याला वाटले. तसे त्याने रामाला विचारताच, राम म्हणाला, 'सुग्रीवा, तुझा थोडा गैरसमज होतोय. मी बाण सोडला नाही त्याला तसंच कारण होते!''

'कसलं कारण?' दीनवाणीने सुग्रीवाने प्रश्न केला.

'तुम्ही दोघे इतके सारखे दिसत होतात की मी बाण नेमका कुणावर सोडायचा हेच माझ्या लक्षात येत नव्हते. समजा, वाली समजून मी बाण सोडला असता आणि तो नेमका तुला लागला असता तर केवढा अनर्थ झाला असता?'

'आपला मुख्य हेतू तर साध्य झाला नसताच, पण विनाकारण या रामाला मात्र लोकांनी दूषण दिले असते. तेव्हा सुग्रीवा, यावेळची तुझी माघार तू विसरून त्याबद्दल मनात अजिबात खंत करू नकोस.' आपण वालीला पुन्हा युद्धाचे आव्हान देऊ. मात्र या वेळेला एक गोष्ट तू कर. तू तुझ्या गळ्यात विविधरंगी फुलांचा जाडसा हार घालून लढायला जायचे. त्यामुळे तू

कोणता व वाली कोणता हे मला लांबूनही ओळखता येईल. यावेळेस वालीचा पराभव होणारच हे नक्की समजून चाल.'

त्याप्रमाणे पुनश्च सुग्रीव व वाली युद्धासाठी समोरासमोर आले. दोघात तुंबळ मल्लयुद्ध जुंपले. बराच वेळ झटापट चालू होती.

राम सारे काही लक्षपूर्वक पाहत होता. अखेर वालीने सुग्रीवाला अतिशय जोराने असा मुष्टिप्रहार केला की त्यामुळे सुग्रीवाचा जीव कळवळला. त्याने रामाचा धावा सुरू केला.

ही वेळ योग्य आहे हे लक्षात घेऊन रामाने वालीवर बाण सोडला. तो अगदी त्याच्या हृदयात घुसला. वाली धाडकन जमिनीवर कोसळला. आता हा मरणार हे लक्षात येताच राम त्याच्याजवळ गेला.

रामाला पाहून वाली आश्चर्यचकित झाला. मरता मरता त्याने रामाला प्रश्न केला. 'हे रामा, माझे तुझ्याशी काहीही वैर नसताना मला ठार मारण्याचे हे दुष्कृत्य तू का केलेस? त्यामुळे तुझ्या शुद्ध चारित्र्याला कलंकच लागणार आहे.'

वालीचे हे उद्‌गार ऐकून राम म्हणाला, 'मी केलं ते योग्यच केलं. बंधू सुग्रीवाच्या बायकोची तू अभिलाषा धरलीस हे पहिले पापकृत्य आणि बंधू सुग्रीवाचा काहीही अपराध नसताना त्याला ठार मारण्यास प्रवृत्त झालास हे दुसरे पापकर्म. अशा दुष्कृत्य करणाऱ्या व्यक्तिला मृत्युदंडाशिवाय दुसरी कसलीही शिक्षा योग्य ठरणार नाही.'

'रामा, मी चुकलो. तू माझे डोळे उघडलेस. माझ्या गादीवर आता तू सुग्रीवाला बसव. सुग्रीवा, मला क्षमा कर. मी भाग्यवान की मला पुण्यवान श्रीरामाच्या हातून मरण येत आहे. सुग्रीवा, सीतामाईस रावणाच्या तावडीतून सोडवून आणण्यास श्रीरामाला तू सर्व तऱ्हेची मदत कर. माझा मुलगा अंगद याचा स्वतःच्या मुलाप्रमाणे सांभाळ कर. तो सुद्धा खूप पराक्रमी आहे आणि ही माझी दिव्य सुवर्णमाला आता तू धारण कर.'

एवढे बोलून वालीने आनंदाने प्राण सोडला. मरतानाही त्याच्या ओठावर 'श्रीराम' हे शब्द होते.

तात्पर्यः

परस्त्री अभिलाषा व निरपराध्यांचा छळ करणाऱ्यांना कठोर शासन करावयास हवेच.

२०. सीतेच्या शोधार्थ सुग्रीव सेना

श्रीरामाच्या सहाय्याने वालीचा वध झाला. त्यामुळे सुग्रीव आता निर्भय झाला. त्याची पत्नी तर त्याला मिळालीच, पण वालीची पत्नी तारा हिनेही श्रीरामाच्या कृपेमुळे सुग्रीवाशी दुसरे लग्न केले.

सुग्रीवाला किष्किंधेचा राज्यभिषेक झाला तेव्हा पावसाळ्याला सुरुवात झाली होती. सुग्रीव श्रीरामांना म्हणाला, ''रामा, या कोसळत्या पावसात सीता शोध केवळ अशक्य आहे. पावसाळा संपताच मी माझीच वानरसेना शोध घेण्यासाठी रवाना करीन. तोपर्यंत आपण माझा पाहुणचार घेत किष्किंधेतच रहावे. पावसाळा संपल्यावर सीता शोधण्याचे कार्य सुरु करण्यास श्रीरामांनी मान्यता दिली. पण ते किष्किंधा नगरीत न राहता प्रस्रवण पर्वतावरील एका मोठ्या व विस्तृत गृहेत राहू लागले. बघता बघता पावसाळा संपला. पण ऐश्वर्य उपभोगण्यात मग्न असलेला सुग्रीव श्रीरामांना दिलेले वचन विसरुन गेला. सुग्रीव काहीच कृती करत नसल्याचे पाहून श्रीराम लक्ष्मणाला म्हणाले, 'लक्ष्मणा, सुग्रीव आपल्याला विसरलेला दिसतोय. असे म्हणतात की अडचण संपली की अडचणीच्या वेळी उपयोगी पडलेल्यांचाही माणसाला विसर पडतो. सुग्रीवाचेही तसेच झालेले दिसतेय. आपली आठवण तो साफ विसरलेला दिसतोय. राज्याचा उपभोग घेण्यात स्वारी भलतीच दंग झालेली दिसतेय.'

''होय दादा, मलाही सुग्रीवाचा राग आलेला आहे.'' बोलता बोलता लक्ष्मण रागाने लाल झाला आणि जणू सुग्रीवाला जाब विचारण्यासाठी तो निघालाच.

हनुमंताने हे ऐकले आणि सुग्रीवाला जागे करण्यासाठी लक्ष्मणाच्या आधी हनुमान तेथे जाऊन पोचला. ''सुग्रीवा, तू आपले वचन विसरलास. श्रीरामांच्या मदतीसाठी येण्याचे तू कबूल केले होतेस. पण तू तर इथे अगदी ऐषारामात दिवस काढतोस, श्रीराम व लक्ष्मण दोघेही तुझ्यावर चिडले आहेत. लक्ष्मण तर तुझ्याशी लढण्याच्या इराद्यानेच इकडे निघाला आहे. तेव्हा सुग्रीवा, लवकर शहाणा हो, झाल्या प्रकाराची क्षमा माग.''

लक्ष्मण चिडला आहे आणि तो आपल्याकडे येत आहे हे कळताच सुग्रीव घाबरला. आपणच प्राणत्याग केलेला काय वाईट असेही विचार वानरप्रमुख अंगद व त्याची सेना यांच्या मनात येऊ लागले.

‘अखेर फिरत फिरत ते सागराच्या किनाऱ्यावर आले. आता हा सागर कसा ओलांडायचा, सर्वांपुढे प्रश्न पडला. ‘खरोखरीच आता आपण प्राणार्पण करु या,’ असे अंगदाने म्हणताच पर्वताच्या गुहेत बसलेला पंगू असा गृध्रपक्षी मनुष्यवाणीने ओरडला, ‘वा!वा! फारच छान!! माझा रोजच्या अन्नपाण्याचा प्रश्न तरी आपोआप सुटेल. मला आयते बसल्या जागेवर खाद्य मिळेल.’

कोणाचे हे उद्‌गार म्हणून, अंगदाने मागे वळून पाहिले, तो एक गृध्रपक्षी पर्वताच्या गुहेत बसून बोलत होता.

‘अरे, हा तर आपल्या जटायूसारखाच पक्षी. कुठे जटायूने सीतारक्षणासाठी केलेले प्राणार्पण आणि कुठे आपल्याच प्राणर्पणावर टपून बसलेला जटायूसारखा हा दुसरा पक्षी.’

‘काय म्हणालात? जटायू? आपण जटायूला ओळखता? सांगा कुठे आहे तो? तो तर माझा भाऊच. माझे नाव संपाती, मी त्याचा मोठा भाऊ.

वृत्तासुराचा वध करणाऱ्या इंद्राला जिंकण्यासाठी आम्ही दोघे आकाशमार्गाने स्वर्गात गेलो. इंद्राला जिंकून परत येताना सूर्याजवळ आलो. सूर्याच्या उष्णतेने जटायू खूपच व्याकूळ झालेला पाहून प्रेमाने मी माझ्या धाकट्या भावाला माझ्या दोन्ही पंखांखाली झाकून घेतले.

परिणामी तो भाजला नाही व जनस्थानात कोसळला आणि माझे दोन्ही पंख जळून गेले आणि मी असा पंगू बनून येथे पडलो. सांगा, कुठे आहे माझा भाऊ जटायू?

'रावण सीतेला पळवून नेत होता. जटायूने ते पाहिले. तेव्हा त्याने रावणाशी प्रखर झुंज दिली. पण त्या बलाढ्य रावणाने त्याचे पंख छाटून त्याला रक्तबंबाळ केले. त्यात तो मरण पावला.'

सीतामाईला सोडविण्यासाठी त्याने स्वतःचे बलिदान केले. आम्ही सीतामाईच्या शोधार्थ निघालो आहोत.

'अरेरे, जटायूला रावणाने ठार केले. या रावणालाही कुणीतरी ठार करायला हवंय रे.'

'पण तो रावण असतो कुठे हेच तर आम्ही शोधतोय.'

'मी सांगतो', संपाती म्हणाला. 'त्याने एका सुंदर स्त्रीला याच वाटेने नेलेले मी पाहिले आहे. तीच सीता असावी. हा समुद्र ओलांडून पलीकडे गेलात की रावणाची लंकानगरी आहे. तेथेच रावण राहतो. आता सीतामाई पण तेथेच असणार. वानर मित्रांनो, मला या समुद्र किनाऱ्यावर घेऊन चला. मी माझ्या बंधूच्या नावाने श्रद्धांजली वाहतो.'

त्याप्रमाणे संपातीला वानरांनी समुद्रकिनारी नेले. संपातीने श्रद्धायुक्त मनाने बंधू जटायूला श्रद्धांजली वाहिली आणि चमत्कार झाला. संपातीला पंख फुटले, 'तुम्ही सीता शोधात यशस्वी व्हाल.' असे म्हणून संपातीने आनंदाने आकाशात झेप घेतली.

सीता कोठे आहे हे कळले. पण हा समुद्र पार कसा करायचा? सर्वांपुढे प्रश्न पडला. रात्रभर विचारविनिमय झाल. अखेर हनुमानालाच हे शक्य आहे असे सर्वांचे मत पडले. असे प्रचंड उड्डाण तोच एकटा करु शकतो. तेव्हा सर्वांनी एकमताने ही कामगिरी हनुमंतावर सोपविली.

तात्पर्यः

काम यशस्वी झाले की त्या कामाकरिता ज्यांनी आपणास मदत केलेली असते त्यांचा माणसाला विसर पडतो.

सज्जनांच्या कार्यासाठी सर्वजण प्रेमाने सहाय्य करतात.



२१. मारुतीचे लंकेस उड्डाण

लंकेस उड्डाण करण्यास कपिवर हनुमान उत्साहाने तयार झाला. त्यासाठी तो अतिउंच, श्रेष्ठ महेंद्र पर्वतावर चढला. कारण तेवढ्या उंचीवरून वेगाने उड्डाण घेतले म्हणजे आपण सहज लंकेत जाऊ, असा हनुमंताचा अंदाज होता. त्याने सर्व देवांना हात जोडून वंदन केले आपले पिता पवनदेव यांनाही वंदन केले आणि लंकेच्या दिशेने जोराने उड्डाण केले.

महावीर हनुमानाचे हे काम अत्यंत दुष्कर होते. वाटेत संकटेही खूप आली. पण त्या सर्व संकटांशी सामना करत तो लंकेकडे जात होता. मध्येच त्याने इच्छेप्रमाणे रुप धारण करणाऱ्या, सिंहिका नावाच्या एका प्रचंड शरीराच्या राक्षसीला पाहिले. तिने, त्याला खाण्यासाठी आपला प्रचंड जबडा उघडला. तेव्हा बुद्धिमान हनुमानाने आपला आकार लहान केला व तिच्या तोंडात प्रवेश करुन तिच्या हृदयावर जोरात आघात केला व तो अत्यंत वेगाने बाहेर आला. आपल्या युक्तीने व बुद्धीने सिंहिकेला ठार करुन, हनुमान पुन्हा वेगाने आकाशमार्गे लंकेच्या दिशेने निघाला.

हळू हळू त्याला लंकेची तटबंदी दिसू लागली. विश्वकर्म्याने बनवलेली ती महानगरी सोन्याच्या तटाने बंदिस्त केली होती. बाहेरील सर्व फाटके सोन्याची बनविलेली होती. बलवान, क्रूर राक्षसांचा डोळा चुकविण्यासाठी आता आपण आपले अवाढव्य शरीर कमी केले पाहिजे, नाहीतर आपण प्रथमच सर्वांना दिसू व आपले काम यशस्वी होण्याऐवजी आपल्यालाच पकडून ठेवण्यात येईल या विचाराने हनुमंताने आपले शरीर सर्वसामान्य किरकोळ माकडाप्रमाणे लहान केले व रात्रीच्या वेळी लंकेस प्रवेश केला.

तरी पण एका अजस्त्र स्त्रीने त्याला पाहिलेच, ती स्त्री त्याला रागाने म्हणाली, ''ए मर्कटा, तू येथे कसा आणि तुला या तटबंदीच्या आत कोणी येऊ दिले? चल, चालता हो येथून, नाहीतर फुकट प्राण गमावशील.''

''मला असली धमकी देणारी तू आहेस तरी कोण?'' हनुमंताचा प्रतिप्रश्न.

''मी लंकेची नगरदेवता आहे. रावणराजाच्या आज्ञेने लंकेचे रक्षण करते.''

''मी एक सामान्य मर्कट.'' लंका नगरीचे वैभव व सौंदर्य पहावं या एकाच आशेने मी एवढं लांब येण्याचं धाडस केलं.''

''पण माझ्या परवानगीशिवाय तू आत येण्याचे धाडस केलसंच कसं? थांब मी तुला चांगलीच अद्दल घडविते. असं म्हणून तिने त्याला मारण्यासाठी आपला हात उगारला. हनुमंताने तिच्या या हातावर असा जोराचा ठोसा दिला की ती मागच्या मागेच जमिनीवर कोसळली.

पडता पडता ती म्हणाली, ''किरकोळ दिसणाऱ्या या माकडाचे अंगी बरीच शक्ती आहे. म्हणजे रावणाचा मृत्यू जवळ आला असंच म्हणायला हवं. कारण ब्रह्मदेवाने पूर्वीच मला सांगून ठेवलंय की, 'जेव्हा तुला एखादा सामान्य मर्कट धक्का देऊन खाली पाडेल तेव्हा रावणाचा अंतकाळ जवळ आलाय असं खुशाल समज.''

हनुमंताचा मार्ग मोकळा झाला. त्याने राजरोस आपली भ्रमंती सुरू केली. सर्व उद्याने, देवालये, भव्य प्रासाद जे जे म्हणून शक्य होते ते ते त्याने पाहिले.

पण मनाशी सीतेचे जे चित्र त्याने रंगविले होते तशी एकही स्त्री त्याला दिसेना. फिरत फिरत तो इंद्रजिताच्या मंदिरात शिरला. तिथे एकांतात इंद्रजित व त्याची पत्नी सुलोचना मंचकावर पडून गप्पागोष्टी करीत होते. ती स्त्री अतिशय सुंदर होती. हीच सीता असावी असं त्याच्या मनात आलं आणि तो खट्टू झाला.

''ज्या सीतेला आपण पवित्र, चारित्र्यवान समजत होतो तीच सीता या इंद्रजिताच्या बरोबर

एकांतात गप्पागोष्टी करतेय. खरंच परत जाऊन रामाला हेच सांगायचं असेल तर त्यापेक्षा प्राणार्पण केलेले काय वाईट?'' मारुतीच्या मनात असले नैराश्याचे विचार येऊ लागले. इतक्यात, आपसात चाललेला त्या दोघांचा संवाद त्याच्या कानावर पडला.

सुलोचना इंद्रजितला म्हणत होती-'नाथ, मला एका गोष्टीचं फार वाईट वाटतंय.'

'कशाबद्दल?'

'आपल्या पिताजींनी फार वाईट कर्म केलंय.'

'ते कोणते ?'

'चारित्र्यसंपन्न पतिव्रता श्रीराम-पत्नी सीता हिला आपली वैषयिक अभिलाषा पूर्ण करण्यासाठी मामंजीनी पळवून आणलीय व तिच्याभोवती कडेकोट बंदोबस्त ठेवलाय. हे काही चांगले कर्म नाही.'

सुलोचनेचे हे शब्द हनुमानाने ऐकले मात्र आणि थोड्याच वेळापूर्वी आपल्या मनात आलेल्या वाईट विचारांबद्दल त्याची त्यालाच लाज वाटली.

पुन्हा मारूतीचे भ्रमण सुरू झाले. तो कुंभकर्णाच्या मंदिरात गेला. तो गाढ झोपेत होता. त्यानंतर सूक्ष्मरूप धारण करून तो सगळीकडे फिरू लागला. सीता सापडेना तेव्हा पुन्हा त्याच्या मनात विचारांचे चक्र सुरू झाले. 'सीता जिवंत असेल का? तिने आत्महत्या तर केली नसेल? आपली ही मोहीम फुकटच जाणार का? रामाला काय वाटेल ?'

हनुमान खरोखर निराश झाला. रात्र झाली. चंद्राचे शीतल चांदणे सगळीकडे पसरले होते. त्यामुळे चांदण्यातही त्याने सीतेचा तपास सुरू केला. दूरवर त्याला एक वन दिसले. तेच अशोकवन असावे असा त्याने अंदाज केला.

तेथे जाऊन पाहतो तो काय एका झाडाखाली एक स्त्री श्रीरामाचे नाव घेत स्वस्थ बसून होती. तिच्याभोवती अनेक राक्षसींचा गराडा होता. ज्याअर्थी ही स्त्री श्रीरामांचे नाव घेत आहे आणि तिच्याभोवती अनेक राक्षसींचा पहारा आहे त्याअर्थी ही सीताच असली पाहिजे हे त्याने ओळखले. शिवाय श्रीरामाने केलेले वर्णन तिच्याशी खूपच जुळत होते. रावण सीतेला आकाशमार्गाने घेऊन जात असताना आपण हेच रुप पाहिले होते असे हनुमानाला जाणवले.

हनुमानाला आनंद झाला पण या राक्षसींच्या गराड्यात सीतेला भेटायचं कसं असा त्याच्यापुढे उभा राहिला. तो पहाटेपर्यंत रामाचे नाव घेत झाडावरच बसून राहिला. सीता सापडली याचा त्याला अवर्णनीय आनंद झाला होता.

पहाट होताच जाग्या असलेल्या एकेक राक्षसी सीतेपासून थोड्या दूर अंतरावर जाऊन झोपू लागल्या. सर्वजण झोपल्या आहेत, त्यांना गाढ निद्रा आली आहे हे पाहून हनुमान हलकेच खाली उतरला.



'माते, तुला वंदन असो.' अचानकपणे हे शद्ब कानावर पडताच सीता दचकली.

'आपण ? इथे अचानक कसे आलात ?'

''घाबरू नका. मी रामसेवक हनुमान. रामरायांच्या सूचनेवरून मी आपल्या शोधार्थ इथपर्यंत आलो. आपण भेटलात. खूप आनंद झाला. आपण माझ्याबरोबर चलावे. मी आपणाला माझ्या खांद्यावरून अंतराळमार्गे रामाकडे घेऊन जातो.''

'तू रामसेवक की मायावी रूप धारण केलेला रावण सेवक ?'

''अशी शंका घेऊ नका. ही पाहा, ओळख पटवण्यासाठी श्रीरामांनी दिलेली भेट. असे म्हणून हनुमानाने रामरायाची अंगठी सीतामाईपुढे ठेवली. ती पाहताच हा रामसेवक आहे याची तिला खात्री पटली. 'राम-लक्ष्मण सुखरुप आहेत ना ? त्यांच्यावर काही संकटे नाहीत ना ?''

'सगळे काही ठीक आहे. फक्त आपल्या भेटीचा रामरायांना ध्यास लागला आहे. तेव्हा आपण माझ्याबरोबर चलावे.'

'हे पहा, ओळख म्हणून हा माझा अलंकार श्रीरामाला द्या आणि सांगा की ज्या रावणाने मला पळवून आणून अतोनात क्लेश दिले त्या रावणाला ठार करून मगच आपण मला घेऊन जा. तोपर्यंत मी माझ्या चारित्र्याचे रक्षण करीत धैर्यानं इथेच राहीन.'

'जशी आज्ञा.' असे म्हणून हनुमंत तेथून निघाला.

तात्पर्यः

कर्तव्य करताना वाटेल ती संकटे आली तरी त्यांना सामोरे जाऊन, त्यांच्यावर मात करावी लागते.

२२. लंकादहन

हनुमानाने सीतेशी बोलून तिला धीर दिला होता. 'आता रावणाच्या पराक्रमाचा, सामर्थ्याचा, त्याच्या सैन्याचा, राक्षस वापरत असलेल्या अस्त्रांचा, शस्त्रांचा अंदाज घेतला पाहिजे म्हणजे त्याच्याशी युद्ध करणे अधिक सोपे जाईल. या अशोकवाटिकेपासूनच विध्वंसाला सुरुवात करू या. त्यामुळे रावण आपल्या सैन्यातील काही तुकड्या पाठवेल. मी त्यांचा नाश केल्यावर लंकेतील लोकांनाही पुढे काय संकट ओढवणार आहे याची कल्पना येईल.'

असा सर्व विचार करून हनुमानाने अशोकवाटिकेतील वृक्ष उपटून वेगाने इकडे तिकडे फेकण्यास सुरुवात केली. सीता होती तो भाग सोडून संपूर्ण उपवनाचा त्याने विध्वंस केला. तेव्हा येथील राक्षसिणी व राक्षस घाबरून सैरावरा पळू लागले. त्यातील काहींनी रावणाकडे जाऊन तक्रार केली. तेव्हा रावणाने चिडून किंकर नावाच्या असंख्य राक्षसांना शस्त्रे घेऊन हनुमानाला पकडण्यासाठी पाठविले. हनुमानाने रागाच्या भरात लंकेतील घरे आपल्या शेपटीच्या तडाख्याने धडाक्याने पाडायला सुरुवात केली. मोठमोठ्याने आरोळ्या ठोकून लोकांना घाबरायला सुरुवात केली.

घरांच्या कौलारावर चढून कौले फोडून टाकली. घरातील उंची वस्त्रे, दागदागिने रस्त्यावर फेकून दिले. घोडे उधळून लावले. रथ मोडून टाकले. सर्वत्र घबराट निर्माण झाली. एक वानर एवढा उच्छाद मांडतोय ते पाहून जनता हैराण झाली. ही सर्व तक्रार रावणाच्या कानावर गेली.

एक माकड इतका गोंधळ कसा घालू शकतो हे रावणालाही समजेना. त्याने पराक्रमी सेनानीला, हनुमानावर त्याचा निःपात करण्यासाठी धाडले. पण एक प्रचंड शिळा उचलून हनुमानाने त्या सेनापतीवर फेकली. त्यासरशी सैन्यासह सर्व लोक त्या शिळेखाली ठार झाले.

एकापेक्षा एक सरस असे रावणाकडील सेनापती हां हां म्हणता धारातीर्थी पडू लागले. हनुमान कुणालाच आवरेना. सर्वांच्या तोंडचे पाणी पळाले.

कुणाला लाथाबुक्क्यांनी तुडवावे, कुणाला फेकून आपटावे, कुणाला बांधून ठेवावे. सगळीकडे हलकल्लोळ माजला. जांबुवाडी, विरुपाक्ष, रावणपुत्र, अक्ष या सर्वांचेच हल्ले निष्फळ ठरले. सर्वांना हनुमंताने यमसदनाची वाट दाखवली. शेवटी रावणाने इंद्रजितास पाठवले.

इंद्रजिताचे मूळ नाव मेघनाद, पण मागे त्याने इंद्रालाही जिंकले. तेव्हापासून त्याला इंद्रजित म्हणत असत.

इंद्रजिताने हनुमानावर बाणांचा वर्षाव केला. पण हनुमानाने तोही थोपविला. मोठमोठ्या प्रचंड शिळा फेकून त्याने सर्व बाणांचा चक्काचूर केला.



अखेर हनुमानाला पकडण्यासाठी वेगळेच अस्त्र पाहिजे हे ओळखून इंद्रजिताने ब्रह्मास्त्र सोडले. त्या अस्त्राचा मान राखण्यासाठी हनुमान ब्रह्मास्त्रास शरण गेले. त्यामुळे राक्षसांनी विजयाच्या घोषणा केल्या. दोरखंडाने बांधून त्यांनी हनुमानाला रावणापुढे आणले. रावणाने त्याला विचारले.

‘असे मर्कटा, एवढ्या मर्कटलीला करून लंकेत धुमाकूळ घालणारा तू आहेस तरी कोण? कुणाचा गुप्तहेर म्हणून आलास की काय?

‘गुप्तहेर? छे, मी आहे राजश्रेष्ठ पराक्रमी श्रीरामांचा दूत.’

‘मग दूताचे काम करायचे सोडून या माकडचेष्टा काय चालविल्या आहेस?’

‘अधर्म, अनीती, कपटाने वागणाऱ्याच्या राज्यात यापेक्षा दुसरे काय करणार आम्ही? रामाची भार्या सीता, तिला तू कपट करून पळवून आणलीस, यात तुझे चारित्र्य ते काय अन् पराक्रम तरी काय? मी रामांचा निरोप घेऊन आलोय. सीतामाईला सन्मानाने रामाकडे परत पाठवा. राम तुला क्षमा करतील. वेळीच जागा हो. आणखी कुकर्म करून पश्चातापाची पाळी स्वतःवर ओढवून घेऊ नकोस.’

‘हे मर्कटा, दूत म्हणून आलास की उपदेशाच्या चार फालतू गोष्टी मला शिकवायला

आलास? लायकीपेक्षा जास्त बडबड करून माझा पाणउतारा करतोस. थांब तुझे मुंडकेच उडवतो.' असं म्हणून रावणाने सेवकांना हनुमंताचे मुंडके उडविण्याची आज्ञा केली.

इतक्यात रावणाचा भाऊ बिभीषण पुढे होऊन म्हणाला, 'थांब रावणा, अशी घाई करू नकोस. हनुमान हा आपल्याकडे रामाचा दूत म्हणून आला आहे आणि दूताचा वध करणे हे आपल्या राजनीतीशास्त्रात बसत नाही. तेव्हा अशी घातकी कृती करू नकोस.'

'ठीक आहे. पण याला काहीतरी अद्दल घडविलीच पाहिजे. सेवकांनो, ह्याच्या शेपटीला फडकी गुंडाळा नि त्यावर तेल ओतून शेपटी पेटवून द्या. रावणाच्या विरुद्ध ब्र काढणाराची काय अवस्था केली जाते ते तरी कळू दे त्याला.'

सर्वांनी त्याला धरून ठेवले. काहीजणांनी शेपटीला कपडे गुंडाळण्यास सुरुवात केली. कितीही वस्त्रे गुंडाळली तरी शेपटी पुन्हा उघडी ती उघडीच. कारण हनुमंत आपली शेपटी फुगवत होता.

सर्वांच्या नाकीनऊ आले. शेवटी गुंडाळली एवढी वस्त्रे पुरेशी आहेत अशी मनाची समजूत करून आणखी फडकी गुंडाळण्याचा नाद त्यांनी सोडून दिला. त्यावर तेल ओतून हनुमंताची शेपटी पेटवून दिली.

हनुमानाने आपल्या जळत्या शेपटीकडे बघून विचार केला, 'मी लंकेतील बरीच घरे उध्वस्त केली, राक्षसराजाच्या सेनेच्या एका हिश्श्याचाही संहार केला. आता दुर्गांसमान मोठ्या घरांचा विध्वंस करणं बाकी राहिलं आहे. तेही करतो आणि त्याने बिभीषणाचे घर सोडून असंख्य घराघरांवर उड्या मारून प्रत्येक घर पेटविले. बघता बघता अर्ध्याअधिक लंकेने पेट घेतला.

तात्पर्यः

पापी लोकांना योग्य शासन करूनच अद्दल घडवावी लागते.

२३. रामाचे भेटीस हनुमंत

इकडे सागर तीरावर सर्व वानरसेना हनुमंताची वाट पाहत होती. एक एक दिवस त्यांना एकेक वर्षासारखा वाटत होता. हनुमान ज्या दिशेकडे गेला. त्या दिशेकडे सर्वांचे डोळे लागले होते. एक दिवस समस्त वानरांनी हनुमानाचा ढगांच्या गडगडाटासारखा सिंहनाद ऐकला. सर्वजण आनंदित होऊन उत्कंठतेने त्याची वाट पाहू लागले. जांबवानाने सर्वांना जवळ बोलावून म्हटले, ''हनुमान कार्य यशस्वी केल्याशिवाय येणार नाही व गर्जनाही करणार नाही.'' आणि थोड्याच वेळात हनुमान तेथे उपस्थित झाला. सर्वांनी त्याचा आदर सत्कार केला. त्याला खाण्यासाठी फळे आणून दिली व सर्वांनी त्याच्यावर प्रश्नांचा भडिमार केला.

हनुमानाने जांबवानाला, वृद्ध गुरुजनांना व कुमार अंगदाला अत्यंत प्रसन्नतेने अभिवादन केले व सर्वांच्या प्रश्नांची तो उत्तरे देऊ लागला. तो म्हणाला, ''मी सीतामाईचे दर्शन घेतले पण रावणाला ठार मारल्यावरच त्या परत येणार. तेव्हा सर्वांत प्रथम श्रीरामाच्या कानावर ही शुभवार्ता घालायला हवीच. चला, सारेजण रामाकडे जाऊ या.'' 'चला रे चला', असे म्हणत सर्व वानरसेना मोठ्या उत्साहाने, आनंदाने राम-लक्ष्मणाच्या भेटीसाठी निघाली.

इकडे राम, लक्ष्मण, सुग्रीव अजून कोणीच कसे परत आले नाही, याबद्दल आपापसात तर्क वितर्क लढवीत होते. इतक्यात दूरवर 'श्रीरामाचा विजय असो' अशा घोषणा त्यांच्या कानावर पडल्या. त्या घोषणा ऐकताच सुग्रीव

म्हणाला, 'रामराया, वानरसेना परत आली आणि काहीतरी शुभवार्ताच घेऊन सारे परतले असावेत असे मला वाटते. त्याशिवाय तुझ्या नावाचा जयघोष त्यांनी केलाच नसता.''

तेवढ्यात हनुमानाच्या पराक्रमाने आनंदित व उत्साहित झालेले सर्व वानर श्रीरामचंद्राजवळ आले. महाबाहू हनुमानाने प्रथम श्रीरघुनाथांच्या चरणांवर डोके ठेवून प्रणाम केला आणि सांगितले, 'देवी सीता पातिव्रत्याचे कठोरतेने पालन करीत आहे व तिने हा मणी आपल्याला दिला आहे.' तो मणी हृदयाशी लावून श्रीराम व लक्ष्मण दोघेही रडू लागले. मग काही वेळाने श्रीरामाने विचारले, 'सीता काय म्हणाली?'

'रावणाने मला दिलेली दोन महिन्यांची मुदत संपण्याआधीच श्रीरामाने सैन्यानिशी येऊन क्रूरकर्मा रावणाला ठार मारून मला इकडून लवकरात लवकर घेऊन जावे.' हा सीतेचा निरोप हनुमानाने सांगितल्यावर श्रीरामांनी प्रसन्नपणे व उत्साहाने सर्वांशी लंकेवर स्वारी करण्यासंबंधी विचार विनिमय सुरू केला.

श्रीरामांनी हनुमानाला सांगितले की तू लंकेविषयी, रावणाविषयी, त्याच्या सैन्याविषयी, आजूबाजूच्या परिसराविषयी, त्यांच्या शस्त्रांविषयी तू जे काही अनुभवलेस, निरीक्षण केलेस ते सर्व इत्थंभूतपणे सांग. हनुमानाने त्याप्रमाणे सांगितल्यावर हनुमानाला श्रीरामांनी प्रेमाने हृदयाशी धरले, कारण त्याने न सांगताही अनेक कामे चातुर्याने केली होती.

श्रीरामांनी व लक्ष्मणाने सुग्रीवाला सर्व सैन्याला जय्यत तयारीनिशी निघण्यास सांगितले. तेव्हा सुग्रीवाने लगेच संमती दर्शवून सांगितले, 'आपण काही काळजी करू नये. माझ्याबरोबर संपूर्ण वानरसेना तसेच जांबुवान, अंगद, नील, हनुमान वगैरे शूर लढवय्ये आहेत.'

अजिबात वेळ न गमावता श्रीराम व लक्ष्मणासह सुग्रीवाची प्रचंड वानरसेना लंकेच्या रोखाने निघाली. सारी सेना मोठ्या उत्साहाने श्रीरामांचा जयजयकार करीत होती. अरण्ये, डोंगर, दऱ्या ओलांडत ही सेना समुद्राच्या किनाऱ्यावर आली. हे सर्व सैन्य घेऊन समुद्र कसा ओलांडावा असा रामाला प्रश्न पडला. त्यांनी सतत तीन दिवस समुद्राची प्रार्थना केली. समुद्राने त्यांना पलिकडे जाण्यासाठी वाट द्यावी म्हणून ते विनवीत राहिले. पण समुद्र प्रतिसाद देईना. अखेर ते संतापून उठले. अस्त्राच्या प्रभावाने सागर आटविण्याच्या उद्देशाने त्यांनी आपल्या धनुष्यावर बाण चढवला. हे पाहून सारी सृष्टी कंपायमान झाली. भीतीने थरथरणारा समुद्रदेव त्यांच्या समोर हात जोडून प्रगट झाला, आणि म्हणाला, 'श्रीरामा सुग्रीवाच्या सेनेत नल नावाचा वानर प्रत्यक्ष विश्वकर्म्याचा पुत्र आहे. त्याच्याकडून तू माझ्यावर पूल बांधून घे. मी तो माझ्या छातीवर आनंदाने धरून ठेवीन.'

सागराच्या सूचनेप्रमाणे मोठ्या उत्साहात सेतू (पूल) बांधण्याचे काम सुरू झाले. विश्वकर्म्याच्या प्रतिभाशाली (पुत्राने) नलाने शेकडो वानरांच्या सहाय्याने समुद्रात शंभर योजने लांब पूल शीघ्रतया तयार केला.

हे काम सुरु असतानाच एक आश्चर्यकारक घटना घडली. ध्यानी मनी नसताना रावणांचा भाऊ बिभीषण श्रीरामाकडे आला. तो श्रीरामास म्हणाला, ''हे श्रीरामा, मला माझ्या भावाचे म्हणजेच रावणाचे वर्तन अजिबात पसंत नाही. तुझा पक्ष सत्याचा आहे. तेव्हा सत्याच्या बाजूने लढणे हेच मला योग्य वाटते. मी तुझ्याशी मैत्री करू इच्छित आहे.''

'हा काहीतरी रावणाचा डाव असावा' असे सर्वजण म्हणू लागले. इतक्यात हनुमंत पुढे झाला. ''थांबा, बिभीषण म्हणतोय ते खरं आहे. रावणाच्या हातून माझे मुंडके उडविण्याची वेळ आली, त्यावेळी याच बिभीषणाने रावणाला राजनीतीची जाणीव करून देऊन माझे प्राण वाचविले होते.'

हनुमानाचे बोलणे ऐकल्यावर श्रीरामांनी लक्ष्मण, सुग्रीव व जांबुवान यांचेही विचार ऐकले व सांगितले की, ''जो मला शरण येतो, माझ्याशी मैत्रीचा हात पुढे करतो किंवा रक्षणाची प्रार्थना करतो त्याला मी अभय दोतो. हे माझे व्रत मी सदैव पाळतो. तरी बिभीषणाला आपण मित्रत्वाने वागवावे.''

सेतू बांधून पूर्ण झाला. वानरसेना गर्जना करीत व रामाचा जयघोष करीत त्यावरून लंकेकडे निघाली. श्रीराम व लक्ष्मणाला मारुतीने खांद्यावर उचलून घेतले होते. प्रत्यक्ष रावणाचा भाऊ आपल्या पक्षात येऊन मिळाल्याने वानरसेनेचा उत्साह शंभर पट वाढला होता.

तात्पर्यः

श्रध्दापूर्वक केलेल्या परिश्रमातून फार मोठी कार्ये सहज होतात.

२४. रावण वध

संपूर्ण वानरसेना लंकेवर चढाई करण्यास निघाली असता श्रीरामाने सर्वांना आज्ञा केली की रस्त्यात कोणी असे वर्तन करू नये की ज्यामुळे वाटेत लागणाऱ्या नगरातील नागरिकांना, तपस्वी मुनींना त्रास होईल. नगरांपासून, जनपदांपासून दुरून वाटचाल करावी.

रावणाच्या दूतांनी जेव्हा प्रतिसागरासारखी अथांग सेना लंकेच्या किनाऱ्यावर बघितली तेव्हा राम-लक्ष्मण लंकेत आल्याची वार्ता ताबडतोब रावणापर्यंत पोहोचविली. तसा रावण मनातून घाबरला. कारण एकट्या हनुमानानेच थोड्या दिवसांपूर्वी लंका दहन करून आपल्या पराक्रमाची झलक त्याला दाखविली होती.

राम-लक्ष्मण तर उत्तम योद्धेच होते. तशात बिभीषणही रामास मिळालेला. एकूण परिस्थिती आपल्याला प्रतिकूल आहे हे रावणाने ओळखले होते. पण तसे भासवू न देण्यात त्याचा शहाणपणा होता.

त्याने महापार्श्व, प्रहस्त, इंद्रजित, कुंभ, निकुंभ या साऱ्या पराक्रमी योद्ध्यांना आवाहन केले व रामाचा निःपात झालाच पाहिजे, त्यासाठी प्राणार्पण ही करावयास सिद्ध होण्याची सर्वांना आज्ञा केली.

'अरे, ही क्षुद्र माणसे आणि माकडे आपणासारख्या महापराक्रमी वीरांना आव्हान देतात यासारखी अपमानकारक गोष्ट नाही. त्यांचा पुरता फडशा पाडा. म्हणावे, रावणाशी झुंज देणे इतके सोपे नाही.'

युद्धाला प्रत्यक्ष तोंड लागण्यापूर्वी जमलंच तर समेटाची बोलणी करून पहावी, म्हणून रामाने वालीपुत्र अंगद याला रावणाकडे पाठविले पण रावणाने शिष्टाईला स्पष्ट नकार दिला. त्यावेळी अंगद रावणाला म्हणाला, 'रावणा, निदान बंधू बिभीषणाने तुला केलेला बहुमोल उपदेश तरी आठव.'

'माझा बंधू? त्या भ्याडाला माझा बंधू म्हणायची मला लाज वाटते. जा रामाला सांग की रावण युद्धाला तयार आहे.' याला सभेतील सर्व राक्षसांनी, सेनापतींनी संमती दर्शविली, कारण राक्षस पराक्रमाने बलाढ्य होते परंतु ते शत्रूचे बलाबल जाणत नव्हते, नीतीशास्त्राचेही त्यांना ज्ञान नव्हते.

युद्धाला सुरूवात झाली. तुंबळ रणकंदन माजले. अनेक पराक्रमी योद्धे ठार झाले.

तेव्हा रावणाने इंद्रजिताला पाठविले. इंद्रजित महापराक्रमी होता. त्याने आपले खास अस्त्र बाहेर काढले व स्वतः गुप्त होऊन अनेक वानरांवर सोडले.

वानर सैन्यातले बरेच जण ठार झाले. शेवटी राम-लक्ष्मणांवर त्याने सर्पास्त्र सोडले. त्याचबरोबर राम-लक्ष्मण मूर्च्छित झाले. तोच इंद्रजिताने आरोळी ठोकली, 'राम-लक्ष्मण ठार झाले. आपला विजय झाला.'

हे वृत्त रावणाला कळताच तो अत्यंत आनंदित झाला. हर्षोत्फुल्ल रावणाने सीतेचे रक्षण करणाऱ्या राक्षसिणींना बोलावणे धाडले. त्रिजटा व इतर राक्षसींना त्याने आज्ञा केली की सीतेला पुष्पक विमानातून नेऊन राम-लक्ष्मण मरून पडल्याचे दृश्य दाखवा. त्यामुळे त्यांच्यात गुंतवलेले तिचे मन ती काढून घेईल व स्वतःहून माझ्याकडे येईल.

प्रत्यक्षात राम-लक्ष्मण मृत झालेच नव्हते. सर्पास्त्राने त्यांना गुंगी आली होती. इतक्यात गरुडाचे तिथे आगमन झाले. सर्प आणि गरुड यांचे कायमचे वैर. त्यामुळे गरुडाचे आगमन होताच सर्पास्त्राचा प्रभाव नाहीसा झाला व राम-लक्ष्मण पुन्हा ताजेतवाने होऊन युद्धासाठी सज्ज झाले. हे वृत्त सीतेला कळताच तिचे उदास झालेले मन पुन्हा टवटवीत झाले.

रावणाने मग एकेका वीराला रणांगणावर पाठविण्यास सुरूवात केली. प्रथम प्रहस्त, मग धुमराक्ष पण रामाने त्यांचाही वध सहजपणे केला.

सर्व सेनानी रामाकडून पराभूत होत असल्याचे पाहून रावणाने कुंभकर्णाला झोपेतून जागे केले. प्रथम कुंभकर्णाने रावणाला चांगलीच समज दिली की 'सीतेला पळवून आणण्याच्या वेळी तू कोणाशी सल्लामसलत केली नाहीस. आता राक्षसांचा नाश होण्याची वेळ आली असता तू सर्वांची मदत घेतोस. मंदोदरीने व बिभीषणाने सांगितलेला सल्ला तू मानला नाहीस. आता तू माझा भाऊ असल्याने मी राम-लक्ष्मणांशी युद्ध करून त्यांना मारून टाकतो.' असे म्हणून तो महापराक्रमी, अवाढव्य शरीराचा, बलाढ्य असा कुंभकर्ण लढाई करण्यास गेला. त्याने वानरसेनेचा खूप नाश केला परंतु शेवटी श्रीरामांनी त्याचा वध केला.

पुनश्च इंद्रजिताने सारी सूत्रे आपल्या हाती घेतली. इंद्रजिताला अदृश्य होण्याची शक्ती प्राप्त होती. पण त्यासाठी प्रत्येक युद्धापूर्वी त्याला एक यज्ञ करावा लागे. हे सर्व बिभीषणाला माहीत असल्याने त्याने हा यज्ञ होऊ दिला नाही. इंद्रजित होम करत असतानाच लक्ष्मणाने व हनुमानाने राक्षस सेनेवर इतका जबरदस्त हल्ला केला की राक्षसांचा विनाश इंद्रजिताला बघवेना व यज्ञ अर्धवट सोडून तो रणांगणावर आला. लक्ष्मण व इंद्रजितामध्ये भीषण घनघोर लढाई झाली व अखेर लक्ष्मणाने इंद्रजिताला ठार केले.

वानरराज सुग्रीवाने राक्षसराज महोदराचे मस्तक छाटून त्याला ठार केले. सुग्रीव म्हणजे सुंदर मान असलेला. तर या सुग्रीवाला 'हीनग्रीवा' करण्यासाठी व राम-लक्ष्मणाला ठार करण्यासाठी रावणाने उरलेल्या सर्व राक्षसांना आज्ञा केली व स्वतः पुन्हा समरांगणात आला. आता राम-लक्ष्मणाची खरी कसोटी होती. रावण महाबलाढ्य अन् अतिशूर राक्षस होता. शंकर त्याच्यावर प्रसन्न होते आपल्या अमोघ शक्तीच्या द्वारे त्याने लक्ष्मणाला मूर्च्छित केले. आपल्या बहिश्चर प्राणाप्रमाणे असलेल्या प्रिय बंधू लक्ष्मणाला त्या जखमी-मूर्च्छित अवस्थेत पाहून रामाला शोक अनावर झाला. त्याला अतिशय चिंता वाटू लागली. पण वानरसेनेत सुषेण नावाचा धन्वंतरी होता. त्याने संजीवनी वनस्पती मिळाली तर लक्ष्मण त्वरित शुद्धीवर येईल' असे सांगितले.

रामाचा परम सेवक हनुमंताला हे कळताच त्याने द्रोणागिरी पर्वताकडे धाव घेतली पण तेथे गेल्यावर तो गोंधळला. संजीवनी वनस्पती नेमकी कोणती हे त्याला कळेना. मग काय, सर्व पर्वतच एका हातावर घेऊन तो रामाकडे आला. हनुमानाच्या अचाट शक्तीने रामही चकित झाले. संजीवनीचा रस लक्ष्मणाला पाजण्यात आला. त्याबरोबर लक्ष्मण ताजातवाना झाला.

रामाने रावणाच्या तोडीस तोड अशी अस्त्रे वापरून रावणास नामोहरम केले. बराच वेळ दोघांमध्ये भीषण लढाई चालू होती. अखेर अगस्ती ऋषींच्या सांगण्याप्रमाणे रामाने सूर्यदेवतेचे स्मरण करून रावणावर बाणांचा वर्षाव सुरू केला.

त्यामुळे प्रत्येक बाण प्रखर, धारदार होऊ लागला. दोघांचे रथ समोरासमोर आले. रामाने अखेर खास रावणासाठीच शिल्लक ठेवलेला निर्वाणीचा बाण बाहेर काढला. त्या बाणाने अचूक शरसंधान करताच रावणाच्या छातीत तो इतक्या वेगाने घुसला की रावण धाड्कन जमिनीवर कोसळला. एका महान पाप्याचा अंत झाला. धर्माचा अधर्मावर, नीतीचा अनीतीवर, मानवश्रेष्ठाचा राक्षसी क्रूर वृत्तीवर विजय झाला. देव आनंदले. स्वर्गातून त्यांनी श्रीरामावर पुष्पवृष्टी केली. सर्वत्र आनंदीआनंद झाला.

तात्पर्यः

पापी, दुराचारी व्यक्तीचा शेवटी विनाश हा ठरलेलाच.

रामाने रावणाला ठार मारून मोठे पवित्र कार्यच केले.

२५. सीतेचे अग्निदिव्य

श्रीरामाने रावणाचा वध केला. सद्‌गुणांनी दुर्गुणांवर विजय मिळविला. एका दुष्टात्म्याचे निर्दलन केले. पीडितांना आनंद झाला. सर्वत्र समाधान नांदू लागले. लंकेच्या सिंहासनावर रामाने बिभीषणाची नियुक्ती केली. सर्वांच्या साक्षीने त्याला राज्याभिषेक केला.

उत्कंठतेने व्याकूळ झालेल्या सीतामाईला अशोकवानातून घेऊन येण्यासाठी स्वतः बिभीषण व त्याची पत्नी सुरमा तिकडे गेले. सीतामाईस वंदन करून ते म्हणाले, 'माते, शूर रामाने त्या मदांध, दुष्ट रावणाला ठार मारून आपणास मुक्त केले आहे. आपण आमच्याबरोबर चलावे. स्नानादिक विधी उरकून घ्यावे. आम्ही आपली श्रीरामांशी भेट करून देणार आहोत.'

रावणाचा वध झाल्याने, दुष्टाला शासन झाल्याचे ऐकून सीता अत्यानंदाने हरखून गेली.

राणी सुरमाने सीतेला तेल, सुगंधी उटणे वगैरे लावून स्नान घातले. केसात फुले खोचली. नवीन वस्त्रे दिली.

श्रीराम व सीतामाई समोरासमोर येताच दोघांच्या डोळ्यातून घळघळ अश्रू ओघळले. अर्थात् ते आनंदाश्रू होते. ते दृश्य पाहून सर्व वानरसेनेने आनंदाने श्रीराम व सीतामाईचा जयजयकार केला.

श्रीराम-सीता भेटीने वातावरण आनंदमय झाले. मग राम सीतेला म्हणाले, ''जानकी, तुझ्या इच्छेप्रमाणे मी रावणाचा वध करून तुला बंदिवासातून मुक्त केले आहे. आता....'

'बोला ना, आता... म्हणून थांबला ---? मी आपलं मनोगत ओळखलंय. मी रावणाच्या बंदिवासात वर्षभर होते, त्यामुळे माझ्या पावित्र्याबद्दल जनमानसात शंका येणे स्वाभाविक आहे. त्यामुळेच आपल्याला माझ्या पावित्र्याबद्दल शंका नसूनही आपण माझा स्वीकार करू इच्छित नाही, असंच ना? ठीक आहे, लक्ष्मण भावोजी, चिता रचा.'

''चिता? हे काय सांगताय वहिनी?''

'हे पहा, शंका विचारू नका. मी तुम्हाला आज्ञा करतेय, चिता रचा.''

नाइलाजाने लक्ष्मणाने आणि वानरसेनेने चिता रचली. सर्वांचे चेहरे गंभीर नि उदास झाले. चिता पेटविण्यात आली.

थोड्याच वेळात ज्वाळांनी पेट घेतला. सीतेने भगवंताचे स्मरण केले नि अग्निदेवाला उद्देशून ती म्हणाली, 'अग्निदेवा, मी जर तुझ्या इतकीच पवित्र असेन तर माझ्या शरीरास यत्किंचितही इजा होणार नाही आणि जर मनाने थोडी जरी अपवित्र असेन तर तू माझी राख करून टाक.' असे म्हणून सीतेने धीरगंभीरपणे अग्नीत प्रवेश केला.

सर्वांच्या मनात एक अनामिक काळजी दाटून आली. तेथे जमलेल्या सर्व स्त्रियांच्या तोंडून चीत्कार बाहेर पडला. संपूर्ण वानरसेना जोरजोरात हाहाकार करू लागली? 'काय हे भायानक दिव्य? काय होणार सीतामाईचे?' अशा विचारांनी साऱ्यांची मने विषण्ण झाली. अग्निज्वाळा क्षणात भडकल्या. पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे सीतामाई त्या चितेत हात जोडून निश्चलपणे उभ्या होत्या.

अचानक नवल घडले. प्रत्यक्ष अग्निदेवच त्या ज्वाळांतून प्रगट झाले. सीतादेवीचा हात धरून, अग्निदेव रामाला उद्देशून म्हणाले, 'श्रीरामा, सीता अतिशय पवित्र आहे. तू तिचा निःसंकोच मनाने स्वीकार कर.' एवढे बोलून अग्निदेव क्षणात अंतर्धान पावले. सीतेच्या अंगाला वा वस्त्राला अग्निज्वालांचा स्पर्शही झाला नव्हता. सीता प्रसन्न वदनाने चितेबाहेर आली. श्रीरामाने अत्यंत आनंदाने तिचा स्वीकार केला.

हजारो लोकांच्या उपस्थितीत अग्निदिव्य करून सीतेने आपल्या पावित्र्याची सर्वांना खात्री पटवून दिली. सर्वांनी जयघोष केला. 'सियावर रामचंद्र की जय.'

तात्पर्यः

संशयाने सर्वनाश होतो, तो वेळीच दूर करणे हेच हिताचे असते.

२६. अयोध्येस प्रयाण

श्रीराम, सीता व लक्ष्मणासह अयोध्येला जाण्यासाठी उद्युक्त झाल्यावर राजा बिभीषण अतिशय विनम्रतेने श्रीरामाला म्हणाला, ''मी केवळ प्रेम, सन्मान आणि सौहार्द या कारणांनी आपणांस विनंती करतो की काही काळ आपण लंकेतच विसावा घ्यावा. मी आपला सत्कार करू इच्छितो.''

तेव्हा श्रीराम अतिशय प्रेमाने बिभीषणाला म्हणाले, ''बिभीषणा, यात माझा पराक्रम तो काय? खरं म्हणजे हा आपणा सर्वांचा विजय आहे. पातकी भावाला सहाय्य न करता तू सत्याच्या म्हणजे आमच्या पक्षाला येऊन मिळाल्यामुळे माझे काम खूपच सोपे झाले. या हनुमंताने पराक्रमाची शर्थ केली. सुग्रीवाने आपले सगळे सैन्य दिले. यामुळेच रावण आणि त्याच्या असंख्य राक्षसवीरांना ठार करणे आपणास शक्य झाले. तेव्हा सत्कार या मंडळींचा कर. मला मात्र भरताला दिलेल्या शब्दाला जागून वेळेवर अयोध्येस पोहोचायला हवे. तेव्हा आम्ही अयोध्येस लवकर पोहोचावे यासाठी आमची काहीतरी व्यवस्था कर. माझ्या सत्काराचा विचार सोडून दे. मला त्याची यत्किंचितही अभिलाषा नाही.'' हे ऐकल्यावर बिभीषणाने लगेच रामासाठी पुष्पक विमान मागवले. त्यात सीता, हनुमान, सुग्रीव, बिभीषण, स्वतः राम आणि लक्ष्मण अशी निवडक मंडळी बसली. वानरसेनेचा प्रेमाने निरोप घेतल्यावर पुष्पक विमानाने अयोध्येस जाण्यासाठी उड्डाण केले. विमानातून जाताना रामाला आपल्या वनवास मार्गातील एकेक ठिकाणे दिसू लागली. तसतशी त्याने त्या त्या ठिकाणांची माहिती सीतेला सांगताना आपण लंकेत कसेकसे आलो, वाटेत काय काय घटना घडल्या, कोण कोण भेटले, कुणाला कुणाला कशासाठी ठार केले, आपल्या मदतीला कोण कोण धावून आले याची साद्यंत माहिती दिली.

अयोध्या नगरी जवळ आली तशी थोडे अलीकडे थांबून श्रीरामाने हनुमंताला बंधू भरताकडे निरोप देऊन पाठविले. उद्देश एवढाच की, त्यामुळे भरताचे क्षेम तर कळावेच, पण राजसत्ता उपभोगत असल्यामुळे त्याच्या वृत्तीत काही फरक पडला

आहे की काय हे ही कळावे. आपण येणार हे कळल्यावर त्याची प्रतिक्रिया कशी होते हे सारे समजून घेण्यासाठीच रामाने हनुमंताला अयोध्येस पाठविले.



मोठ्या आनंदाने हनुमंत अयोध्येस पोहोचला. त्याने भ्रातृवत्सल भरताची भेट घेतली. भरत दुःखी व कृश झाला होता. त्याने वल्कले व मृगचर्म धारण केले होते. डोक्यावर जटाभार उंच होता. त्याचे मंत्री, पुरोहित आणि सेनापती यांनीही भगवी वस्त्रे धारण केली होती. हनुमानाने त्या धर्मज्ञ भरताला प्रणाम केला व सांगितले, 'राजे भरत, आपले बंधू, सीतामाई व लक्ष्म णासह वनवास संपवून उद्याच अयोध्यानगरीस परत येत आहेत.

'राम उद्या येणार' हे शब्द ऐकताच भरताला अत्यानंदाने भोवळ आली व तो जमिनीवर कोसळला. शुद्धीवर आल्यावर त्याने हनुमानाला प्रेमाने मिठीच मारली. 'फार आनंदाची बातमी दिलीस हनुमंता! याच शुभवेळेची मी उत्सुकतेने वाट पाहत होतो. जा, माझ्या प्रेमळ बंधूला सांग, म्हणावं भरत आणि अयोध्येची सारी प्रजा आपले प्रचंड उत्साहाने स्वागत करीत आहे.'

लगेच फुले, माळा, तोरणांनी सारी अयोध्यानगरी सुभोभित करण्यात आली. मंगलवाद्ये वाजू लागली. सर्व प्रजाजनांनी सुंदर कपडे परिधान केले. सडा रांगोळ्यांनी अंगणे सुशोभित झाली. रस्त्यारस्त्यावर कमानी उभारण्यात आल्या. राम स्वागतार्थ अयोध्येच्या प्रवेशद्वारावर हजारो प्रजाजन उपस्थित झाले.

श्रीराम-लक्ष्मण आणि सीता यांचे जयघोषात व सुगंधी फुलांच्या वर्षावात भव्य स्वागत झाले. श्रीरामाच्या जयजयकाराने आकाश निनादून गेले. अवघ्या अयोध्येत नवचैतन्य निर्माण झाले.

कौसल्या मातेला अतिशय आनंद झाला. कैकेयी, सुमित्रा यांनाही धन्यता वाटली. सर्वांना त्यांचा राम परत भेटला. राम-लक्ष्मणांना आपल्या मातांचे दर्शन झाले. सीतामाईस सासूबाई भेटल्या. त्यांनी सर्वांना लवून वंदन केले. सर्वांचेच शुभाशीर्वाद घेतले. बंधू बंधूनी एकमेकांना कडकडून प्रेमालिंगन दिले. उर्मिलेने लक्ष्मणाला ओवाळून त्याचे स्वागत केले. श्रीरामाच्या आगमनाप्रित्यर्थ उत्तम जेवणावळी झाल्या. रोषणाईने अयोध्यानगरी लखलखली, काळोख संपून सुखाचा प्रकाश सर्वत्र पसरला.

धर्मज्ञ भरताने श्रीरामांच्या पादुका स्वतःच्या हाताने श्रीरामांच्या पायात घातल्या आणि हात जोडून म्हणाला, ''महाराज, तुम्ही आईवडिलांना पूजनीय मानून हे राज्य मला दिलेत. माझ्याजवळ ठेव म्हणून ठेवलेले तुमचं हे संपूर्ण राज्य मी आज आपल्या चरणी परत केलय.

आज माझा जन्म सफल झाला. अत्यंत बलवान बैल जे ओझे एकट्याने उचलू शकतो ते वासरू उचलू शकत नाही. मी आपल्या कौशल्याचे अनुकरण करू शकत नाही. तरी आम्हां सर्वांची ही इच्छा आहे की लवकरात लवकर आपला राज्याभिषेक पहावा.''

नीतीमान भरताचे हे बोलणे ऐकून सर्वांच्या डोळ्यातून अश्रूधारा वाहू लागल्या.

शुभमुहूर्तावर वसिष्ठांनी श्रीरामाला व सीतेला रत्नजडित चौरंगावर बसविले व वसिष्ठ, वामदेव, जाबाली, कश्यप, कात्यायन, सुयज्ञ, गौतम आणि विजय या आठ मंत्र्यांनी त्यांना अभिषेक केला.

अखेर चौदा वर्षांच्या खडतर वनवासानंतर, रामाचा राज्याभिषेक पार पडला. फक्त हा आनंद सोहळा पाहण्यास रामाचे पिताश्री राजे दशरथ हयात नव्हते. पण त्याला इलाज नव्हता. हा सारा नियतीचा खेळ होता.

एकूण अयोध्यानगरीवर आता खऱ्या अर्थाने रामराज्य सुरू झाले. सर्वत्र आनंदीआनंद झाला. कोणीही दुःखी किंवा कष्टी नव्हते. प्रजेचे हित पाहण्यात तत्पर, कर्तव्यदक्ष, शब्दाला जागणारा, प्रेमळ, पराक्रमी सत्यवचनी असा त्यांचा राम त्यांचा राजा झाला होता. प्रजेची इच्छा पूर्ण झाली होती.

तात्पर्यः

रामाच्या गैरहजेरीत अयोध्येचे राज्य सांभाळूनही भरताला राजपदाचा मोह झाला नाही हा भरताच्या स्वभावाचा विशेष.

ज्या राजावर प्रजेचा संपूर्ण विश्वास असतो तोच खरा यशस्वी राजा.

२७. सीता त्याग

रामाचा राज्यकारभार सुरळीत चालू होता. लोक सुखी, समाधानी होते. तरी राजाने कर्तव्यदक्षता म्हणून अधून मधून प्रजा काय म्हणतेय याचा कानोसा आपल्या सेवकांद्वारे घेणे आवश्यक असते.

त्या दृष्टीने रामाने प्रजेत आपल्या विषयी काय भावना आहेत, आपल्यामागे लोक काय बोलतात, याची चौकशी सुरू केली. तेव्हा एकाने स्पष्टपणेच रामास सांगितले, ''राजे, प्रजा खूप सुखात आहे. परंतु, जिला रावणस्पर्श झाला आहे, जी रावणाकडे एक वर्षभर होती, ती सीता पवित्र रहाणे अशक्यच आहे, असं मात्र सीतामाईच्या संदर्भात कुठं कुठं बोललं जात आहे. त्यांच्या मते आपण सीतामाईचा स्वीकार करावयास नको होता.''

हे ऐकून राम अत्यंत शोकाकुल झाला. वास्तविक सर्व वानरसेना, लंकेचे सर्व रहिवासी, खुद्द बिभीषण, हनुमंत इत्यादींच्या समोर सीतेने अग्निदिव्य करून आपले पावित्र्य सिद्ध केलेय तरीसुद्धा प्रजाजनात कुठे कुठे असा आरोप पुनः पुन्हा केला जातो याचे रामाला फार वाईट वाटले. तो फार दुःखी झाला. 'नको या सीतेचाही मोह नको. लोकांच्या समाधानासाठी आता तिचा त्याग हाच एक मार्ग आहे.' असा रामाने ठाम निश्चय केला.

त्याचवेळी सीतेला दिवस गेले होते. तिला वनात वा कुठेतरी आश्रमात रहाण्याचेच डोहाळे लागले होते. ही संधी साधून व तिचे डोहाळे पुरविण्याचे निमित्त करून तिला कायमची वनात सोडून देण्याचा निर्णय रामाने घेतला. 'आपल्या चारित्र्यावरील लहान कलंकही नाहीसा करणे योग्य आहे' असा रामाने मनाशी विचार केला.

लगेच त्याने लक्ष्मण, भरत व शत्रुघ्न ह्यांना बोलावून घेतले व लोक काय चर्चा करतात, सीतेविषयी काय बोलतात ते अत्यंत दुःखी अंतःकरणाने रामाने त्यांना सांगितले. सर्वजण अत्यंत चिंतित व दुःखी झाले तेव्हा लक्ष्मणाला उद्देशून श्रीराम म्हणाले, ''लक्ष्मणा, मी याहून अधिक दुःख कधीही सहन केलेलं नाही. उद्या सकाळी जानकीला गंगेपलीकडील वाल्मीकि ऋषींच्या आश्रमाजवळ सोडून ये. मात्र तिला अयोध्येस परत आणू नकोस. फक्त तू एकटाच परत ये. यावर मला चर्चा नकोय. ही माझी आज्ञा आहे आणि ती तू पार पाडावीस अशी माझी इच्छा आहे.''

रामाच्या आज्ञेप्रमाणे लक्ष्मण सीतेला वनात घेऊन गेला. वाल्मीकी ऋषींच्या आश्रमाजवळ आल्यावर मात्र त्याने आतापर्यंत मनावर ठेवलेला संयम सुटला सुटला व तो खूप रडू लागला. त्याला रडताना पाहून सीतेने त्याला विचारले, ''लक्ष्मणा, का रडतोस?'



तेव्हा लक्ष्मणाने डोळे पुसत जनापवाद आणि श्रीरामाने दुःखी अंतः करणाने केलेली आज्ञा सांगितली. ते ऐकताच दुःखाच्या आकांताने सीता मूर्च्छित होऊन जमिनीवर कोसळली नंतर शुद्धीवर आल्यावर म्हणाली, ''लक्ष्मणा, ब्रह्मदेवाने माझं हे शरीर दुःख भोगण्यासाठीच निर्माण केलं आहे. मी गेल्या जन्मी कोणतं पाप केलं होतं कुणास ठाऊक? तुम्ही सर्वजण, श्रीरामही जाणतात की मी शुद्ध चारित्र्याची आहे. अग्निदिव्य करून मी माझे पावित्र्य सिद्ध केले होते. मी याक्षणी माझं जीवन गंगेच्या पाण्यात विसर्जित केलं असतं परंतु मी गरोदर असल्याने राजाचा वंश नष्ट होईल असं मी करणार नाही. लक्ष्मणा, तू जा, श्रीरामांना व सर्व मातांना माझा प्रणाम सांग आणि माझा निरोप सांग, 'माझ्या पतीच्या सुखातच मी माझं सुख मानते.' एवढे कसेबसे बोलून सीता दुःखाने रडू लागली.

लक्ष्मणानेही हमसाहमशी रडत धरणीवर डोके ठेवून मातृवत् असलेल्या सीतामाईला

प्रणाम केला व कसातरी जाऊन नावेत बसला. नाव दूरवर जाईपर्यंत लक्ष्मण मागे वळून वळून पहात होता. त्याच्याही डोळ्यातून अश्रूधारा अखंडपणे वहात होत्या.

तात्पर्य:

जननिंदेचा बारीकसाही ठपका आपल्याला लागणार नाही याबद्दल राजाने नेहमीच काळजी घ्यायला हवी, हेच रामाच्या वागणुकीवरून सिद्ध होते.

२८. रामावताराची अखेर

लक्ष्मण सीतेला वाल्मीकि आश्रमाजवळ सोडून रडत रडतच निघून गेला. तो दिसेनासा झाल्यावर त्या वनात एकाकिनी सीता दुःखातिशयाने विलाप करु लागली. काही ऋषिकुमारांनी सीतेला रडताना पाहिले व ते धावतच आपल्या आश्रमात गेले. तपस्वी वाल्मीकींना प्रणाम करुन ते म्हणाले, 'भगवन्, गंगातटावर कोणत्या तरी महात्मा नरेशाची पत्नी, अगदी साक्षात लक्ष्मीसारखी दिसणारी स्त्री आक्रोश करीत आहे, आपण तिला पहावे. ती खूप दुःखी दिसत आहे.'

वाल्मीकि ऋषी त्वरित गंगातीरी निघाले शोकग्रस्त सीतेला पहाताच त्यांनी ओळखले व अत्यंत प्रेमाने, मृदु आवाजात ते म्हणाले, ''मला माहीत आहे, सीते, तू निष्पाप आहेस. विदेहनंदिनी, तू आता निश्चिंत हो. माझ्या आश्रमांतील तापसी तुझा मुलीप्रमाणे सांभाळ करतील. तू आपल्याच घरी आली आहेस असे समज आणि खेद करु नकोस.'' असे आपुलकीचे शब्द ऐकून सीतेने वाल्मीकींच्या चरणांवर मस्तक ठेवून नमस्कार केला आणि ती महर्षीच्या आश्रमात गेली.

इकडे रामाचा राज्यकारभार सुरळीत सुरु झाला. ऋषीमुनींना सतत त्रास देणाऱ्या लवण नावाच्या राक्षसास बंधू शत्रुघ्नाने ठार मारले व त्याची मधुरानगरी जिंकून घेऊन शत्रुघ्न तिथला राजकारभार पाहू लागला. काही दिवसानंतर वाल्मीकि ऋषींच्या आश्रमात सीता बाळंत झाली. तिला दोन सुपुत्र झाले. त्यांची नावे वाल्मीकि ऋषींनी कुश व लव अशी ठेवली.

वाल्मीकि ऋषींनी त्या बालकांचे उत्तम प्रकारे पालन पोषण केले त्यांना सर्व विद्या शिकवून विद्याविभूषित केले. कुश आणि लव दोघांना जन्मतःच गायनकला उत्तम अवगत होती. त्यांचा गोड गळा ऐकून वाल्मीकि ऋषींनी त्यांना 'रामचरित' गाण्याला प्रोत्साहन दिले.

काही काळ लोटल्यानंतर रामाच्या मनात असे आले कि, जनकल्याणर्थ आपण अश्वमेध यज्ञ करावा. या कल्पनेला सर्वांनी मान्यता दिली. यज्ञाची तयारी परिपूर्ण झाली.

देशोदेशींच्या राजांना निमंत्रणे गेली. ऋषीमुनी आले. विद्वान ब्राह्मण, पुरोहित आले, बिभीषण आला. वाल्मीकि ऋषीही आले, बरोबर त्यांनी कुश लव यांना आणले होते. मात्र वाल्मीकि ऋषींनी त्यांना एक सूचना देऊन ठेवली होती. ''बाळांनो, तुमच्या गोड गळ्याने रामचरित्राचे जिथे जिथे शक्य होईल तिथे तिथे गायन करा. प्रत्यक्ष रामाने जर तुम्हाला

विचारलेच की, तुम्ही कोणाची मुले, तर फक्त एवढंच सांगा की, आम्ही वाल्मीकी ऋषींचे शिष्य आहोत.''



ठिकठिकाणी त्यांचे गायन सुरु झाले. लोकांनी त्यांची स्तुती केली. त्यांना पाहून जणू काही ही रामाचीच बाळे आहेत असा त्यांना भास होई. लव व कुश यांच्या गायनाची कीर्ती रामापर्यंत पोहोचली.

या अश्वमेध यज्ञातच श्रीरामाने या मुलांचे गायन ठरविले. 'बाळांनो आपण कोण', असा प्रश्न करताच त्यांना वाल्मीकी ऋषींनी सांगितल्याप्रमाणे, 'आम्ही वाल्मीकी ऋषींचे शिष्य आहोत' असेच उत्तर दिले. 'मग वाल्मीकी ऋषी कुठे आहेत?' असा प्रश्न करताच ते म्हणाले,

'ते या यज्ञमंडपातच आहेत.' रामाने दोघांचे गायन ऐकण्याची इच्छा प्रदर्शित केली. कुश लव यांनी गायनास सुरवात केली. राम त्यांचे गाणे तल्लीनतेने ऐकू लागले. ऐकता ऐकता त्यांच्या मनात आले 'ही आपली बाळे नव्हेत ना?' त्यांनी वाल्मीकी ऋषींना पाचारण केले. मुलांच्या गायनाची रामाने खूप प्रशंसा केली.

वाल्मीकि ऋषी येताच रामाने त्यांना वंदन केले. त्यावर वाल्मीकि ऋषी म्हणाले, 'रामा, ज्यांचे गायन तू आता ऐकलेस, ती तुझीच मुले आहेत. सीतामाई माझ्याच आश्रमात आहेत. त्यांचे बाळंतपण व या मुलांचे संगोपन माझ्याच आश्रमातील तापसी मुलींनी उत्तम प्रकारे केले.'

'मुनिवर्य, सीता पवित्र असेल तर तिने या राजदरबारात येऊन लोकापवाद दूर करण्यासाठी पुन्हा एकदा दिव्य करावे, अशी माझी इच्छा आहे.' जानकी आली. रामाला वंदन करुन, ती भूमीला उद्देशून म्हणाली, 'हे भूमाते, मी जर खरोखरीच पवित्र असेन तर तू तात्काळ मला तुझ्या पोटात घे.'

क्षणात धरणी दुभंगली आणि सीता भूमातेच्या उदरात गडप झाली.

रामासह सारी प्रजा हळहळली. एकूण आपले कार्य संपले आहे हे रामाच्या ध्यानी आले. आता आपणही आपली जीवितयात्रा संपवावी असे त्याला वाटू लागले.

पुढे काही काळानंतर वृद्धत्वामुळे कौसल्या, सुमित्रा, कैकेयी यांचेही प्राणोत्क्रमण झाले.

त्यानंतर एकदा साक्षात् काळ तापसाच्या रुपाने श्रीरामास भेटावयास आला. श्रीरामांनी त्याचे पूजन केले तेव्हा ते ऋषी म्हणाले, 'मला तुमच्याशी एकांतात काही महत्त्वाचे बोलायचे

आहे. परंतु जो कोणी आपले बोलणे ऐकेल किंवा आपल्याला बोलताना पाहील. त्याचा मी वध करेन.'' हे ऐकल्यावर श्रीरामांनी लक्ष्मणाला, हे सर्व सांगून, दरवाजावर उभे केले. श्रीरामांचे व काळाचे संभाषण सुरु असतानाच महर्षी दुर्वास तेथे आले. ते श्रीरामांना भेटू इच्छित होते. तेव्हा लक्ष्मणाने त्यांना थोडे थांबण्यास सांगितले. दुर्वास ऋषी भयंकर संतापले व म्हणाले, ''आताच्या आता श्रीरामांना माझ्या आगमनाची सूचना दे, नाहीतर हे राज्य, श्रीराम, भरत व तुम्हा सर्वांच्या संततीना मी शाप देईन.'' हे ऐकल्यावर लक्ष्मणाने विचार केला की आपल्या एकट्याचा मृत्यू ओढवला तर चालेल परंतु सर्व राज्याचा विनाश नको म्हणून श्रीरामाची आज्ञा मोडून लक्ष्मण आत गेला. त्यामुळे श्रीरामांनी अत्यंत दुःखित अंतःकरणाने लक्ष्मणाचा त्याग केला. त्यानंतर लक्ष्मणाने शरयू नदीच्या तीरावर जाऊन स्वतःच मरण पत्करले.

अखेर रामाने सर्वांच्या साक्षीने, ऋषीमुनींच्या आशीर्वादाने, शरयू नदीत खोलवर प्रवेश केला आणि अत्यंत शांतपणे शरयूच्या पात्रात आपले अवतारकार्य संपविले.

तात्पर्यः

जन्माला येऊन करावयाची सत्कृत्ये उत्तम तऱ्हेने पार पाडल्यावर जगून भूमीला भार न होता आपले जीवन संपवावे हेच रामअवतारावरून लक्षातयेते.